

# महाराष्ट्रातील महीला संत

लेखिका
**प्राची गडकरी**

लेखन सहाय्य
**बिभीषण चवरे**

# महाराष्ट्रातील महिला संत

✧ **प्रकाशक :**

नाव :

पत्ता :

दूरध्वनी :

ईमेल :

✧ © **कॉपीराईट असलेल्यांचे नाव**

✧ **प्रथमावृत्ती :**

तिथी :

दिनांक :

✧ **संकल्पना :**

पृथ्वी क्रिएशन्स

✧ **अक्षरजुळणी :**

साफल्य क्रिएटर्स,

गणेशनगर, धायरी, पुणे ४११०४१.

मोबाइल : ९९२२३२४६३०

✧ **मुद्रणस्थळ :**

प्रेसचे नाव

दूरध्वनी क्र.

email : compprint@gmail.com

✧ **मूल्य : रुपये ३५०/-**

# मा. मुख्यमंत्री यांचे शुभेच्छा पत्र

# मा. उपमुख्यमंत्री यांचे शुभेच्छा पत्र

# मा. सांस्कृतिक कार्यमंत्री यांचे शुभेच्छा पत्र

# मा. सचिव यांचे शुभेच्छा पत्र

# ꧁ प्रकाशकीय ꧂

आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राच्या भक्ती संस्कृतीचे अत्युच्च टोक! तन, मन, धन विसरून विठुरायाच्या दर्शनासाठी दरवर्षी जी पाऊले पंढरपूरकडे वळतात त्या पावलांना साष्टांग दंडवत! शेकडो वर्षापासून चालत आलेला व समृद्ध परंपरा लाभलेला अमूर्त वारसा म्हणजे पंढरीची वारी!

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विभागामार्फत, नियमितपणे भक्ती संस्कृतीशी निगडित कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. दिल्ली येथील राजपथावर संचलित झालेला वारकरी संत हा चित्ररथ असो की, ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार असो; कीर्तन महोत्सव असो की, संतांच्या जीवन कार्यावर सादरीकरणे असो... सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत भक्ती आणि अध्यात्म्याशी निगडित अनेक कार्यक्रम-उपक्रम हाती घेतले जातात. या उपक्रमापैकीच एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे; आषाढी वारीसाठी निघालेल्या दोन्ही पालखी मार्गावर, महिला संतांची ओळख असणाऱ्या चित्ररथांचे संचलन होय.

यावर्षी पालखी मार्गावर १७ दिवस महिला संतांच्या कार्याची ओळख सांगणारे दोन चित्ररथ, दोन वेगवेगळ्या पालखी मार्गावर वारीसोबत होते. यामधून महिला संतांच्या कार्यावर आधारित अनेक सादरीकरणे, नाटिका, गायन, वादन, नृत्य यावर आधारित कार्यक्रम सादर करण्यात आले. रोज बारा ते पंधरा कार्यक्रमाच्या माध्यमातून, लाखांपेक्षा जास्त वारकऱ्यांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. महाराष्ट्रातील काही महिला संतांची ओळख नव्याने व्हावी, यासाठी हा उपक्रम साजरा करण्यात आला होता. चित्ररथ पंढरपूर येथे पोहोचल्यानंतर होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमात, महाराष्ट्रातील महिला संतांवर आधारीत पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार होते. मात्र वेळेअभावी ही पुस्तिका तयार होऊ शकली नाही. त्यामुळे आम्ही ही पुस्तिका आता प्रकाशित करीत आहोत. या पुस्तिकेत महाराष्ट्रातील काही महिला संतांच्या कार्याची ओळख असून, भारतातीलही काही महिला संतांची तोंड ओळख करून देण्यात आलेली आहे. महाराष्ट्रातील महिला संतांनी केलेले अमूल्य कार्य, त्यांचे साहित्य आणि विचार या पुस्तिकेच्या माध्यमातून सर्वांपर्यंत जावेत ही भूमिका यामागे आहे. पंढरपूर येथे संपन्न झालेला नाचू कीर्तनाचे रंगी हा संत नामदेव महाराज यांच्या जीवनावरील सांस्कृतिक कार्यक्रम; तसेच अवघा रंग एकची झाला हा महिला

संतांच्या साहित्यकृतीवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम या वारीच्या निमित्ताने संपन्न झाला.

महाराष्ट्रातील संत म्हटले की काही मोजकी नावेच समोर येतात. महाराष्ट्रात असे अनेक संत होऊन गेलेले आहेत; ज्यांची पुरेशी ओळख सर्वांना होणे आवश्यक आहे. महिला संतांच्या नावाची यादीही मोठी आहे, मात्र त्यातील काहीच महिला संत सर्वसाधारणपणे ठाऊक असतात. या पुस्तक निर्मिती मागील महत्त्वाचा उद्देश, सर्वसामान्यांना माहीत असलेल्या व नसलेल्या निवडक संतांची ओळख करून देणे हा आहे. महाराष्ट्रातील तसेच भारतातील महिला संतांच्या कार्यावर आधारित, समग्र माहिती असणारे साहित्य अत्यल्प उपलब्ध आहे. महाराष्ट्र टाइम्स व लोकसत्ता यामधून लेखन करणाऱ्या प्राची गडकरी यांचे नाव अनेकांकडून समोर आले. त्यामुळे या आगळ्या वेगळ्या विषयावर लेखन करण्याची विनंती संत साहित्याच्या अभ्यासक आणि प्रसिद्ध लेखिका प्राची गडकरी यांना करण्यात आली होती. त्यांनी हे पुस्तक लिहिण्यास आनंदाने होकार दिला. प्राची गडकरी यांना ज्यावेळेस ही कल्पना सांगितली, त्यावेळेस त्यांनी स्वतः वारी मधील चित्ररथामध्ये सहभाग घेतला. महिला संतांच्या जीवनावर आधारित नाटिका त्यांनी लिहून दिल्या. काही नाटिकांमध्ये स्वतः सादरीकरण केले. त्यांच्या ओघवत्या व साध्या सोप्या शब्दातून हे पुस्तक साकार झाले आहे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद! विशेष म्हणजे, त्यांनी या पुस्तकाचे लेखन करण्यासाठी कोणताही आर्थिक मोबदला घेतलेला नाही, त्याबद्दल त्यांचे आभार!

सांस्कृतिक कार्य विभागाचे माननीय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी या पुस्तकासाठी शुभेच्छा देऊन संचालनालयाने अशा प्रकारचे उपक्रम नियमित हाती घ्यावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. महाराष्ट्रातील संत तसेच समाजसुधारक यांचे कार्य भारतातील जनतेसमोर यावे यासाठी वेगवेगळे कार्यक्रम, उपक्रम हाती घेण्यात यावेत याबद्दल मा. सुधीर मुनगंटीवार आग्रही आहेत. संत साहित्य, अध्यात्म आणि भक्ती हे सूत्र जीवनाचा पाया असून यावरच महाराष्ट्राचा विकास आणि प्रगती अवलंबून असल्याने, अशा प्रकारच्या पुस्तकांचे लेखन व्हावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. माननीय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी या पुस्तकासाठी संचालनालयाला प्रोत्साहन व परवानगी दिली त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार! सांस्कृतिक कार्य विभागाचे मा. सचिव सौरभ विजय यांनी या पुस्तिकेची संकल्पना त्यांच्यासमोर मांडल्यावर त्यास तात्काळ होकार दिला. महाराष्ट्रातील महिला संतांचे पुस्तक चांगल्या दर्जाचे असावे अशी अपेक्षा व्यक्त करून त्यांनी यासाठी संचालनालयाला प्रोत्साहन दिले त्याबद्दल त्यांचे आभार!

सांस्कृतिक कार्य विभागाचे उपसचिव विलास थोरात व विद्या वाघमारे, प्रसाद महाजन, सुमंत पाष्टे, बाळासाहेब सावंत, शिल्पा कवळे, अनिरुद्ध देशपांडे यांनीही या पुस्तकासाठी प्रोत्साहन दिले त्याबद्दल त्यांचे आभार! संचालनालयातील सहसंचालक श्रीराम पांडे, कार्यक्रम अधिकारी संदीप बलखंडे व संदीप शिंदे, अधीक्षक मिलिंद बिर्जे, निलेश धुमाळ, मच्छिंद्र पाटील, अलका घोडके, जयश्री घुगे तसेच लेखा विभागातील नीलिमा म्हात्रे, तृप्ती परळकर, अरुण साळुंखे यांचेही आभार. याच बरोबर पल्लवी कदम, नेहा सलियन, आबा जगताप, खडसे, संदीप वसावे तसेच इतर कर्मचाऱ्यांचेही मनःपूर्वक आभार!

वारीमध्ये चित्राथाचे संचलन करणारे पृथ्वी इनोवेशनचे विनायक सैद, क्षितिजा गुप्ते व त्यांचे सहकारी यांचेही विशेष योगदानबद्दल आभार! या पुस्तकाची मांडणी व छपाई यासाठी पुण्याच्या ...... संस्थेने विशेष योगदान दिले आहे त्याबद्दल त्यांनाही धन्यवाद! श्री तुषार प्रधान, रोशन इंगोले व कृष्णा यांनी या पुस्तकासाठी डिझाईन व चित्रांचे रेखाटन केले त्याबद्दल त्यांचेही आभार! या पुस्तकाच्या निर्मितीसाठी ज्यांनी ज्यांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष योगदान दिले त्या सर्वांचे पुन्हा एकदा आभार!

**संचालक**
**(विभीषण चवरे)**
**सांस्कृतिक कार्य संचालनालय,**
**सांस्कृतिक कार्य विभाग**
**महाराष्ट्र शासन**

# प्रस्तावना

## संकल्पनेविषयी...

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. या भूमीतील अनेक संतांनी अध्यात्म व भक्तीचा प्रवाह आणि प्रवास अखंडितपणे महाराष्ट्रात वाहता ठेवला आहे. समता, बंधुता, नीतिमूल्य यांना सिंचित करण्याचे काम संतांच्या विचाराने व कार्याच्या प्रवाहाने केले आहे. बाराव्या शतकापासून सुरू झालेल्या या परंपरेची पताका आजही आम्हाला दिशा दर्शवण्याचे काम करत आहे.

अंधश्रद्धा, अज्ञान, बुरसटलेले विचार यावर प्रहार करून समता आणि बंधुता हे विचार मनामनात रुजवणारे हे संत म्हणजे महाराष्ट्राला मिळालेले वरदान आहे. महाराष्ट्राच्या वैचारिक भूमीची अविरतपणे मशागत करण्याचे काम इथल्या संत परंपरेने केले आहे. चक्रधरस्वामी यांच्यापासून सुरू झालेला हा प्रवास, संत गाडगेबाबा, तुकडोजी महाराज यांच्यापर्यंत अविरतपणे सुरू आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत नामदेव, संत निळोबाराय, संत नरहरी, संत सेना, संत सावता, संत चोखामेळा, संत रामदास, संत शेख महंमद यासारख्या कितीतरी संतांनी महाराष्ट्राची भूमी वैचारिक दृष्ट्या सुजलाम सुफलम केली आहे. भक्ती शक्तीचा संगम ही महाराष्ट्राने अनुभवलेला आहे.

ज्याप्रमाणे महाराष्ट्रात पुरुष संतांनी मोलाचे योगदान दिले; त्याचप्रमाणे महिला संतांचेही योगदान अतुल्य आहे. तत्कालीन सामाजिक परिस्थितीशी झगडत व विपरीत परिस्थिती असतानाही या संतांनी जे कार्य केलेले आहे, ते दीपस्तंभासारखे आहे. संत महदंबा, संत मुक्ताई, संत जनाबाई, संत सखु, संत कान्होपात्रा, संत बहिणाबाई, संत सोयराबाई, संत निर्मळा, संत कान्होपात्रा, संत राजाई, संत गोणाई या व अशा अनेक महिला संतांनी अध्यात्म व भक्तीच्या मार्गाने आपला वेगळा ठसा उमटवला आहे. भक्ती, अध्यात्म व बंडखोरी यामधून या महिला संतांनी आपले विचार मांडले आहेत. महिला संतांच्या यादीमध्ये फक्त महाराष्ट्रच नाही तर, भारतातील ही अनेक महिला संतांचा समावेश होतो. या पुस्तकात महाराष्ट्रातील महिला संतांसोबतच भारतातीलही काही निवडक महिला संतांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला आहे. परधन आम्हा माती समान. असे म्हणणारे तुकाराम महाराज असो की, अवघा रंग एक झाला म्हणणाऱ्या संत सोयरा असो; सर्वांचे उद्दिष्ट हे समाजाच्या निकोप मनाची निर्मिती करणे हेच होते.

भारतीय मनाचे सिंचन, भरण, पोषण हे खरे पाहता संत वाङ्मयामुळे झाले आहे. वेद, उपनिषदे आणि अनेक धार्मिक ग्रंथांवर संताचे मनापासून प्रेम असल्यामुळे मराठी वाङ्मयावर त्याचा खूप परिणाम झाला. संतांनी आपले हे वेद, उपनिषदे, ग्रंथ तळागाळापर्यंत पोहचवले. संतांमुळे मनाला साधुत्व आणि साधनांना शुचित्व मिळाले. सामाजिक समरसता आणि उच्च सांस्कृतिक मूल्यांचा ठेवा संतांनी जपला व आपल्याला प्रदान केला. सामान्य परिस्थितीतून असामान्य व्यक्तिमत्व कसे घडत जाते याचे उत्तम उदाहरण म्हणजे सगळी संत मांदियाळी ! प्रत्येक संत म्हणजे लखलखता तारा आहे. अशा ह्या संतांच्या मांदियाळीत महिला संतांनी उल्लेखनीय कार्य करून समाजाला वेगळी दिशा दिली आहे. महाराष्ट्रात नाथ, महानुभव, वारकरी, दत्त, समर्थ, नागेश असे वेगवेगळे संप्रदाय खेळीमेळीने नांदत आहेत. प्रत्येक संप्रदायातील महिला संतांचे भरीव कार्य उल्लेखनीय आहे.

खरंतर स्त्री ही आदिम काळापासून एक शक्ती मानण्यात येते. स्त्री आणि सृजन असं आदिम नातं आहे. स्त्रिच्या निर्मितीशक्तीला माया, आदिशक्ती, प्रकृती, विश्वजननी इ. शब्दांनी गौरविले जाते.

परंतु पारंपरिक समाज व्यवस्थेने स्त्रीवर अनेक दबाव, आचरणविषयक बंधने घातली. ती बंधनं, रुढी परंपरा सारं काही सांभाळून तिने भक्ती क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवला. संसार सांभाळून भक्ती कशी करायची हा भक्तिचा सरळ सोपा मार्ग ह्या स्त्री संतांनी समाजाला दाखविला. कैक शतकांपूर्वी ह्या स्त्री संतांनी लिहिलेले अभंग, ओव्या, श्लोक, आरत्या आजही ऐकायला आवडतात. कारण त्यामध्ये एक प्रगल्भ विचारधारा आहे. त्यामुळे प्रत्येकवेळी एक नवा अर्थ त्यातून मिळतो. आपण ज्या चष्म्यातून त्या साहित्याकडे बघतो तोच अर्थ त्या साहित्यातून निघतो हे विशेष!

'दळता कांडता। तुज गाईन अनंता।।' किंवा 'शुध्द ज्याचा भाव झाला। देव नाही दूर त्याला।।' अशा कैक सोप्या शब्दात ह्या महिलासंतांनी भक्तीचा महिमा सांगितला आहे. सत्य-असत्याच्या संघर्षात जरी असत्याचा उत्कर्ष होतोय असे वाटत असले तरी अंतिम विजय सत्याचाच होतो. आणि 'सत्य म्हणजे ईश्वर' हे समिकरण ह्या महिला संतांनी समाजाला देण्याचा प्रयत्न केला. मानवी जीवन हे आयुष्यभर शाश्वत सुख-समाधान शोधत असते. परंतु हे सुख-समाधान आपल्याच अंतरी आहे. आणि ते परमेश्वर कृपेनेच मिळते हे या महिला संतांनी सह प्रमाण दाखवून दिले आहे. अशा महिला संताचा धांडोळा घेवून काही निवडक महिला संतांची ओळख व्हावी आणि त्यांच्या कार्यासाठी कृतज्ञता व्यक्त करावी हा शुद्ध हेतू आहे.

❀❀❀

# ☙ लेखिकेचे मनोगत ❧

## संत

आपल्याकडे अठरा पुराणे आहेत. उदा. ब्रम्हपुराण, पद्मपुराण, स्कंदपुराण, भविष्य पुराण, वगैरे वगैरे... खरंतर जे बोलणं लवकर संपत नाही त्याला आपण पुराण म्हणतो. परंतु आपल्या संस्कृतीत पुराण ह्या शब्दाचा अर्थ वेगळा आहे. पुराण म्हणजे जे जूनं आहे तेच परंतु दरवेळी त्याचा अर्थ मात्र नवीन वाटतो ते पुराण. उदाहरण द्यायचे झाले तर तीच गंगा, यमुना, नर्मदा आहे. ज्यात प्रभू रामचंद्र, कश्यपमुनी, याज्ञवल्क्य, नारदमुनी, गौतम ऋषीं सगळ्यांनी स्नान केले आहे. परंतु आजही तुम्ही गंगा नर्मदेत जर पाय टाकलात तर नवीन पाणी तुमच्या पायाला स्पर्श करतं. कारण त्या वहात्या आहेत. असेच आपले ग्रंथ वेद विचारधारा घेऊन वहात आहेत. प्रत्येकवेळी नवीन बळ त्यात मिळतं. म्हणूनच इतकी वर्षे झाली आपल्या वेद पुराणांना तरी ते जुने वाटत नाहीत. आजही त्यातून काहीतरी नवीन अर्थ आपल्याला मिळतो. दरवेळी ह्यातून नवीन विचारधारा मिळते. तशी तर आपल्या अठरा पुराणातील सगळ्या श्लोकांची संख्या एकूण चार लाख आहे. खरंतर त्यातील एक श्लोक जरी अभ्यासाला घेतला तरी तो समजायला, त्या श्लोकाप्रमाणे वागायला एक आयुष्य कमी पडेल.

ह्या अठरा पुराणातील स्कंदपुराण आणि पद्मपुराण ह्या दोन पुराणात भागवताचे संपूर्ण महत्व आले आहे.

अर्थात स्कंद पुराणाची श्लोक संख्या चोपन्न हजार आहे. तसेच पद्मपुराणाची एक्याऐंशी हजार आहे. पद्मपुराण नुसतं हातात जरी घेतलं तरी ऊर दडपतो. इतके त्याचे वैचारिक वजन श्रेष्ठ आहे. ह्याच पद्मपुराणात उध्दव आणि कृष्णाची चर्चा खूप सुंदर रंगवली आहे. भगवंताने उध्दवाच्या प्रश्नाला द्वापार युगात दिलेले उत्तर ऐकून संतांचं श्रेष्ठत्व किती मोठं आहे ह्याचा आपल्या अनुभव येतो.

जेव्हा कृष्ण भू लोक सोडून निघण्याच्या तयारीत असतात.अवतार संपुष्टात आणायच्या तयारीत असतात. तेव्हा उध्दव गहिवरून म्हणतो कृष्णा नको जाऊस तू भूलोक सोडून! तू गेल्यावर आमचं कसं होईल. ह्या भूमीला कोण तारेल? आम्ही

संकटात कोणाला हाक मारायची? आम्हाला योग्य दिशा कोण दाखवेल? तेव्हा भगवंत म्हणाले उध्दवा मी जरी इथून गेलो तरी, मी माझं तेज इथेच ठेवून जाणार आहे. ते तेज तुम्हाला सगळं काही देईल! परंतु माझं प्रेम मात्र तुम्हाला संतच देऊ शकतील. माझं प्रेम काय केल्याने तुम्हां लाभेल हे मात्र केवळ संत तुम्हाला सांगू शकतील. म्हणून कलियुगात जास्तीत जास्त संतांच्या सहवासात राहीले पाहिजे.

म्हणून समर्थ म्हणतात....

**जे तैलोकी नाही दान । ते करती संत सज्जन ।।**
**तया संतांचे महिमान । किती म्हणून वर्णावे ।।**

खरंतर उध्दव चार दिवस म्हणून गोकुळात गेला आणि सहा महिन्यांनी गोकुळातून परत आल्यावर अत्यंत विनम्रपणे त्याने भगवंताला विचारले की, ‘‘भक्ती म्हणजे काय हे मला तू गोकुळात जायच्या आधी का नाही सांगीतले. मी विश्वास ठेवला असता तुझ्यावर भगवंता!’’ तेव्हा कृष्ण हसून म्हणाला, ‘‘उध्दवा भक्ती ही सांगायची गोष्ट नाही. तर ती अनुभवायची गोष्ट आहे. भक्त आपलं आयुष्य ह्या भक्तीसाठी खर्च करतात आणि माझ्या जवळ येतात. उध्दवा जेव्हा मी ह्या भूमीवर नसेन तेव्हा केवळ संत मला पाहू शकतील. कलियुगात मला ओळखायची ताकद केवळ संतांकडे असेल. संताच्या भक्तीत असेल. जर संतांच दर्शन झाले तर माझेच दर्शन झाले असे तेव्हा खुशाल समजावे.’’

आजही आपली संस्कृती हेच मानते की ...

**देवाची मूर्ती म्हणजे मुके संत**

आणि.....

**संत म्हणजे बोलका देव**

भारताच्या नकाशात महाराष्ट्र एका टिंबा एवढा दिसत असला तरी त्याच्या संत परंपरेची किर्ती भारतभर प्रसिद्ध आहे. आज इतकी वर्षे झाली तरी प्रत्येक संतांचे अभंग, त्याची विचारधारा ही तितकीच टवटवीत राहीली आहे. संत परंपरेने आपल्याला दाखवून दिले आहे की निःसीम भक्ती केली तर देव स्वतः आपल्या भेटीस येतो. भक्तीमध्ये जातपात, शिक्षण, गरिब-श्रीमंत, स्त्री पुरुष असा कोणताही भेदभाव

नसतो. केवळ मनात शुध्दभाव पाहिजे. म्हणूनच संत मुक्ताबाईंचं ब्रीद वाक्य हेच होते की,

**शुध्द ज्याचा भाव झाला । देव नाही दूर त्याला ।।**

सर्व स्त्री संतांनी आपला संसार सांभाळून भक्ती कशी करायची हा अध्याय जगाला दिला आहे. जनाबाईंनी शरिरातील प्रत्येक पेशीत भगवंताचे नाम ठेवायला सांगितले आहे. यासाठी जनाबाई मथुरेच्या बाजारात गोकुळातील गवळणी लोकांशी कशा संवाद साधायच्या यांची कैक उदाहरणे देतात. भगवंता शिवाय कोणाचेही नाव त्या गवळणींच्या ओठावर नसायचे. दुध, दही, लोणी, चीक विकतानाही त्या गवळणी ओरडायच्या गोविंद घ्या. गोपाळ घ्या. मुकुंद घ्या. कन्हैया घ्या. असं एकरुप होता आले पाहिजे परमेश्वराशी! तरच तो भगवंत आपोआप तुमच्यात एकरुप होईल.

अशा ह्या महाराष्ट्रातील स्त्री संतांनी दिलेला भक्तीचा वारसा अद्भुत आहे. त्यांचा विसर आपल्याला होता कामा नये म्हणूनच ही स्त्री संतांची धावती ओळख करून देण्याचा हा छोटासा प्रयत्न. अशा कैक स्त्री संतामुळे हा महाराष्ट्र भक्तीच्या बाबतीत समृद्ध आहे. ह्या स्त्री संतांच्या विचारधारा, त्यांचे अभंग, त्यांचे साहित्य प्रत्येकाने जपून ते पुढच्या पिढीपर्यंत पोहचवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.

**– प्राची गडकरी**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | महाराष्ट्रातील महिला संत : लेखकाने घेतलेला धांडोळा | २० |
| १. | संत महदंबा | २१ |
| २. | संत मुक्ताई | २३ |
| ३. | संत जनाबाई | २७ |
| ४. | संत गोणाई | ३१ |
| ५. | संत राजाई | ३३ |
| ६. | संत लाडाई | ३६ |
| ७. | संत नागरी | ३८ |
| ८. | संत सोयराबाई | ४० |
| ९. | संत निर्मळा | ४२ |
| १०. | संत भागूबाई | ४५ |
| ११. | संत कान्होपात्रा | ४७ |
| १२. | संत बहिणाबाई | ५३ |
| १३. | संत भागूबाई (१६वे शतक) | ५५ |
| १४. | संत विठाबाई | ५७ |
| १५. | संत प्रेमाबाई | ५९ |
| १६. | संत विमला देवी | ६१ |
| १७. | संत वेणाबाई | ६३ |
| १८. | संत बयाबाई | ६५ |
| १९. | संत रुक्मिणीबाई केंकरे | ६७ |
| २०. | संत मुडलणी | ६९ |
| २१. | संत सखू | ७१ |
| २२. | संत नाईबबाई | ७३ |
| २३. | संत आवकास्वामी | ७५ |
| २४. | संत अंबिकाबाई | ७७ |
| २५. | संत जैतुनबी | ७९ |
| २६. | संत आईसाहेब पळसे | ८१ |
| | महिला संत : लेख व रसग्रहण | ८२ |

| | |
|---|---|
| भारतातील स्त्री संत | ८६ |
| भारतातील काही स्त्री संत | ८७ |
| अभंग रसग्रहण–१ | १०२ |
| अवघा रंग एक झाला | १०५ |
| चित्ररथाचा वारीतील नियोजीत प्रवास | १०६ |
| चित्ररथ | १०७ |
| चित्ररथाचे वारीतील प्रवासासाठी प्रस्थान | १०८ |
| चित्ररथाचा वारीतील १७ दिवसांचा प्रवास व | १०९ |
| अमृतस्पर्श | ११० |
| नाट्यसंहिता | ११२ |
| नाचू कीर्तनाचे रंगी – कार्यक्रमाची क्षणचित्रे | ११९ |
| ‘अवघा रंग एक झाला’ – कार्यक्रमाची क्षणचित्रे | १२० |
| वारीतील वारकऱ्यांची काही क्षणचित्रे | १२३ |
| सांगता | १२५ |

❀❀❀

# महाराष्ट्रातील महिला संत : लेखकाने घेतलेला धांडोळा

महाराष्ट्रातील महिला संतांनी आपल्या आध्यात्मिक शक्तीने भक्तीचा वेगळाच ठसा संतपरंपरेत उमटवला आहे. अध्यात्माच्या क्षेत्रात आपले अनुभव व्यक्त करून आपले वेगळेपण दाखवून दिले आहे. संसार सांभाळून सहजसुलभ भक्तीचा मार्ग त्यांनी जनमनास दाखवला आहे. अगदी सोप्या पद्धतीने स्त्रीमन उलगडून त्यातील भावनांना भक्ती हाच मोक्षाचा मार्ग आहे, हे सांगताना आपल्या आयुष्यातील अनुभव साक्षीला ठेवले आहेत. आपल्यातील मोह, माया, अहंकाराला हलके करण्यासाठी नामस्मरण हे प्रभावी माध्यम आहे, हे त्यांनी आपल्या भक्तीने दाखवून दिले आहे. आपल्या महाराष्ट्रात अनेक संप्रदाय असले, तरी त्यातील प्रत्येक स्त्रीसंतांनी परमेश्वराच्या कनवाळू स्वभावाचे दर्शन आपल्याला अभंग आणि ओव्यांतून घडवले आहे. स्त्री ही आदिम काळापासून एक शक्ती मानण्यात येते. भारतीय तत्त्वज्ञानात ती पूजनीय, वंदनीय मानून तिच्या स्त्रीत्वाला सर्व भूतमात्रातील गुणांची अधिष्ठात्री मानले गेले. महाराष्ट्राची संतपरंपरा पाहिल्यास पुरुष संतांप्रमाणेच स्त्रीसंतांनीही भरीव कार्य केल्याचे दिसून येते. भक्तीच्या, अध्यात्माच्या क्षेत्रात आपले अनुभव व्यक्त करून आपल्यातील वेगळेपण स्त्रीसंतांनी जाणवून दिले आहे. या संत स्त्रियांच्या साहित्यातून स्त्रीत्वाचे दर्शन तर झालेच; परंतु त्यांच्या अभंग रचनांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. या अभंगांच्या निर्मितीमागील प्रेरणा निखळ आत्मानुभूतीची आहे.

ज्ञानेश्वरांना आपल्या ४२ ताटीच्या अभंगांतून अलौकिक जीवनाची आठवण करून देणारी मुक्ताई, चरित्रलेखनाने स्वतःची ओळख देणारी नागरी(नागी), किंवा ‘धवळे’सारखे कथाकाव्य लिहिणाऱ्या महदंबा, अशा कैक स्त्रीसंतांमुळे मराठी वाङ्मयीन साहित्याची दालने समृद्ध झाली आहेत. **‘शुद्ध ज्याचा भाव झाला, देव नाही दुर त्याला’**! किंवा **‘दळता कांडता तुज गाईन अनंता’**, असे म्हणत देवाच्या भक्तीचा सोपा मार्ग सांगणाऱ्या काही प्रमुख स्त्रीसंत कवयित्रींचा अभ्यास करून त्यांच्या निवडक ओव्या अभंगांची ही ओळख करून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे.

❀❀❀

# महाराष्ट्रातील महिला संत :
# लेखकाने घेतलेला धांडोळा - २

# महाराष्ट्रातील महिला संत :
# लेखकाने घेतलेला धांडोळा -३

# महाराष्ट्रातील महिला संत :
# लेखकाने घेतलेला धांडोळा - ४



# १. संत महदंबा

महदंबा ह्या महानुभाव संप्रदायातील एक प्रमुख संत कवयित्री! महानुभाव पंथाचे प्रवर्तक चक्रधरस्वामींनी बालविधवा असलेल्या महादंबांना संप्रदायात प्रवेश दिला. महादंबांच्या जिज्ञासूपणाबद्दल चक्रधरस्वामी त्यांची प्रशंसा करत. महदंबा मोठ्या विदुषी होत्या. रांगोळ्या काढण्यात कुशल आणि सुगरण होत्या. आपल्या भक्तीतून आणि सेवेतून त्यांनी समर्थपणाचा विचार मांडला 'लीळाचरित्र', 'सूत्रपाठ' इत्यादी ग्रंथांत महादंबा यांचा विशेष उल्लेख आढळतो. महादंबा ह्या मराठी साहित्यात आद्य कवयित्री म्हणून ओळखल्या जातात. धवळे, तसेच ११० कडव्यांचे मातृका रुक्मिणीस्वयंवर हे काव्य महदंबा यांनी श्रीकृष्णाला आपल्या गुरूंच्या रूपात पाहून गायिले आहे. लग्नसमारंभात स्त्रियांच्या मनात कोणत्या भावना येतात, हे महदंबा यांनी धवळेमधून सांगितले –

**रुक्मिणीसी सखिया सांघती वृत्तातु ।**
**सर्वांगी न देखेचि तुझा ओ कांतु ।।**

अशी सुंदर भाषाशैली त्यांनी धवळ्यात प्रसंग गतिमान करण्यासाठी वापरली. आजही महाराष्ट्रात कैक भागात लग्नसोहळ्यात महदंबांचे धवळे गायिले जातात.

दादोसा, चक्रधरस्वामी, गोविंद प्रभू यांचा सहवास महदंबांना लाभला आहे. महदंबा स्वतःच म्हणत, 'चक्रधरस्वामींचा सहवास लाभल्यामुळे आपले साहित्य फळाला आले', महदंबा रवा काढीत असताना ओवी गात होत्या. तेवढ्यात

चक्रधरस्वामी तेथे आले. त्यांना त्या ओव्या खूप आवडल्या. तेथूनच त्यांच्या साहित्य निर्मितीला सुरुवात झाली. अक्रूर गीत हे पहिले काव्य –

**अक्रूर मंगळे लवती पिंगळे**
**श्रीकृष्ण संध्या वेळे भेटतील ।।१।।**
**अकूरूर घातली संचून गाठी**
**आजी द्वारकेरायासी होईल भेटी ।।२।।**

आजही एक विलक्षण प्रतिभावंत स्त्री असा मराठी साहित्यात महदंबांचा उल्लेख केला जातो.

'धवळे' सारखी आद्य कविता लिहिणाऱ्या, आद्य कवयित्री म्हणून महदंबांचा संपूर्ण महाराष्ट्राला नक्कीच अभिमान आणि मनात प्रचंड आदर आहे.

**कृष्ण म्हणजे मुक्ती!**
आणि
**कृष्ण म्हणजे जीवन!**

हे तत्वज्ञान हे तत्वज्ञान महदंबांनी रुक्मिणीस्वयंवर ह्या महाकाव्यात सांगीतले आहे.

महदंबांच अध्यात्मिक तत्वज्ञान आणि अफाट प्रतिभचे दर्शन पाहून स्वतः नागदेवचार्यांनी त्यांचा गौरव करीत म्हंटले की,

**म्हातारी धर्मरक्षक**

**म्हातारी प्रीतिरक्षक**

स्त्री पुरुष समानता हाच महानुभाव पंथाचा दृष्टीकोन समोर ठेवून महदंबांचे काव्य असले तरी त्यातील खरी प्रेरणा भक्तीच आहे. महानुभाव पंथाने ज्या अफाट साहित्याची निर्मिती केली त्यात संत कवयित्रीचासुद्धा मोठा सहभाग आहे.

❀❀❀



# २. संत मुक्ताई

वारकरी परंपरेतील मुक्ताई ही आद्य कवयित्री. केवळ १८ वर्षांचे आयुष्य! एवढ्या अल्पवयात आध्यात्मिक आणि वाङ्मयीन दृष्टीने तिने घेतलेली अलौकिक झेप आश्चर्यकारक आहे. सर्व भावंडांत मुक्ताई लहान असल्या, तरी त्यांचा आध्यात्मिक अधिकार फार मोठा होता.

संत निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव यांची लहान बहीण म्हणून त्या प्रसिद्ध असल्या; तरी त्यांची स्वतःची अशी संत साहित्यात खास ओळख आहे. आपल्या ४२ ताटीच्या अभंगातून साक्षात ज्ञानाचा सूर्य असलेल्या ज्ञानदेवांना मुक्ताईंनी अलौकिक जीवनाची ओळख करून दिली होती. आपल्या साहित्यात त्यांनी आपल्या भावंडांसाठी 'संत' हा शब्द वापरला.

१२ हरिपाठाचे अभंग सोडले, तर मुक्ताईंच्या प्रत्येक अभंगात मुक्त, विमुक्त किंवा मुक्तामुक्त, जीवनमुक्त असा कोणता तरी एक शब्द आहेच. त्यामुळेच जणू 'मुक्त' ह्या शब्दातच त्यांची पृथंगात्मता दडली आहे असे वाटते, मुक्ताबाईंनी २८९ अभंगांतून वेगळ्या स्तरावरचे तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोहचवले. स्त्रीसंत साहित्यातील मुक्ताई पहिली स्त्री, ज्यांनी कूट अभंग लिहिले. त्यांनी लिहिलेल्या दोन कूट अभंगांतून तीन-चार ग्रंथ तयार होऊ शकतात, असे मत स्वतः नामदेवांनी 'नामदेव गाथे'त व्यक्त केले आहे.

'मुमुक्ष'ह्या एका शब्दाने १३ वर्षांच्या मुक्ताईंनी भक्तीचे प्रचंड रूप समजल्या जाणाऱ्या नामदेवांना भक्तीचा नवा मार्ग दाखविला. मुक्ताबाईंनी आपल्या ज्ञानाने उच्च पातळी गाठली होती. म्हणूनच १४० वर्षांच्या चांगदेवांनीसुद्धा त्यांना गुरुपदी ठेवून आपल्या 'तत्त्वसार' ग्रंथातील ८६९व्या ओवीत मुक्ताबाईंचा 'योगमाया योगेश्वरी'

असा उल्लेख केला आहे. ज्ञानाने पोक्त झालेल्या मुक्ताबाईंनी आईप्रमाणे आपल्या तीनही वडील भावंडांना सांभाळले. परमार्थ हाच आपला प्रपंच आहे आणि तो उलगडून दाखवणे, हेच आपले कर्तव्य आहे, असा ठाम विश्वास मनात ठेवून त्यांनी ज्ञानेश्वरांनी चांगदेवांना लिहिलेल्या ६५ओव्यारूपी पत्राचे वाचन केले आणि त्यातील प्रत्येक ओवीचा अर्थ चांगदेवांना सांगितला. विसोबा चाटी यांना 'खेचर' म्हणून त्यांच्या पारलौकिक जीवनाची ओळख करून दिली. पुढे विसोबांनी 'खेचर' हे नाव एखाद्या पदवीप्रमाणे मिरवले. ह्याच विसोबा खेचरांना नामदेवांनी मुक्ताईंच्या सांगण्यावरून गुरू करून घेतले.

**योगी पावन मनाचा ।**
**साही अपराध जनांचा ।।**
**विश्व रागे झाले वन्ही ।**
**संती सुखे व्हावे पाणी ।।**
**विश्वपट ब्रम्ह दोरा ।**
**ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।**

असे म्हणून त्यांनी ज्ञानदेवांची चैतन्य शक्ती जागृत केली. त्यांनी थाप ताटीवर नाही, तर ज्ञानेश्वरांच्या हृदयावर मारली. अशा मुक्ताईंनी वादळात कडकडणाऱ्या विजेत समाधी घेतली.

## मुक्ताईंचे कूट अभंग :

अत्यंत लहान वयात अपवादभूत आध्यात्मिक शक्ती बाळगणारे तेजस्वी व्यक्तिमत्त्व म्हणजे मुक्ताई! डॉ. इर्लेकरांनी तर म्हटले आहे की, 'मुक्ताई जणू अध्यात्म कोळून पिऊनच जन्माला आल्या होत्या.' म्हणूनच मुक्ताई वयाने सर्व संत मंडळींत लहान असल्या, तरी त्यांचा आध्यात्मिक अधिकार मात्र फार मोठा होता. स्त्रीसंतसाहित्यात, तत्त्वज्ञानाच्या चिंतनात मुक्ताबाईंचा सगळ्यांत वरचा क्रमांक आहे.

अर्थात, वयाच्या अवघ्या सातव्या वर्षी मुक्ताईंनी रचलेल्या बेचाळीस ताटीच्या अभंगावरून खरं तर आपल्याला मुक्ताईंच्या आध्यात्मिक शक्तीची झेप लक्षात येतेच. ताटीच्या अभंगात मुक्ताई म्हणतात...

**विश्व रागे झाले वन्ही। संती सुखे व्हावे पाणी।**
**विश्वपट ब्रह्म दोरा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा।।**

इथे 'विश्वपट ब्रह्म दोरा' हा चिद्विलासवादी सिद्धांत मुक्ताईंनी सांगितला आहे. ऊर्णनाभीच्या गळ्याला दोर असतो; पण तिच्या घरी काही धाग्यांचे गाठोडे नाही, असे सांगून विश्वोत्पत्तीचे, विश्वपालनाचे ईशतत्त्व त्यांनी ताटीच्या अभंगात सांगितले आहे. तरीही, मुक्ताईंच्या आध्यात्मिक तत्त्वज्ञानाची झेप ही त्यांच्या कूट अभंगांवरून

आपल्याला अधिक स्पष्ट होते.

कूट ह्या शब्दाचा अर्थ पाहिला, तर 'कूट' म्हणजे कोडे. कूट म्हणजे अवघड प्रश्न किंवा गूढपद्य. कूट म्हणजे ज्या पद्यात प्रचंड तत्त्वज्ञान आणि विश्वोत्पत्ती आहे. त्यातील गुणघनता, चिंतन, आत्मज्ञान थक्क करणारे आहे, अशा अभंगांना 'कूट अभंग' म्हटले जाते. कुटाची परंपरा खूप प्राचीन आहे; परंतु संत वाङ्मयातील कुटे लक्षणीय आहेत. नामदेव गाथेमध्ये म्हणतात की, 'एका कुटापासून एक ग्रंथ तयार होऊ शकतो, इतकी ताकद कूट अभंगात आहे.'

मुक्ताईंच्या कूट अभंगांचा अभ्यास करताना अफाट तत्त्वज्ञानाची ओळख होते. मुक्ताईंमधील प्रचंड आत्मविश्वास आपल्याला या अभंगांत दिसतो. मुक्ताईंची आध्यात्मिक परिभाषा ज्ञानदेव, निवृत्तीनाथांच्या पठडीतील आहे.

मुक्ताईंनी दोन कूट अभंग रचले; परंतु त्यांत चाळीस ग्रंथांची ताकद आहे, असे नामदेव गाथा सांगते. पहिला कूट अभंग मुक्ताईंनी रचला, जेव्हा चांगदेवमहाराजांनी वाघावर बसून ज्ञानेश्वर भावंडांची भेट घेतली, तेव्हा! चांगदेवांनी विचारलेल्या कूट प्रश्नाला मुक्ताईंनी कूट अभंगातून उत्तर दिले,

**हेमी हेम प्रचिती पाही ।**
**अनुभव आलिया सांगा ते काही ।।**
**अंहतेसी सोहं ते गुज ।**
**मुक्ताई म्हणे चांगया बूझ ।।**

याप्रमाणे अकरा वर्षांच्या मुत्ताईंनी अंहतेवर 'सोहम्' चा उतारा एकशेचाळीस वर्षांच्या चांगदेवांना दिला आणि तेव्हा चांगदेवांनी मुक्ताईंना गुरू करून स्वतः त्यांचे शिष्यपद स्वीकारले.

**टेकावरी टेक त्यावर टेकुली ।**
**तेथे एक बाळ विस्मो करी ।।**
**सुईचे अणीवर रचिलेले पठार ।**
**मुक्ताई म्हणे चांगया सांग यांचा वाचार ।।**

चांगदेवांना ज्ञानोपदेश करताना मुक्ताईंची भाषा चमत्कारिक प्रतिमा घडवते. त्यात वक्रोक्ती दिसते. म्हणजे वक्त्याने सांगितलेला एक शब्द श्रोता जसा अनेक निराळ्या अर्थाने ग्रहण करतो, तसा अर्थ ह्या कुटात आहे. जीवनातील विसंगती गूढपणे मुक्ताई प्रकट करीत आहेत. मुक्ताईंचा दुसरा कूट अभंग म्हणजे...

**मुंगी उडाली आकाशीं। तिने गिळीलें सूर्याशीं।।**
**विंचू पाताळाशी जाय। शेष माथां वंदी पाय।।**

मुंगी, विंचू, माशी, शेष ह्या सगळ्या प्रतिमा आणि विशेषणे आहेत. ह्या कुटात

मुक्ताईंनी जीवनाची वैय्यर्थता, ईश्वराचे कर्तृत्व, अशक्याचे निश्चय, हा बाणा अंगात असेल; तर विंचवाला सापसुद्धा नमस्कार करेल, हे सांगितले आहे.

मुक्ताईंच्या झोक्यावरच्या ओव्या, ताटीचे अभंग, हरिपाठाचे अभंग, कूट ह्या सगळ्या रचना वेगवेगळी रूपे धारण करून, अध्यात्माचा गाभा घट्ट करतात. अलौकिक तत्त्वांचे तेजोवलय भेदून मुक्ताबाईंमधील संतत्वाचे तिथे दर्शन घडते, हेच खरे.

❁❁❁



# ३. संत जनाबाई

मराठी साहित्यात जनाबाई इतकी लोकप्रिय कवयित्री नाही. जनाबाईंनी रचलेले साधे-भोळे; पण प्रेमळ असे अभंग जनमनात फार प्रसिद्ध आहेत. आज जवळपास ३५० अभंग जनाबाईंच्या नावावर उपलब्ध आहेत.

दळता कांडता तुज गाईन अनंता, असे म्हणत जनाबाईंनी विठ्ठलावर निस्सीम प्रेम केले. जनाबाईंच्या भक्तीत वेगळाच भाव होता. त्यांच्या अभंगांत एक वेगळीच निर्भीडता होती.

**देव भावाचा लंपट ।**
**सांडुनी आला हा वैकुंठ ।।**

असे लिहिताना देवाला लंपट म्हणायला त्या विसरल्या नाहीत. जितकी जनाबाईंची श्रद्धा विठ्ठलावर होती, त्यापेक्षा कैकपटीने अधिक श्रद्धा विठ्ठलाची जनाबाईंवर होती.

जनाबाईंच्या आईवडिलांनी म्हणजे दमा आणि करुंड ह्या दांपत्यांनी स्वप्नातील विठ्ठल दृष्टांतावर विश्वास ठेवून, सहा वर्षांच्या जनाबाईंना नामदेवांच्या घरी सोडले होते. नामदेवांचे वडील दामाशेठ यांनीही त्या दृष्टांतावर विश्वास ठेवून जनाबाईंचा स्वीकार केला होता. नामदेवांच्या घरी विठ्ठलमय वातावरण आणि प्रत्येक जण विठ्ठलाची भक्ती करणारा होता. जनाबाईंच्या आगमनानंतर सात-आठ वर्षांनी नामदेवांचा जन्म झाला.

नामदेवांमुळे आपल्याला पांडुरंग कळाला, असे म्हणत जनाबाईंनी नामदेवांना गुरू केले होते.

नामदेवांच्या घरी जे पडेल, ते काम करणाऱ्या जनाबाई काही दिवसांनी दासी म्हणून परिचित झाल्या.

**देव खाते देव पिते ।**
**देवावरी मी निजतें ।।**
**देव देते देव घेते ।**
**देवासवें व्यवहारिते ।।**

असा अलौकिक परिचय जनाबाईंना येऊ लागला.

**'स्त्री' जन्म म्हणूनी न व्हावे उदास।**
**साधुसंतां ऐसे केले जनी ।।**

असे स्पष्टपणे जनाबाई बजावतात, प्रगाढ जीवननिष्ठा त्यांच्या अभंगांतून प्रकटते. त्यांनी स्त्री जन्मासंबंधी कधीच खंत केली नाही, उलट विठ्ठलासाठी काही करण्याची तयारी स्पष्ट करीत त्या म्हणतात,

**डोईचा पदर आला खांद्यावरी ।**
**भरल्या बाजारी जाईन मी ।।**

देवाचे पिसे जनाबाईंना लागले होते. नामदेव जेव्हा भागवत धर्माचा प्रचार करत होते, तेव्हा पंढरपुरात जनाबाई वारकरी पंथाची धुरा चोख सांभाळत होत्या.

**सुखे संसार करावा ।**
**माजी विठ्ठल आठवावा ।।**

असं लिहिणाऱ्या जनाबाई विठ्ठलासाठी 'मी वेसवा झाले' हेसुद्धा स्पष्टपणे लिहितात. जनाबाईंच्या अभंगांत खूप वेळा परखड भाषा दिसत असली, तरी त्या मागील भाव वेगळा आहे. विठ्ठलासाठी लौकिकाचे सर्व बंध जनाबाई सहज उधळून लावतात. देव ठायी ठायी त्यांना मदत करताना दिसतो. विठ्ठलाला त्यांनी हृदयात बंदिस्त केले आहे. जनाबाईंच्या काव्यातून विठ्ठलाच्या अनुभवाचे वैविध्य जाणवते. सर्वाधिक संतांचा सहवास लाभणाऱ्या जनाबाई एकमेव स्त्रीसंत आहेत. आध्यात्मिक

परिवर्तनाच्या खुणा त्यांच्या अभंगांत ठायी ठायी दिसतात. यातून त्यांची संत म्हणून असलेली उंची लक्षात येते.

## जनाबाईंचे अंक तत्त्वज्ञान :

जनाबाईंचे अभंग वाचायला सोपे असले; तरी समजायला फार कठीण आहेत. स्वयंपाकघरातून अंगणापर्यंत झेप घेणाऱ्या स्त्रीच्या अगाध ज्ञानशक्तीचा ह्या अभंगांत प्रत्यय येतो. या जगाची उत्पत्ती परमेश्वराने मायेपासून कशी केली, हे सांगताना, केवळ अंकांचा आधार घेऊन त्यांनी अत्यंत सुलभरीतीने परमेश्वराचे अस्तित्व सिद्ध केले आहे. ह्या जगात परमेश्वराशिवाय दुसरे काहीही नाही, हे त्यांचे ठाम मत त्यांनी अभंगांतून व्यक्त केले आहे.

जनाबाईंनी आपल्या अभंगांत सद्‌गुरू म्हणजे नामदेवांकडून त्या स्वतः काय शिकल्या, हे रसाळ शब्दांत सांगितले आहे. जनाबाईंच्या अंभगांचा अभ्यास करताना प्रचंड उत्सुकता लागते, ती त्यांनी मांडलेल्या अंकांची!

जनाबाई आपल्या एका अभंगात म्हणतात...

**माया महत् तत्त्वाचे सुभर ।**<br>
**तीन पांचांचा प्रकार ।।**<br>
**पुढे पंचविसाचा भार ।**<br>
**गणती केले छत्तीस ।।**<br>
**बारा सोळा एकविस हजार ।**<br>
**आणिक सहाशांचा उबार ।**<br>
**माप चाले सोहंकार ।**<br>
**ओळखिले बावन्न मात्रेसी ।।**

हा संपूर्ण नऊ ओव्यांचा एक अभंग आहे. प्रत्येक ओवीचा एक ग्रंथ होऊ शकेल, इतके तत्त्वज्ञान, एकेका ओवीत भरले आहे. ह्या अंकगणिताने विश्वनिर्मात्या परमेश्वराची ओळख त्या करून देत आहेत, असे मला वाटते.

विश्वनिर्मितीचे पहिले तत्त्व म्हणजे महत्‌तत्त्व होय. महत् म्हणजे प्रकृती. ही प्रकृती सुभर आहे (सुभर म्हणजे भरलेले). म्हणजे ह्या प्रकृतीत अनेक तत्त्वं भरलेली

आहेत. त्यात त्रिगुण म्हणजे सत्त्व, रज, तम आणि पंचमहाभूतांचा समावेश आहे.

सृष्टी निर्माण करताना प्रकृती, पाच ज्ञानेंद्रिये, पाच विषय, पंचमहाभूते, पाचकर्मेंद्रिये, मन, बुद्धी, अहंकार या चोवीस तत्त्वांनी बनलेल्या शरीरात आत्मा हे पंचविसावे तत्त्व आहे. ह्यालाच जनाबाईंनी 'पंचविसाचा भार' म्हटले आहे. ह्या पंचविसाच्या भाराला काही जण 'छत्तिसाचा भार'सुद्धा म्हणतात.

म्हणून ह्याच भाराची गणती जनाबाईंनी छत्तीस शरीरतत्त्वात केली आहे. ह्या छत्तीस शरीरतत्त्वात अव्यक्त मन, बुद्धी, अहंकार, देणेघेणे, सुख, द्वेष, दुःख, जीभ, हात, पाय, तोंड अगदी धृतीपर्यंत सगळ्यांचा समावेश आहे.

बारा सोळा म्हणजे बारा सूर्याच्या राशी, जणू बाह्य जगाशी असलेला संबंध, ह्या राशींचा आपल्यावर होणारा परिणाम, त्यांच्या अस्तित्वाची जाणीव आणि सोळा चंद्रकला म्हणजे अंतर्मुख होणे, विचारांत मग्न होणे. दिवसभरात आपण एकवीस हजार सहाशे वेळा श्वास घेतो. त्या श्वासांत पांडुरंगाचे नाव किती वेळा घेतो, ही बाब वेगळी असली; तरी आपण बावन्न मुळाक्षरांतून आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवले, तर आपल्याला जाणीव होईल की, परमेश्वर आणि आपण एकच आहोत. मायेने बनवलेल्या प्रकृतीत परमेश्वर हा वेगळा नाहीच, तीच माया आपल्यातही आहे. ह्या जाणिवेलाच सोहंकार म्हणतात आणि ही जाणीव एकदा झाली की, जीवन सुंदर होईल, असे त्या म्हणतात.

प्रत्येक आत्म्यात मायाळू परमात्मा हा असतोच, ह्याची जाणीव मला माझ्या सद्गुरूरायाने करून दिली, असेही त्या विश्वासाने सांगत आहेत. जनाबाईंचे सद्गुरू नामदेव आहेत. नामदेवांनीच मला शिकवले, असे सांगताना जनाबाई म्हणतात...

**बाई मी लिहिणे शिकले ।**
**सद्गुरूरायापासी ।।**

❀❀❀

# ४. संत गोणाई

गोणाई म्हणजे नामदेव महाराजांच्या आई. दामाशेठ आणि गोणाईंचा उल्लेख नामदेवांच्या काव्यात खूप वेळा येतो. भक्तसम्राट नामदेवांचे कुटुंब खूप मोठे, आई-वडील, चार मुले, सुना, नामदेवांची बहीण, पत्नी, दासी जनाबाई असे सगळे मिळून १४ सभासद कुटुंबात होते आणि स्त्री म्हणून संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी गोणाईंवर होती. संपूर्ण कुटुंब विठ्ठलमय, काव्यमय होते.

तशी सर्वसाधारण परिस्थिती. गोणाईंच्या संसारात नेहमी ओढाताण. त्यामुळे त्यांच्या अभंगांत  अंतःसंघर्ष, लौकिक पाश, व्यवहार, परमार्थ ह्या गोष्टी अधिक जाणवतात. कधीकधी नाट्यात्मक आंदोलनही जाणवते. त्या लिहितात,

**गोणाई म्हणे नाम्या नव्हे रे हे भले।**
**विठ्ठल नामे केले आपणा ऐसे ॥**

विठ्ठलानं तुला वेडं केलंय नाम्या, असे गोणाई खूप वेळा भाव प्रकट करताना दिसतात. आपल्या मुलांची वाट पाहून थकलेली आई जेव्हा राऊळात जाते आणि आपला मुलगा पांडुरंगासमोर निश्चलपणे बसून असतो; तेव्हा गोणाईंचे मनोनाट्य, भावनाट्य अत्यंत स्पष्टपणे प्रकटले आहे. गोणाईंचे कवीमन इथूनच बहरत गेले.

गोणाई तेव्हा विठ्ठलाशी संवादक बोलू लागतात. इथे देव त्यांच्या काव्य-नाट्यातील केवळ एक पात्र आहे. गोणाईंना अभिमान आहे आपल्या मुलाचा - जो सर्वश्रेष्ठ प्रचारक, भावकवी, पद्य, संत चरित्रकार, भागवत धर्माचा प्रसारक आहे; परंतु त्याचबरोबर त्यांच्या काव्यात संसाराची तळमळसुद्धा आहे. म्हणून गोणाई विठ्ठलाला प्रश्न विचारतात,

**अगा ये विठोबा पाहे मजकडे ।**
**का गा केले वेडे बाळ माझे ॥**

आपला मुलगा आपल्यापेक्षा देवावर प्रेम जास्त करतो, ही गोष्ट गोणाईंना अभिमानास्पद वाटते; परंतु आईमन कधीतरी म्हणते,

**माझा नामा मज देई ।**
**जीव देईन तुझे पायी ॥**

तेव्हा विठ्ठलही क्षणभर गहिवरतो. त्यालाही मातृप्रेमाची ओढ लागते. त्या विठ्ठलाला गोणाई ही स्वतःचीच आई वाटू लागते. आईसाठी म्हणून विठ्ठल म्हणे,

**विठ्ठल म्हणे गोणाई ।**
**आपुला नामा घेऊन जाई ।।**

इथे साक्षात मातृप्रेम किती श्रेष्ठ आहे, हे स्वतः विठ्ठलाने दाखवून दिले आहे. आधी आई नंतर देव ही भावना जणू विठ्ठल गोणाईला समजावून सांगताहेत; परंतु काहीच क्षणात गोणाईंना परमेश्वराच्या विशाल हृदयाची जाणीव झाल्याने निर्वाणीच्या शब्दांचा त्या आधार घेतात.

मातृप्रेम मात्र गोणाईंच्या प्रत्येक अभंगातून आपल्याला दिसून येते. मातृप्रेमाच्या अनेक छटा गोणाईंनी आपल्या अभंगांतून उतरवल्या आहेत.

संत गोणाईंकडे पाहता सर्वसामान्य असणाऱ्या या स्त्रिया भक्तीच्या तेजाने असामान्यत्वाला पोहोचलेल्या दिसतात.

गोणाईची घालमेल आणि भक्ती पाहून विठ्ठलाला तिच्यापुढे नमते घ्यावे लागले, इतकी ताकद गोणाईच्या अभंगांत होती. गोणाईचं मातृत्व बघून विठ्ठल गहिवरला आणि नामदेवांना त्याने मातृप्रेमाची जाणीव करून दिली; परंतु पांडुरंगालाच आपली आई समजणाऱ्या नामदेवांनी विठ्ठलाच्याच पायाला मिठी मारली. तेव्हा मात्र गोणाईलाही खूप अभिमान वाटला. जणू पांडुरंगाचा पुत्रच आपण सांभाळतोय, ह्या भावनेने त्या धन्य झाल्या.

❁❁❁

# ५. संत राजाई

संत नामदेवांच्या पत्नी म्हणजे राजाई! नामदेव गाथेत ह्यांचे काही अभंग आहेत. नामदेवांच्या भक्तीमागे राजाईंनी कधीही आपला अधिकार गाजवला नाही. जनाबाई आणि मुक्ताई ह्यांच्या सान्निध्यात राहायला मिळाल्यामुळे त्यांना कधीही संसाराचा ताण जाणवला नाही. नामदेवांना भक्तीचे पिसे लागले आहे, हे राजाई जाणून होत्या. त्यामुळे नकळत संसाराची खूपशी जबाबदारी राजाईंवर होती. मुलांचे संगोपन, सासू सासऱ्यांची काळजी, गाठीला पुरेसा नसलेला पैसा, संसारात होणारी ओढाताण, शेती व्यवसायाकडे झालेले दुर्लक्ष ह्या सगळ्या गोष्टी बखुबीने सांभाळत, राजाई घरात जमलेल्या संतमंडळींचे आगतस्वागत करीत.

संत एकत्र संमीलित होतात, तेव्हा राजाई म्हणतात...

**काय सांगो यांची रीती ।**
**सोसे पाये चरणाप्रती ।।**
**अवघे भांबड भूत होती ।**
**नाचताना आनंद ।।**
**लौकिकात गेली वाया ।**
**एकाच्या एक पडती पाया ।।**
**म्हणती ये गा पंढरी राया।**
**ब्रम्हानंदे हलती ।।**

मुक्ताई आणि नामदेवांची पहिली भेट व्हायच्या आधी जनाबाई मुक्ताईंना भेटल्या आणि त्यांना नामदेवांच्या घरी घेऊन गेल्या. मुक्ताईंची तिथे राजाईंशी भेट झाली. ह्या हृदयाचे भाव त्या हृदयी कळले. तेव्हा मुक्ताई म्हणाल्या, 'साक्षात विठ्ठलाचे दुसरे रूप म्हणजे नामदेव आहेत. देवाचे पिसे लागले आहे त्यांना... त्यामुळे संसाराचा भार आणि नामदेवमहाराज दोघांना तुम्हालाच सांभाळायचे आहे. पाण्याला जाताना एकावर एक चार हंडे डोक्यावर घेतो. त्या हंड्यांचा तोल सांभाळून स्वतःचा तोल सांभाळावा लागतो, नाहीतर पवित्र उदक वाया जाण्याची शक्यता असते. **'तोल**

**सांभाळून दोन घरांचा'** हे स्त्री जातीला उपजतच ज्ञान असते'. हे ऐकून राजाई धन्य झाल्या व नामदेवांचा गर्व करू लागल्या. **'भरतार माझा देव'** असे समजून संत मांदियाळींची अखंड सेवा राजाईंनी केली. कुटुंबाची सून या नात्याने त्यांनी आपल्या मनोभावना प्रकट केल्या आहेत,

**कैची कुसुम सेज कैचे पटकूळ ।**
**फाटली वाकळ अंथरूण ।।**
**सदैवाच्या स्त्रिया अलंकारमंडित ।**
**मजवरी नाही प्रीत काय करू ।।**

असे म्हणून राजाई चक्क विठ्ठलाशी वाद घालतात. राजाईंच्या अभंगांत त्यांच्या स्त्रीसुलभ भावना, प्रपंच व परमार्थ, प्रापंचिक सुख-दुःख यांतील संघर्षांचे दर्शन घडते. रुक्मिणीकडून विठ्ठलाला निरोप धाडताना राजाई आपण सून आहोत, ह्याचा विसर पडू देत नाहीत, हे त्यांच्या अभंगाचे वैशिष्ट्य आहे.

**जीव ओढतो वरवर जाया चैतन्यापाठी ।**
**हाय सुटेना परि देहाची दृढ बसली गाठी ।।**

ह्या अभंगातील 'हाय' हा शब्द त्यांच्या मनातील स्त्रीभावना व्यक्त करतो.

नामयाची राजा भली नव्हे, असे विठ्ठलाला सांगून अत्यंत समजूतदार, सुजाण स्त्रीसंत म्हणून राजाई लक्षात येतात.

राजाईने विठ्ठलास नाही, तर रूक्मिणीस विनवले होते. एक स्त्रीच दुसऱ्या स्त्रीस समजू शकते, म्हणून राजाई आपलं सगळं दुःख रूक्मिणीला सांगत असत. एका अभंगांत त्या म्हणतात...

**अहो रुक्माबाई । विठोबासी सांगा ।।**
**भ्रतारासी का गा । वेडे केले ।।**
**चवदा मनुष्ये । आहे माझ्या घरी ।।**
**हिंडती दारोदारी । अन्नासाठी ।।**

आधी जरी राजाईने तक्रारीचा सूर लावला असला, तरी नामदेवांचं आत्मिक वैभव पाहून मात्र त्या स्वतःला धन्य समजायला लागल्या. स्वतःला वैभवशाली समजू

लागल्या. म्हणूनच त्या रुक्मिणीस म्हणाल्या,

**आता या संसारी ।**
**मीच धन्य जगी ।**
**जे तुम्हा अर्धांगी ।**
**विनटले ।।**

❀❀❀

# ६. संत लाडाई

संत लाडाई ही नामदेवांची थोरली सून! नाराची पत्नी! आज संत लाडाईचे केवळ दोनच अभंग उपलब्ध आहेत.

नामदेवांच्या समाधी समयी लाडाई हयात होत्या. त्या बाळंतपणासाठी कल्याण येथे माहेरी गेल्या होत्या.

एकीकडे प्रसूतीचा आनंद होता; तर दुसरीकडे कुटुंबाच्या समाधीचा शोक होता.

संत लाडाई यांना तीव्र दुःख झाले; कारण त्या पंढरपुरात नसताना त्यांच्या कुटुंबाने विठ्ठलचरणी शांत होण्याचा निर्णय घेतला. **'मी परकी होती का?'** ही खंत त्यांना वाटते.

**सर्वांनी हा देह अर्पिला विठ्ठली ।**
**मज का ठेविले पापिणीसी वेगळी ।।**

असे म्हणून त्या स्वत:च्या अस्तित्वाचाच सर्वस्वी धिक्कार करतात, स्वत:ला पापिणी म्हणवून घेतात, शोक करतात, प्राणायाम करून देहत्यागाची भाषा करतात. यातून त्यांचा निर्धार आणि कुटुंबावरील प्रेम दिसते.

शके १२७२, आषाढ महिन्यातील कृष्ण त्रयोदशीला सर्व नामदेव कुटुंब विठ्ठलचरणी शांत झाले. हा निर्णय घेताना लाडाईचा विचार का केला नाही, असे त्या विठ्ठलालाच विचारतात.

माणसांच्या भरल्या घरात आज मीच एकटी जिवंत राहिल्यामुळे अनाथ झाले असे वाटतेय, हे त्या आपल्या अभंगातून विठ्ठलास सांगतात. अनाथांचा नाथ म्हणत लाडाई विठ्ठलाला विनवणी करते की,

**बापा विठ्ठला करी कृपादान ।**
**सांभाळी वचन आपुले ते ।।**

लाडाईंना एकाकी झाल्यासारखे वाटतेय. त्यांचे बाळामध्ये लक्षच लागत नाही. तुकारामांसारख्या श्रेष्ठ संतांनीदेखील लाडाईंच्या अभंगांसकट नामेदवांच्या कुटुंबाच्या अभंगांचे गुणगान गायिले आहे.

संत नामदेवांच्या उर्वरित कुटुंब सभासदांच्या अभंगांचा संत तुकारामांनी एका अभंगात परामर्श सादर केला आहे,

**चौऱ्याण्णव लक्ष रंगाईची वाणी ।।**
**प्रेमे चक्रपाणी आळविले ।।**
**दोन कोटी अभंग राजाईची करुना ।।**
**प्रेम नारायण आळविले ।।**
**लाडाई – गोणाई आळविले ।।**
**लाडाई – गोणाई येसा साखराई ।।**
**कवित्व पाही दीड दीड कोटी ।।**

पुढे लाडाईंनी आपले मूल आपल्या आईपाशी ठेवून परमार्थ मार्ग स्वीकारला.

**लाडाई म्हणे देवा भेट देई वेगी ।।**
**ब्रीद तुझे जगी दीनानाथा ।।**

संत नामदेवांच संपूर्ण कुटुंब तसं विठ्ठलमय होते. कुटुंबातील माणसांची एकूण संख्या चौदा होती.

ह्या सगळ्यांच्या भक्ती पेक्षाही नवल त्यांच्या अभंगाचे वाटते. अभंग लिहिताना त्यांनी फार अलंकारिक भाषा वापरली नाही. ना त्यांनी कोणी शब्दांचा सोस धरला. तरीही प्रत्येक अभंगात आपली श्रद्धा दाखवली.

लाडाईने अभंग लिहिताना ना अलंकारिक भाषा वापरली, ना शब्दांवर जोर दिला, ना छंद वृत्त पाहिले. जे मनात आले, ते त्यांनी आपल्या अभंगांत लिहिले आणि आपली श्रद्धा दाखवली.

❀❀❀

# ७. संत नागरी

संतसाहित्य म्हटल्यावर आपल्या डोळ्यांसमोर पहिले चमत्कार येतात. अर्थात् संतांचं श्रेष्ठत्व हे चमत्कारांवर नाही, तर त्यांच्या साहित्य आणि भक्तीवर अवलंबून असते, हेच खरे संतांचे विचार! भक्ती, प्रेम एका पिढीतून दुसऱ्या पिढीला उभारी देते, हे आपण वेळोवेळी अनुभवले आहे.

वारसाहक्काने पुढच्या पिढीत भक्ती यावी आणि ती भक्ती त्या पिढीत मिरवावी, ह्यासारखं भाग्य नाही. अशी वारसाहक्काने भक्ती मिळालेली व्यक्ती म्हणजे संत नागरी!

संत नागरी ऊर्फ नागी ही नामदेवांची पुतणी ! म्हणजे नामदेवांचा भाऊ रामया यांची मुलगी.

'नामयाची दासी नागी दुसरी जना त्यांनी सेवा करुनी वश किले', असा उल्लेख गोंदाच्या अभंगात आहे. नागी ऊर्फ नागरी ह्यांच्या अभंगांचं हस्तलिखित बाड सासवड येथे संत सोपानदेवांच्या मठात आहे.

नागरी यांना मराठी साहित्यात खूप मानाचे स्थान आहे; कारण संत नागरी यांनी आपल्या आठ अभंगांतून ५६ कडव्यांत २३८ ओळींत स्वत:चे आत्मकथन लिहिले आहे. स्वत:ची समग्र जीवनकथा सांगितली आहे. म्हणून त्यांना मराठीतील आद्य स्त्री आत्मकथाकार म्हणून संबोधले जाते, अनेक मराठी वाङ्मयकारांनी त्यांच्या आत्मकथेचा अभ्यास केला आहे.

**रामयाची कन्या गोरटी गोवळी ।**
**बापे बोलविली सासुरिया ।।**

ह्या ओळींनी त्यांनी आपल्या आत्मकथनाला सुरुवात केली आहे.

अनेक साहित्यिक इतिहासकारांनी संत नागरी यांची तुलना संत बहिणाबाईंशी केली आहे; परंतु डॉ. तारा भवाळकर यांनी संत नागरी आणि संत सखू यांच्यातील साम्य दाखवून दिले आहे.

माहेरी विठ्ठलाची महाभक्ती आणि त्याच्या बरोबर विरुद्ध सासर. म्हणजे

सासरी विठ्ठलाचे नावही घेतलेले चालत नसे. त्यामुळे संत नागी यांची प्रचंड कुचंबणा झाली. खूप हाल झाले. विठ्ठलाचे वेड लागलेल्या संत नागी ह्या जिवंत प्रेतासारखे जगणे जगत होत्या. शेवटी सासरकडच्यांना विनंती करण्यासाठी वडील रामया आले, तरी सासरकडच्यांनी रामयांबरोबर त्यांना वारीला पाठविले नाही; तेव्हा मात्र नागी दुःखी झाल्या. त्यांनी वडिलांना नमस्कार करून वारीस जाण्यास सांगितले. स्वतः घरात विठ्ठलाचा धावा करीत होत्या. इथे वडील महाद्वारापाशी पाहतात, तर नागी उभी होती. तिला पाहून नामदेव आणि रामय्या दोघांनाही खूप आनंद झाला. संत नागी विठ्ठल रंगात रंगून गेली होती. एका भाससृष्टीत वावरत असतानाच त्यांनी प्राण त्यागला! जेव्हा नामदेव स्वतः नागी यांच्या घरी गेले, तेव्हा ते (सासरचे) लोक म्हणाले, 'नागी घरातच आहे'. पण पाहतो तर त्यांनी प्राण त्यागले होते. हा चमत्कार पाहून नामदेवांनी संत नागीच्या भक्तीचे खूप कौतुक केले.

**निवांत नागरी गिळून ठेली वाचा ।**
**लोटला सुखांचा महापूर ।।**

सुख हे मानण्यावर असतं. प्रत्येकाची सुखाची व्याख्या वेगळी असते, पण संत नागरी यांच्या दृष्टीने सुख म्हणजे वारी करणे आणि विठ्ठलाचे दर्शन घेणे. हाच वारीचा ध्यास त्यांना मोक्षप्राप्तीकडे घेऊन गेला.

डॉ. तारा भवाळकर यांनी संत नागरीची तुलना संत सखूशी केली आहे. संत नागरी यांनी दाखवून दिले की, नामाचा महिमा किती श्रेष्ठ आहे. केवळ नामातूनही ईश्वरप्राप्ती होऊ शकते. केवळ सुखाच्या परिभाषा बदलल्या पाहिजेत. त्यासाठी विठ्ठल म्हणजे सुख, हे अंतिम सत्य असायला हवे.

❀❀❀

# ८. संत सोयराबाई

महाराष्ट्रात एकही मराठी माणूस असा नसेल, ज्यांनी संत सोयराबाईचा 'अवघा रंग एक झाला' हा अभंग ऐकला नसेल!

संत सोयराबाई या प्रसिद्ध संत चोखामेळा यांच्या पत्नी. चोखामेळा यांच्या खांद्याला खांदा लावून त्या साथसोबत करत होत्या. मंगळवेढा येथे राहणाऱ्या सोयराबाई पारमार्थिक प्रवृत्तीच्या होत्या. आपल्या अभंगात त्यांनी विटाळासारख्या मुख्य विषयावर विचार प्रकट केले आहेत. सोयराबाईंना विटाळ संकल्पनेने अस्वस्थ केले असावे. त्या म्हणतात,

**देहासी विटाळ म्हणती सकळ ।**
**आत्मा तो निर्मळ शुद्धबुद्ध ।।**
**देहाचा विटाळ देहीच जन्मला ।**
**सोहळा तो झाला कवणधर्म ।।**

देहाकडून मनाकडे आणि मनाकडून आत्म्याकडे सोयराबाईंचा प्रवास चालू होता. आत्मा हा शुद्धबुद्ध आहे, तो निर्मळ आहे; परंतु देह नश्वर आहे. हा सगळा खेळ या पंचमहाभूतांचा आहे, हे सोयराबाईंनी अभंगातून मांडलेले तत्त्वज्ञान आहे. आत्मप्रचिती झाल्याने सोयराबाईंनी तत्त्वज्ञानाचा उपदेश केला आहे.

मायबाप, अनाथांचा नाथ, अनंतांचा नाथ ही विशेषणे सोयराबाई आणि चोखोबांनी विठ्ठलासाठी आपल्या अभंगांत वापरली आहेत. विठ्ठल जणू देणेकरी असावा सोयराबाईंचा! अशा थाटात सोयराबाई धरणे धरून विठ्ठलाच्या दारात बसतात. तिथे सोयराबाई नामस्मरणाचं महत्त्वसुद्धा सांगतात. हरी शब्द उच्चारता सहज मुक्ती प्राप्त होते, असा विश्वास त्यांनी आपल्या अभंगात मांडला आहे.

हा संसार खोट्याचा पसारा आहे, शरीर नाशवंत आहे. ह्यामध्ये सोयराबाईंनी परिपक्व विचार समाजाला दिला अहे. आपण कोण आहोत, या गोष्टीचा प्रत्येकाने विचार केला पाहिजे. त्यासाठीच सोयराबाई 'आपुली आपण करा आठवण' असा

मार्मिक उपदेश देते. आपण कोण आहोत हे नसेल कळले, तर त्यासाठी सोयराबाई नामस्मरणाचा उपाय सांगतात.

विठ्ठलाशी हितगूज करण्याआधी त्या विठ्ठलाच्या पायाला घट्ट मिठी मारतात आणि आपली खंत बोलून दाखवतात की, ह्या संसारापासून आपल्याला दूर जायचे आहे. विठ्ठलाला त्या लवकर संसाराचा पाश तोडा, अशी विनंती करतात. विठ्ठल दर्शन झाल्याचा आनंद सोयराबाईंच्या चेहऱ्यावर अखंड असल्याने 'जन्माचे साकडे फिटले' असे त्यांना वाटत आहे.

संत निर्मळाबद्दल असलेले प्रेम आणि त्यांची थोरवी गाऊन निर्मळाबाईंचा अधिकार त्या स्पष्ट करतात. चोख्यामेळ्याच्या अपघाती निधनानंतर निर्मळेची म्हणजे चोखामेळा याची बहीण असलेल्या निर्मळाची समजूत काढायला विठ्ठल मंगळवेढ्याला आले. निर्मळेस आधार देऊन त्यांच्या पाठीशी सोयराबाई खंबीरपणे उभ्या राहिलेल्या ठायीठायी आपल्याला दिसतात.

सोयराबाईंनी अभंगातून उपदेशापेक्षा आपले स्वानुभव व्यक्त केले आहेत. संसाराचे सुख हे भासमान आहे. **'अभ्राची छाया काय साच करी'** म्हणजे ढगांची सावली टिकणारी नसते. आज आहे तर उद्या नाही, अशा सावलीत कशाला उभं रहायचं? म्हणून वासनांचा त्याग करून आत्मकल्याणाकडे लक्ष द्यावे, इतका साधा विचार चिंतनाच्या दृष्टीने सोयराबाईंनी मांडला आहे.

सोयराबाईंनी आपले जीवन अभंगातून उलगडताना त्याला भक्तीचा आणि जिव्हाळ्याचा स्पर्श दिला आहे.

❀❀❀

# ९. संत निर्मळा

संत निर्मळा म्हणजे संत चोखामेळा यांची लहान बहीण. संत निर्मळा यांनी आपला भाऊ चोखोबा यांनाच गुरू केले होते.

संत निर्मळांच्या आईचे नाव सावित्रीबाई आणि त्यांचे वडील सुदामा येसकर होत; परंतु वाङ्मय इतिहासकार म्हणतात, त्यांच्या आई-वडिलांचं नाव मीराबाई आणि निवृत्ती असावं. संत निर्मळांचे अभंग करुणेला साद घालणारे आहेत. त्या आपल्या वहिनीला संत मानीत.

निर्मळेच्या अभंगात तिच्या नावाप्रमाणेच निर्मळता व साधेपणा आहे, असे मराठी वाङ्मयकोशात म्हटले आहे. चोखोबांच्या कुटुंबीयांचे अभंग पाहिले तर सगळ्यांनी (चोखोबा, सोयरा) निर्मळेचा अत्यंत आदरपूर्वक, सन्मानपूर्वक उल्लेख केला आहे.

संत सोयराबाई वहिनी, संत का पती संत चोखोबा भाऊ, अशी संतपरपंरा निर्मळाला मिळाल्यामुळे त्यांची भक्ती अधिक फुलली. 'सकळ संत गाथे'मध्ये निर्मळा बाईंचे २४ अभंग उपलब्ध आहेत. चोखोबांच्या अभंगात संत निर्मळांचं महत्त्व आणि त्यांचा पारलौकिक गुण सांगितला आहे.

संत निर्मळाबाईंनी आपल्या प्रत्येक अभंगात नामस्मरणाचे महत्त्व सांगितले आहे. त्या म्हणतात,

**मज नामाची आवडी ।**
**संसार केला देशधडी ।।**
**सापडले वर्म सोपे ।**
**विठ्ठल नाम मंत्र जपे ।।**

त्यांच्या परमार्थाचा प्रवास नामाची गोडी लागल्यामुळे सुरू झाला, असे म्हणताना आपला संसार देशोधडीला गेला, ह्याचे कणमात्र दुःख त्यांना नाही. लौकिक सुखात न अडकता अलौकिक सुखाचा लागलेला ध्यास त्यांनी आपल्या अभंगात स्पष्ट केला आहे,

**चहुकडे देवा दाटला वणवा ।**
**कां न ये कनवा तुजलागी ।।**

संसारातील दाहकता वणव्याच्या रूपात मांडून, कनवा शब्द लिहून कारुण्य प्रकट करणाऱ्या संत निर्मळा ह्यांना मोक्षाचे वेध लागले आहेत, हे त्या विठ्ठलाकडे स्पष्ट करताना ठायीठायी आढळतात.

चोखोबांचे अपघाती निधन होताच त्या विठ्ठलाला जाब विचारतात की, 'तू चोखोबांना विश्रांती दिली, मग मला का नाही दिली? मला का वाऱ्यावर सोडलंस? मला ह्या संसारात रस नाही, हे मी केव्हापासून सांगतेय, का माझे जिणे पराधीन केलेस?'

**का बा पंढरीराया मोकलिले आज।**
**नाठवेचि मज दुजे काही ।।**
**आता बहु बोलणे सारोनिया ठेवा।**
**उगवा हा गोवा मायबाप ।।**

संतांची संगत मला लाभू दे, असा हट्ट निर्मळा देवाकडे करतेय.

पुण्यप्राप्तीसाठी यज्ञ, दान, धर्मापेक्षा केवळ नामस्मरण हा सोयीस्कर उपाय आहे, असे संत निर्मळाबाईंचे म्हणणे आहे. अनंत जन्मी जगून मिळवलेले पुण्य यापुढे एका जन्मातील नामस्मरण वजनाने जड पडते, असा त्यांना विश्वास आहे. पांडुरंग स्वतः म्हणतो, 'निर्मळा श्वास घ्यायला विसरेल, पण माझं नाव घ्यायला विसरत नाही.' म्हणूनच चोखोबा गेल्यावर स्वतः पांडुरंग तिची समजूत काढायला आले होते, तेव्हा निर्मळा म्हणाली, **'तुजविण मज कोण गणगोत?'** ह्या एका अभंगात भक्त आणि विठ्ठल यांच्यातील जिव्हाळा ती प्रकट करते. स्त्री कवितेत केवढे प्रतिभासामर्थ्य आणू शकते, हे संत निर्मळाचे अभंग वाचून कळते. पुढील अभंगातून त्या म्हणतात,

**आता कळेल तो करावा विचार ।**
**मी आपुला भार उतरिला ।।**

असे म्हणत, शेवटी निर्मळांनी आपल्या जीवनाचा सर्व भार पांडुरंगावर टाकला,

**रात्रंदिवस मन करी तळमळ।**
**बहु हळहळ वाटे जीवा।।**
**महाद्वारी चोखा तयाची बहीण।**
**घाली लोटांगण उभयता।।**

असे म्हणत चोखोबा आणि विठ्ठल यांना ती राऊळात लोटांगण घालते आणि समाधिस्थ होते.

❀❀❀

# १०. संत भागूबाई

प्रत्येक संत कवयित्रींच्या काव्यातून त्यांच्या पृथगात्मतेचा परिचय होतो. संत कवयित्रींच्या अनुभवविश्वाचा विचार आपल्याला थक्क करून सोडणारा आहे. त्यांच्या काव्यात गूढ, उदात्त व आनंददायी असा आशय असतो. या संत कवयित्रींत अजून एक भर म्हणजे संत भागूबाई होत. त्यांचे आता केवळ चार-पाच अभंग उपलब्ध आहेत. 'प्राचीन गीत भांडार' यात त्यांचे दोन अभंग असल्याचा उल्लेख आहे.

भागूबाईंचा विठ्ठलाला खूप साधाभोळा प्रश्न आहे की, 'जर तू इतर संतांना भेटतोस, तू इतर संतांशी बोलतोस, तर पांडुरंगा, मग माझ्याशी का नाही बोलत? माझे अपराध तू का नाही पोटात घालत.' हाच भाव भागूबाईंच्या दोन-तीन अभंगांतदेखील आढळतो. त्या म्हणतात,

**आलो तुझ्या दर्शनासी। भेट द्यावी हो आम्हासी।।**
**सर्व संत हो राऊळी। मी रे एकटी तळमळी।।**

संत भागूबाई दिवसरात्र विठ्ठलाचीच स्वप्ने बघत असतात. कधीकधी स्वप्न, सत्य काय, हे ही त्यांना कळत नाही, इतक्या त्या विठ्ठलमय झाल्या आहेत. एकदा तर स्वप्नसृष्टीत वावरताना त्या म्हणाल्या,

**'देव आले हो बाहेरी। मज नेले खांद्यावरी।।'**

इथे खरे तर 'खांद्यावरी' ह्या शब्दांत त्यांनी वेगळा भाव मांडलाय. आपल्याकडे खांदा शेवटी द्यायला लागतो. शेवटी चार खांदे लागतात. जणू तीन खांदे तयार आहेत; परंतु तुझा खांदा महत्त्वाचा आहे, तो मिळाल्याशिवाय कोणाला मुक्ती नाही. तो खांदा मिळावा, ह्यासाठी संत आयुष्य वेचतात, हे मला माहीत आहे, तरी तू तुझा खांदा मला दे, नाहीतर खांद्यावर बसून मला तुझ्या राऊळात ने.

भागू सरळ विठ्ठलास प्रश्न विचारते की, 'तू असताना बाकीचे लोक मला का त्रास देतात. तुझा मग उपयोग काय? तू काय म्हणून राऊळात उभा आहेस?'

**तुज असता मज गांजती जन।**
**मग काय जिणे देवा तुझे।।**

एवढा धीट प्रश्न देवाला विचारायला देवावर किती अधिकार हवा. तो अधिकार जणू भक्तीने भागूबाईला मिळाला असावा; म्हणून भागू विठ्ठलाच्या अस्तित्वावर प्रश्न विचारतेय. भागूबाईंना ज्ञानेश्वरांच्या अभंगाची आठवण येते. त्या ज्ञानेश्वरांबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना दिसतात. त्यांच्या भिंत चालवण्याचा उल्लेख करतात. हा चमत्कार तुझ्यामुळे झाला. विठ्ठला, तू कृपा केली असावी, तशी कृपा होण्यासाठी मी काय करावे, हे तरी सांग. ज्ञानेश्वर माउली कृपाळू होती, म्हणून तू मदत केली का. असा कृपाळूपणा अंगात असावा, असे भागूबाई सांगतात.

**भिंती चालवली। ऐसी कृपाळू माऊली।।**

ज्ञानेश्वरांची त्यांना पदोपदी आठवण येते. विठ्ठलाला त्या कधी सखा, तर कधी मायबाप म्हणतात, कधी बंधू म्हणतात, तर कधी गुरू! परंतु, भय मात्र आता त्यांना राहिले नाही, हेसुद्धा त्या विठ्ठलाकडे स्पष्ट करतात. आपण निर्भय होण्यामागे विठ्ठल कारण आहे, असेही त्या प्रांजळपणे नमूद करतात.

सतत एका भास सृष्टीत त्या वावरायच्या. विठ्ठला शिवाय त्यांना दुसरं कोणी दिसायचच नाही. केवळ भक्तीचा ध्यास! ह्या भक्तीनेच सामान्य स्त्रियांच्यात खूप मोठे परिवर्तन घडवून आणले. स्त्रीला तिच्या अस्तित्वाची जाणीव झाली. जनाबाई म्हणायच्या स्त्री जन्म म्हणोनी न व्हावे उदास!

ह्याच जनाबाईच्यां विचारांना आदर्श मानून आपल्या दुःखाचं त्यांनी कधी प्रदर्शन केले नाही.

भागूबाई ह्या चोखामेळा ह्यांच्या परिवारातील होत्या. त्यांच्या वाट्याला आलेलं उपेक्षित जीवन त्यांनी आपल्या अभंगात कथन केले आहे. त्यांना मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश नसल्याने देवाचे दर्शन घेता येत नव्हते, परंतु रस्त्याची सगळी झाडलोट त्याच करायच्या, ज्या रस्त्यावरून लोक मंदिरात जायचे.

शेवटी एकदा त्यांनी थेट बाहेरून विठ्ठलाला सवाल केला की, ‘तू माझी आई आहेस. मी गाभाऱ्यात येऊ शकत नाही, तरी तू मला बाहेर भेटायला येशील का?

मी तळमळतेय तुला पाहण्यासाठी. एकदा तरी मला तुझं रूप दाखव, तू कसा आहेस?’

आणि चक्क भागूबाईला भेटण्यासाठी विठ्ठल बाहेर आला. त्यावेळीसुद्धा भागूबाई आधी ज्ञानेश्वरांचे आभार मानायला विसरल्या नाहीत, कारण भक्तीची रीत ज्ञानोबांनी शिकवली, असा त्यांचा विश्वास होता.

**भागू म्हणे आता । झाले निर्भयी ।।**

भयमुक्त होऊन त्या गीत गाताहेत, कारण त्यांना भक्तीचा अर्थ कळला आहे.

ज्ञानेश्वरांची प्रार्थना करताना त्या म्हणाल्या,

**कृपेचा सागर ।**
**मायबाप ज्ञानेश्वर ।**
**तारिले मज ।।**

❁❁❁



# ११. संत कान्होपात्रा

कान्होपात्राने आपल्या अल्प; परंतु वैशिष्ट्यपूर्ण काव्यशैलीतून पंढरीचे माहात्म्य वर्णिले आहे. गणिकेच्या घरी जन्म झाल्यामुळे कान्होपात्रास देवळात जाता येत नव्हते, ही खूप मोठी खंत कान्होपात्रास लागली होती. कान्हो हे नाव आणि पात्र ही जात. उदा. नामदेव 'शिंपी', गोरा 'कुंभार', सावत्या 'माळी'; त्याप्रमाणे कान्होपात्रा हे नाव असलं, तरी नाव कान्हो आणि पात्र म्हणजे गणिका. यादवकाळात हाच अर्थ प्रचलित होता. बालपणी नामदेवांच्या कृष्णलीला ह्या अभंगावर रियाज करताना कान्होपात्रा हरवून जायची. कान्होपात्राचे स्वतःचे असे केवळ रडू अभंग आहेत. त्यांतील सर्वपरिचित अभंग म्हणजे सर्वांत शेवटचा अभंग. त्यात त्या म्हणतात,

**नको देवराया अंत आता पाहू।**
**प्राण हा सर्वथा जाऊ पाहे।।**
**हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले।**
**मज लागी जाहले तैसे देवा।।**

ह्या अभंगातील आर्तता, करुणा, व्याकुळता मनाला भिडते. 'करुणा' हा तिच्या एकूणच मनोवस्थेचा आणि अभंगांचा स्थायीभाव आहे. दारावरून जाणाऱ्या वारीचे कुतूहल कान्होपात्रेस होतेच, परंतु वारीत सामील झाल्यावर मिळालेला जिव्हाळा, प्रेम, आस्था हा तिच्या भक्तीचा पाया होता. पंढरपुरात विठ्ठलात साक्षात कृष्ण पाहताना आपण लहानपणापासून ह्यांची तर भक्ती करतोय, हा मिळालेला

विश्वास कान्होपात्रास पुढील जीवनात खूप महत्त्वाचा ठरला. नामस्मरणाने देवाच्या हृदयात स्थान मिळते, हा वारीत मिळाला संदेश कान्होपात्रेस अधिक विठ्ठलाजवळ घेऊन गेला.

पंढरी हे संतांचे विश्रांतीचे स्थान. विषमतेची बेडी तोडणारा विठ्ठल हा देव सर्वांनाच आपला वाटणारा असला; तरी कान्होपात्रास तो विठ्ठल जळी–स्थळी, उठता–बसता, खाता–पिता दिसत होता. नामस्मरणाने कान्होपात्राने विठ्ठलाला नसानसांत वसवले होते. आपल्या पुढील अभंगात त्या म्हणतात,

**माझे माहेर पंढरी। सुखे नांदू भीमातीरी।।**
**येथे आहे मायबाप। हरे ताप दरुशने।।**
**निवारली तळमळ चिंता।**
**गेली व्यथा अंतरीची।।**

कान्होपात्राच्या व्यक्तिमत्त्वात अपार निष्ठा आणि उदंड श्रद्धा प्रकर्षाने जाणवते. 'सकल संतगाथे'त त्यांचे २३ अभंग आहेत आणि 'महाराष्ट्र संत कवयित्री ग्रंथा'त चार अभंग आहेत. हे चारही अभंग विठ्ठलभक्तीला वाहिलेले आहेत. पंढरपुरात गरुडपारावर बसून कान्होपात्रा रोज देवाचे भजन करीत असत. त्यांनी एका अभंगात म्हटलंय, 'चारी वेद सहा शास्त्रे ज्यांचे गुणगान गाऊन थकले, पुराणेही भांबावून गेली, हरिहर ब्रम्हादिकसुद्धा ज्याच्यासाठी तप करीत राहिले, तोच हा पांडुरंग माझा धनी आहे. त्याचे नामस्मरण केले, तरच जन्माचे भले होते.' पिंगळा, वाल्याकोळी, अजामीळ हे सगळे केवळ नामस्मरण केल्यामुळे पवित्र झाले आहेत. त्या म्हणतात,

**घ्या रे घ्या रे मुखी नाम।**
**अंतरी धरोनिया प्रेम।।**
**माझा आहे भोळा बाप।**
**घेतो ताप हरोनी।।**

कान्होपात्रा पांडुरंगाचा महिमा गाताना ज्ञानदेव, मुक्ताई, नामदेव, जनाबाई अशा सगळ्या संतांना आपल्या अभंगात गुंफते. ज्ञानेश्वरांचे चमत्कार अद्भुत आहेत, असा संदर्भ त्यांनी आपल्या अभंगात दिला आहे,

**प्रत्यक्ष पैठणी भटां दाविली प्रचिती।**
**रेडियाचे मुखें वदविली वेदश्रुती।।**

असे म्हणत संतांबद्दल कृतज्ञ भाव कान्होपात्रा व्यक्त करते.

बिदरच्या बादशहाला कान्होपात्राच्या सौंदर्याची ख्याती कळाली, तेव्हा त्याने तिला पकडून आणण्यासाठी आपले शिवाई तिच्याकडे पाठवले. ते बादशाहाचे शिपाई बाहेर कान्होपात्रेची वाट पाहत असताना थट्टा करत असतात की, 'विठ्ठल तुला काय तारणार?' तेव्हा परपुरुषाचा स्पर्श होऊ न देणारी कान्होपात्रा आपल्या भक्तीने बादशाहाच्या शिपायांना दाखवून देते की, माझा देव मला नक्की तारणार. तो माझा अंत नाही पाहणार.

**विठ्ठलाची कान्होपात्रा।**
**नामस्मरणाची मात्रा ।।**

देवाचे वेड एखाद्या व्यक्तीला कोणी दुसऱ्या व्यक्तीने सांगून लागत नाही आणि कोणी दुसऱ्याने नको म्हणून ते वेड मनातून जातही नाही; कारण कालांतराने प्रत्येक व्यक्ती मूळ स्वभावावर ठाम असते. कधीकधी एखाद्या व्यक्तीला अगदी लहानवयात देवाची आस लागते आणि एखादी व्यक्ती अगदी म्हातारी होऊन जाते, तरी देवापासून दूर राहते. खरेतर लहान मुलांना संस्कार लावताना त्याची सुरुवात देवापासूनच होते; परंतु आपली आई इतर आयांसारखी आपल्याला देवळात का नेत नाही, हा प्रश्न पडलेल्या कान्होपात्रांना अत्यंत लहानवयात कृष्णाचे वेड लागले होते. एकदा कीर्तनात बुवा मोठ्या आदराने संत नामदेवांचा उपदेश सांगत होते. जसा देवावर दृढ विश्वास बसण्यासाठी, एकतर त्या देवाबद्दल माणसाच्या मनात प्रचंड निरपेक्ष श्रद्धेचा ध्यास असावा लागतो, नाहीतर त्या देवाच्या परंपरेचा खूप मोठा इतिहास घराण्यात असावा लागतो किंवा देवाने चमत्कार दाखवावा लागतो; तर कुठे माणसांचा देवावर विश्वास बसतो. परंतु, भक्तावर विश्वास बसण्यासाठी मात्र देवाला भक्ताच्या भक्तीत केवळ शुद्ध, निर्मळ भाव आणि अंतःकरणापासून मारलेली हाक, एवढेच अपेक्षित असते. कारण निव्वळ पतितांचा उद्धार करणे, हे देवाचे ब्रीद आहे. जातपात, गरीब-श्रीमंत, धर्म असा कोणताही भेदभाव परमेश्वर कधीच मानत नाही.

बुवांचे हे कीर्तन वेशीवर लहानशी कान्होपात्रा चोरून देवळाबाहेर उभे राहून ऐकत होती. बुवांच्या कीर्तनातील हा नामदेवमहाराजांचा उपदेश लहानशा कान्होपात्रांच्या मनात खोलवर रुजला. शुद्ध, निर्मळ भावाने कान्होपात्रा रोज कृष्णाची मनोभावे भक्ती करायच्या. लहान मुलांच्या मनावर कोणत्याही गोष्टींचा लवकर परिणाम होतो, त्यातलाच हा एक भाग होता. नामदेवमहाराजांनी रचलेले कृष्णमुरारीच्या बालक्रीडेवरचे अभंग गाताना तर, आपण पूर्णपणे कृष्णमय झालो

आहोत, असे कान्होपात्रांना ठामपणे वाटायचे.

ज्ञानेश्वरमहाराजांच्या विरहिण्या आणि जातिभेदाचा समूळ नाश करून 'भक्ती' हा भाव जनमानसांत रुजवताना, प्रल्हादावरील लिहिलेल्या ओव्या त्यांना प्रचंड आवडायच्या. एकतर लहान वय, त्यात नुसते घरात बसून राहायचे, कोणाकडे येणे ना जाणे. वडील कोण, हे ही माहीत नाही. आपण वेशीबाहेर का राहतो, हे कळायचे नाही. खेळायलाही कुणी घ्यायचे नाही. त्यामुळे आपल्याला एक कृष्ण आणि दुसरी आई ह्या पलीकडे जग नाही, हे कान्होपात्रांनी लहानवयातच ओळखले होते. केवळ म्हणूनच कान्होपात्रा कृष्णाच्या भक्तीत रममाण झाल्या होत्या. त्यांचे अंतःकरण कृष्णमय असतानाही त्यांना एक खंत होती की, आपली आई इतर मुलांसारखे आपल्याला देवळात का नाही घेऊन जात आणि दुसरी खंत होती की, आपण वेशीच्या बाहेर का राहतो ?

लहान मुलांच्या मनात नेहमी सगळ्यात जास्त प्रश्न घुटमळत असतात आणि मोठ्या माणसांनी वेळीच जर त्या प्रश्नांची उत्तरे दिली की, त्यांची बौद्धिक क्षमता शतपटीने वाढते. ह्या भावनेने ह्या दोन प्रश्नांची उत्तरे त्यांची आई त्यांना फार प्रेमाने द्यायची.

एकदा देवळात जायचा अति हट्ट कान्होपात्राने केल्यावर आईने त्यांना सांगितले की, आपल्यासारख्या लोकांना देऊळ वर्ज्य आहे. तेव्हापासून मात्र कान्होपात्रांनी आपल्या घरातील कृष्णमूर्तीला आपली सखी, आपले वडील, आपले गुरू, आपला पाठीराखा, आपले भावंड मानायला सुरुवात केली.

थोडे मोठे झाल्यावर कान्होपात्राला कळले की, आपण गणिकेची कन्या आहोत, म्हणून आपण उपेक्षित जीवन जगतो आहोत.

**पतित तू पावना।**
**म्हणविसी नारायणा।।**
**जरी सांभाळी वचन।**
**ब्रीद वागविसी जाण।।**

असे म्हणणाऱ्या कान्होपात्रांना केवळ आपुलकीची अपेक्षा होती. त्या आपुलकीचा शोध कान्होपात्रांना मंगळवेढ्यातून जाणाऱ्या पंढरपूरच्या वारीत प्रथम लागला. आपण नायकिणीची मुलगी आहोत असे सांगूनही जेव्हा सगळ्या वारकऱ्यांनी त्यांचे प्रेमाने स्वागत केले, तेव्हा विठ्ठलाच्या वारीत इतके प्रेम, आदर, आपुलकी; तर त्या विठ्ठलाच्या हृदयात किती प्रेम असेल, ह्या विचाराने कान्होपात्रा भारावल्या.

विठ्ठलाच्या दारी उच्च, नीच, हीन, पतित हा भेदभाव नसून केवळ भक्ती तिथे रुजू होते, असे ऐकल्यावर, त्या विठ्ठलाला डोळे भरून पाहिलेच पाहिजे, म्हणून आईकडे हट्ट करून पंढरपुरी वारकऱ्यांसोबत गेल्या. पंढरीत पोहोचल्यावर त्यांना विठ्ठलातही कृष्ण दिसला आणि त्या क्षणापासून कान्होपात्रांनी विठ्ठलाचा ध्यास घेतला. आपला उद्धार केवळ विठ्ठलच करू शकतो, अशी त्यांची पक्की खात्री झाली. परमेश्वराला प्रसन्न करून घेण्याचा नामस्मरण हा सुलभ मार्ग आहे! ह्या ज्ञानेश्वरांनी सांगितलेल्या वचनावर त्यांचा विश्वास बसला आणि दिवसरात्र त्यांनी परमेश्वराचे नामस्मरण सुरू केले. परंतु, त्यांच्या आईला वाटे की, कितीही नामस्मरण केले, तरी त्याचा उपयोग होणार नाही. काही गोष्टींना समाज मान्यताच देत नाही. म्हणून त्यांची आई कान्होपात्रा यांस म्हणाली, ''तू कितीही ठरवलं स्वतःचा उद्धार करायचा, तरी समाज तुला तसे वागू देणार नाही. नायकिणीची मुलगी नायकीणच. म्हणून समाज तुला जगू देणार नाही.'' आजही आपण कितीही नव्या विचारांचा बुरखा घातला, तरी पहिला विचार आपल्या डोक्यात लोकांचा येतो. लोक काय म्हणतील. समाज काय म्हणेल आणि ज्या लोकांची भीती आयुष्यभर आपण बाळगतो, ती लोकं आपली नसतातच, हे सरतेशेवटी कळते. परंतु, कान्होपात्रा पूर्ण विश्वासाने आईला म्हणत होत्या...

**धन्य कान्होपात्रा अजी झाली भाग्याची।**
**भेट झाली ज्ञानदेवाची म्हणूनिया।।**

कान्होपात्रा म्हणतात, 'ज्ञानदेवांच्यामुळे कळले की, आत्मशांतीचा मार्ग हा केवळ नामस्मरणात आहे आणि तो मार्गच माझा उद्धार करेल.' जिथे माणसे माणसांवर विश्वास ठेवायला विचार करतात, तिथे केवळ नामस्मरणावर विश्वास ठेवून कान्होपात्रांनी आपली श्रद्धा सिद्ध केली. म्हणूनच जेव्हा वासनेने भरलेले बेदरच्या बादशाहाचे शिपाई त्यांना नेण्यासाठी आले, तेव्हा त्या कृष्णाच्या मूर्तीसमोर गेल्या. कृष्णाचा जणू संकेत मिळाल्यावर त्यांनी पंढरपुरी विठ्ठलाच्या दर्शनाची अट त्या शिपायांना घातली. मंगळवेढा ते पंढरपूर प्रवासात श्वासागणिक नामस्मरण केलेल्या कान्होपात्रांनी विश्वासाने पंढरपुरी विठ्ठलाच्या पायावर डोके ठेवताच श्वास आणि नामस्मरण दोन्ही थांबले. शेवटी मात्र, निर्वाणाची स्थिती ती प्रतिमांच्यामधून शब्दांकित करते आणि विठ्ठलचरणी समर्पित होते, देह ठेवते. माधवाच्या नामस्मरणातून विठ्ठलाची भक्ती करणाऱ्या कान्होपात्रांनी अवीट भक्तीचा नवा मार्ग आपल्याला चौतीस अभंगांतून सांगितला.

**मोकलीन आस जाहले मी उदास।**
**घेई कान्होपात्रेस हृदयात।।**

असे विठ्ठलाला भक्तिभावाने सांगणाऱ्या कान्होपात्रा संपूर्ण महाराष्ट्राच्या हृदयात संतपरंपरेचा वसा घेऊन विसावलेल्या आहेत.

**नामें दोष जळती।**
**नामें पापी उद्धरती।।**
**नामें अपार तारिले।**
**नामें जीवनमुक्त केले।।**

असे नामस्मरणाचे महत्त्व सांगून कान्होपात्रांनी मुक्तीच्या मार्गाची वाट दाखवली, असेच म्हणावेसे वाटते.

❀❀❀

# १२. संत बहिणाबाई

संत बहिणाबाईंचा जन्म देवगाव येथे झाला. आऊजी कुलकर्णी यांची मुलगी बहिणा. ती पाच वर्षांची असताना तिचा विवाह ३० वर्षांच्या रत्नाकर पाठक ह्या बिजवराशी झाला. खरे तर इथेच बहिणाबाईंच्या आयुष्याची व्यथा कळते. आपल्यापेक्षा कितीतरी मोठ्या आणि अत्यंत तापट व्यक्तीशी जुळवून घेताना त्यांना काय सोसावे लागले असेल! परंतु, त्यांच्या एकाही अभंगात त्यांनी कधीच स्वत:च्या दु:खाचा उल्लेख केला नाही. संतकृपा झाली। इमारत फळा आली।। ह्या अभंगात वारकरी संप्रदायाचे सुरेख वर्णन त्यांनी केले आहे.

तुकारामांनी त्यांना स्वप्नात दर्शन दिले आणि त्यांच्या डोक्यावर हात ठेवून त्यांना गुरुपदेश दिला, असे त्यांनी आपल्या अभंगात नमूद केले आहे. १२ वर्षांच्या मुलीला तुकाराममहाराजांचे इतके अभंग तोंडपाठ, तुकारामांची इतकी भक्ती पाहून लोक आश्चर्य करायचे. टीका करणारे टीकाही करायचे. अशा लोकांसाठी त्यांनी लिहिलेली वज्रसूचीवरील टीका, आश्चर्यकारक आहे. तुकारामांबद्दल आदर व्यक्त करताना, जिव्हाळा व्यक्त करताना त्या म्हणायच्या, ‘अनुग्रह मिळाला, काव्य करण्याची आज्ञा मिळाली.’

**वाटे उठों नये जीव जाय तरी।**
**सुख तें अंतरी हेलावलें।।**
**आनंदे निर्भर होऊनिया मन।**
**करू आलें स्नान इंद्रायणी।।**

तुकारामांच्या स्वप्नातील दर्शनानंतर त्यांना काव्यस्फुरण झाले. १८व्या वर्षी त्यांना अनुग्रह मिळाला. वयाच्या ७२व्या वर्षांपर्यंत त्यांनी अध्यात्मसाधनेत आयुष्य वेचले. संत निळोबा यांनी बहिणाबाईंवर आरत्या रचल्या. यावरून बहिणाबाईंचा परमार्थ अधिकार किती मोठा होता, हे आपल्याला कळते. तुकारामांच्या निर्वाणानंतर त्यांनी काही दिवस समर्थांच्या सेवेत घालवले. आपल्या ७४० अभंगांमध्ये त्यांनी आदिपरंपरा, भारूड, संकीर्ण, गवळण, श्लोक, आरत्या, नाट्यात्म टोणप्याचे अभंग

आणि काही हिंदी रचना केल्या आहेत.

मरण्यापूर्वी आपल्या मुलाला (विठोबाला) त्यांनी आपले १२ जन्म सांगितले, आणि आपला हा १३वा जन्म असून अजून दोन जन्म बाकी आहेत, हेसुद्धा सांगितले.

**भक्ती हे कारण साधन वरिष्ठ।**
**रोकड वैकुंठे हाती वसे।।**

संचिताच्या पुरात वाहत असताना नामस्मरणाने मला तारले. हे नामस्मरण कोणाचे करावे, हे सांगताना बहिणाबाई म्हणतात,

**श्रीबीजयुक्त पांडुरंग मंत्र।**
**जपता पवित्रा महापापी।।**

संत बहिणाबाईंनी आपल्या अभंगांतून संसारात येणाऱ्या दुःखांचे चिंतन केले आहे. हे अभंग तुकोबांच्या अभंगांची आठवण करून देतात. स्त्रियांना संसाराबद्दल उपदेश करताना बहिणाबाई म्हणतात की, जसे आपल्याला कान, नाक, डोळे, हात, पाय, गर्भाशय, पोट तसाच संसार आहे. उगाच स्त्रियांनी त्याचा बाऊ करून त्यात गुंतण्याचे कारण नाही. संसाराबरोबर परमार्थ साधणे, हा स्त्रियांचा विचार असला पाहिजे. बहिणाबाईंनी काही हिंदी रचनासुद्धा केल्या आहेत. त्यांच्या काही कूटरचना हिंदीमध्ये आहेत.

संत बहिणाबाईंनी वारकरी संप्रदायाचा इतिहास आपल्या अभंगात चार ओळींत सांगितला आहे, तो पुढीलप्रमाणे :

**संतकृपा झाली। इमारत फळा आली।।**
**ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया।।**
**नामा तयाचा किंकर। तेणे रचिले तें आवार।।**
**तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।।**

❀❀❀

# १३. संत भागूबाई (१६वे शतक)

वारकरी संप्रदायात दोन भागू होऊन गेल्या. ह्या भागूबाई म्हणजे संत तुकाराम महाराजांच्या कन्या म्हणून प्रसिद्ध होत्या. निळोबा यांच्या अभंगांच्या गाथेत भागूबाई यांच्या नावावर दोन अभंग आहेत.

**मी रे अपराधी मोठी । मला घालावें बा पोटीं।।**

हा त्यांचा अभंग सर्व परिचित आह. त्यांच्या संपूर्ण अभंगात विठ्ठल भेटीची तळमळ आहे. जसा वडिलांना विठ्ठल भेटला, तसा आपल्यालाही तो कधीतरी भेट देईल, अशी भोळी आशा ह्या अभंगात आहे.

त्यांच्या दुसऱ्या अभंगात साधुसंतांच्या संगतीचा गौरव करण्यात आला आहे. तुकाराम महाराजांची साथ, त्यांना भेटायला येणारी मंडळीही संतच! त्यामुळे संतांच्या सोबतीत संस्कार घडले. त्यांच्यामुळे कळले की, जीवन मोहाचे जाळे आहे. मायेचे मृगजळ आहे. ह्या डोहातून तरण्यासाठी विठ्ठल हे एकच नामस्मरण आहे. भक्ती दृढ हवी; परंतु नामस्मरणाची त्याला जोड हवीच! सतत हरीचे स्मरण असावे, हे मी घरी येणाऱ्या संतांच्या सेवांमुळे शिकले. (पूर्वी वारीला जाताना वारकरी ठरावीक गावी ठरावीक ठिकाणी थांबायचे. त्यांच्या सेवेसाठी भागूबाई तत्पर असत.) असे भागूबाई प्रांजळपणे नमूद करतात.

**साधूचा संग धरी रे। श्रीहरी स्मरणीं रंगली वाणी।**
**भक्ती धरी दृढ काम त्यजी रे। साधूचा संग धरी रे।।**
**मायाजाळे हें मृगजळ पाहे। गुंतसी परी गती नाही बरी रे।**
**दुस्तर डोहीं बुडसी पाही। तारू हे विठ्ठलनाम धरी रे।।**
**कीर्तनरंगी होसी अभंगी। भागू बघ तुज नमन करीं रे।**

हे अत्यंत सुमधुर गीत भागूबाई नेहमी गात असत.

**मी तान्हुलें अज्ञान। म्हणू का देऊ नये स्तन।।**

अशी सतत विनवणी त्या विठ्ठलापाशी करत.

तुकारामकन्या भागूबाईंना संगीताचे ज्ञान असावे, कारण त्यांच्या अभंगांत गेयता आहे. पंचवीस वर्षे त्या आजोळीच वाढल्या. आपल्या अभंगांत त्यांनी हेच सांगितले की, जीवन हे मायाजाळ आहे. एक मृगजळ आहे. ह्यातून केवळ विठ्ठल आपल्याला तारू शकतो. म्हणून विठ्ठलभक्ती महान आहे, असे भागूबाई म्हणतात.

❀❀❀

# १४. संत विठाबाई

विठाबाई ह्या मराठी संत कवयित्री परंपरेतील फार मोठ्या स्त्रीसंत! संत विठाबाई यांचा जन्म इ.स. १७९२ मधला. त्यांच्या वडिलांचे नाव रामय्या व आईचे नाव संतूबाई होते. जनाबाई, बहिणाबाई ह्यांसारखीच यांचीसुद्धा साहित्यसंपदा अफाट आहे. पाच हजारांच्यावर यांनी अभंग लिहिले, मात्र प्रत्यक्षात आजच्या घडीला त्यांचे ६०० अभंग उपलब्ध आहेत. पूर्वजन्मी आपण जनाबाई होतो, याचा साक्षात्कार त्यांना दिंडीत झाला होता. त्यांच्या अभंगांत तत्त्वज्ञान, नाममहिमा, संतमहिमा, त्यांचे गुरू चिंदबर यांविषयक गोष्टी जरी आढळत असल्या; तरी बहुतांशी अभंगांतून त्यांनी आत्मचरित्रपर जन्मवृत्तांत कथन केला आहे.

वयाच्या १४व्या वर्षी त्यांचे लग्न झाले. त्यांचे माहेर-सासर दोन्ही पंढरपुरीच होते; परंतु पतीच्या छळाला त्यांना सामोरे जावे लागले. विठाबाई स्वतःच म्हणायच्या की, मी शास्त्रेपुराणे पढली नाही. परंतु त्यांचे अभंग पाहता हे खरं वाटत नाही की, त्यांनी शास्त्रपुराणे पढली नसतील. त्यांच्या अभंगांतून शास्त्रपुराणांचे रहस्य जाणवते.

एकदा कंटाळून त्या घर सोडून निघून गेल्या. रानावनांत भटकत असताना विठ्ठलाने त्यांना दृष्टांत दिला, असे त्या आपल्या अभंगात म्हणतात.

**व्यथा निमाली व्यथा निमाली।**
**म्हणोनिया मीच अवतरलो समय।।**
**चिदंबर नाम धरूनिया।**
**कुंदगोळी असतो ब्राह्मण वेषाने।।**
**जावे या वाटेने म्हणती मजी ।**
**राजाराम भक्त माझे येईल तेथे।।**
**तुकाराम प्रत्यक्ष जाग प्रत्यक्ष तो।**
**चिदंबर गात फिरतो जाग।**
**अवतारपूर्ण नामदेव।।**

असा विठाबाईंना दृष्टांत देऊन देव अदृश्य झाले आणि दुसऱ्या दिवशी रामप्रहरी दारात आलेली दिंडी पाहून विठाबाईंना प्रचंड आनंद झाला. इतक्यात त्यांचे पती आणि त्यांचे आईवडील विठाबाईंना शोधत तिकडे पोहोचले. विठाबाई राहत होत्या, त्या गावाचे नाव होते कुंदगोळी. पती आणि आईवडील यांना तिथे पाहून त्यांना आश्चर्य वाटले. तेव्हा त्यांचे पती त्यांना घरी चलण्याचा आग्रह करू लागले. ते त्यांना ओरडू

लागले. तेव्हा विठाबाईंनी स्वामींचा धावा केला आणि तेथे क्षणातच त्या मृत होऊन पडल्या. विठाबाईंना मृत झालेले पाहून त्यांचे पती आणि आईवडील निघून गेले; परंतु स्वामींनी त्यांच्या मस्तकावर हात ठेवताच बेशुद्ध विठाबाई शुद्धीवर आल्या आणि पुढे चिदंबर स्वामींच्या शिष्या म्हणून राहिल्या. पुढे वारकऱ्यांची सेवा आणि आपल्या काव्यातून संतमहिमा त्यांनी गायला.

**प्रत्यक्ष तो विष्णू असे ज्ञानेश्वर।**
**उद्धव अवतार नामदेव।।**
**निवृत्ती तो हर, ब्रह्म तो सोपान।**
**ऐसे अवतार बहुत जाण।।**

असे म्हणत त्यांनी प्रत्येक संतांबद्दल आदर व्यक्त केला आहे. त्यांच्या काव्यात रसाळता आहे. कधी त्यांचे अभंग जनाबाई आणि बहिणाबाईंची आठवण करून देतात, तर कधी त्यांच्या अभंगात अनुभवांचे वास्तव जाणवते. म्हणूनच प्रसंगी थोडे बंडखोर शब्दसुद्धा त्यांच्या अभंगात आढळतात. विठाबाईंनी आपली भक्ती नामस्मरणापेक्षा आपल्या अभंगातून जास्त दाखविली. त्यांचे आत्मचरित्राचे अभंग वाचून त्यांच्या भक्तीची ताकद कळते.

**विठाबाई म्हणे ज्यासी नाही भक्ती।**
**त्याने भगवे हाती धरू नये।।**
**काय गाजो अर्थ त्यांनाच कळेना।**
**राग गाजो नाना आळवोनी।।**

❀❀❀

# १५. संत प्रेमाबाई

संत प्रेमाबाई कृष्णभक्त होत्या. कृष्णाच्या लीला ऐकणे, कृष्णावर तासन्तास भजन करत बसणे, हा जणू त्यांच्या भक्तीचा प्रकार होता. बालपणीच लग्न आणि त्यानंतर मुलगा झाल्यावर लगेच त्यांच्या पतीचे निधन झाल्याने त्यांना काहीसे नैराश्य आले होते. त्यामुळे त्यांनी भक्तिमार्ग स्वीकारला. त्यांचे अभंग आणि त्यांचे चरित्र ओतप्रेत करुणरसाने भरलेले आहे.

महिपतीबुवा ताहराबादकरांनी त्यांचे चरित्र रसाळ भाषेत वर्णिले आहे. वारकरी संप्रदायातील ह्या स्त्रीसंत नित्य भागवत श्रवण करीत होत्या. भक्त प्रल्हादाने आपल्या नवविधा भक्तीमध्ये श्रवण ही मोठी भक्ती असल्याचे सांगितले आहे. संत प्रेमाबाई प्रत्येक कीर्तन, प्रवचन ऐकून त्यावर मनन करून कृष्णाची भक्ती करत.

**श्रवणालागी पाठविला बाळ।**
**प्रपंच धंदा सारत सकळ।।**
**परि हरिच्या चरित्राजवळ।**
**वृत्ती तत्काळ वेधली।।**

आपल्या मुलाबरोबर त्या गावापासून दूर राहत होत्या. आपल्या दहा वर्षांच्या मुलाबरोबर त्या नित्य भागवत ग्रंथाचे श्रवण करीत. मनाने अत्यंत प्रेमळ असणाऱ्या प्रेमाबाई – दारावरून कोणीही याचक, साधुसंत, गरजू, अन्नार्थी गेला; तर कधीच विन्मुख पाठवत नसत. आपल्या घासातला घास काढून त्या लोकांचे आदरातिथ्य करीत असत. पक्ष्यांना पाणी, ढोरांना चारा देऊन पशुपक्ष्यांची निगा, ह्या सगळ्या गोष्टी त्या आपली गुरेढोरे नसतानाही करायच्या. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रेमळ म्हणूनच परिचित होते.

एकदा भागवत श्रवणाला जायची त्या तयारी करत असतात. इतक्यात दारावर वारकरी येतात. भोजनाची वेळ तोंडावरच आली असल्यामुळे, वारकरी प्रचंड भुकेलेले होते. प्रेमाबाईंनी त्यांना गुळपाणी देऊन जेवणाचा आग्रह केला. प्रेमाबाईंच्या प्रेमळ आमंत्रणाचा वारकऱ्यांनी स्वीकार केला. प्रेमाबाईंनी स्वयंपाक रांधायला घेतला; परंतु मनात आज आपण भागवत ऐकायला मुकणार, ही हुरहुर त्यांना लागली होती. त्यांचे सगळे लक्ष कीर्तनाकडे लागले होते; परंतु अतिथी धर्म पहिला, म्हणून

त्या स्वयंपाकात गुंतल्या होत्या. त्यांनी आपल्या मुलाला सांगितले, 'आज तू कीर्तनाला जा आणि बुवा काय सांगतायत, ते मला सांग. तोपर्यंत मी वारकऱ्यांचं भोजन आटोपते.' त्याप्रमाणे मुलगा भागवत ऐकायला गेला. इथे सर्व वारकरी यथेच्छ जेवले आणि पारावर आराम करत बसले असतानाच त्यांचा मुलगा आला. आल्या आल्या आधी त्यांनी मुलाकडे सगळी चौकशी केली, 'काय म्हणाले बुवा आज कीर्तनात?' तेव्हा तो म्हणाला, 'आज कृष्णाच्या खोड्या सांगितल्या. एकदा यशोदा मातेने त्याला उखळाला बांधून ठेवले होते.' हे वाक्य ऐकताच प्रेमाबाई सैरभैर झाल्या. माझ्या कृष्णाला उखळाला बांधून ठेवले. त्या मुलाला म्हणाल्या, 'तू आता स्वत:ला सांभाळ' आणि त्या एवढ्या तद्रूप झाल्या की, त्या देहभान विसरल्या. त्यांचे अष्टभाव जागृत झाले आणि 'मी कृष्णाला उखळीतून सोडवायला जाते' असे म्हणून तिथेच आपला देह त्यांनी ठेवला. वारकरी समोरच होते. त्यांनी प्रेमाबाईंच्या मुलाला आधार दिला. प्रेमाबाई ईश्वरभक्तीत लीन झाल्या. आपल्या वेगळ्याच भक्तीची साक्ष प्रेमाबाईंनी इतिहासाला दिली आहे.

आजही गोवा, कारवार येथे प्रेमाबाईंची पारंपरिक गीते गायिली जातात.

**गडे हो कृष्ण गडी आपुला।**
**यमुना डोही बुडाला।।**

कृष्णाला अभंगात 'गडे' हा शब्द वापरून त्यांनी लाडिकता दाखविली आहे. त्यांच्या बहुतेक अभंगात गडे शब्द आढळतो.

❁❁❁

# १६. संत विमला देवी

नाथ संप्रदायाचा प्रभाव मराठी संतसाहित्यावर फार मोठा आहे. नाथ शब्दाचा अर्थच मुळी तारणारा किंवा रक्षण करणारा असा आहे. नाथ संप्रदायातील पुरुषांना योगी, तर स्त्रियांना नाथ योगिनी असे महत्त्व आहे; कारण या संप्रदायात शिवाबरोबर शक्तीचीही उपासना केली जाते.

अशा ह्या नाथ संप्रदायातील एक प्रमुख योगिनी म्हणजे संत विमलादेवी!

मच्छिंद्रनाथ कौल योगिनी संप्रदायाचेही प्रवर्तक मानले जातात. नाथपंथीयांनी पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही योगसाधनेची दीक्षा दिली. अनेक स्त्रिया नाथ संप्रदायात दीक्षित झालेल्या आढळून येतात.

त्यातीलच एक अतिशय विद्वान स्त्री म्हणजे विमला देवी, ज्या गोरक्षनाथांच्या शिष्य होत्या.

नयनावती, आउसा, मुक्ताबाई ह्या सगळ्या नाथ योगिनी होत्या. इतकेच नाही तर, कनखला, मेखला, मनीभद्रा, लक्ष्मीकारा ह्या सगळ्या चौऱ्याऐंशी सिद्धी प्राप्त झालेल्या शिष्या होत्या. कनखला, मेखला ह्या कानिफनाथांच्या शिष्या होत्या.

विमलादेवी ह्या गोरक्षनाथांच्या प्रत्यक्ष शिष्या होत्या. नाथ संप्रदायातील बारा उपपंथांपैकी 'आई पंथांच्या', त्या प्रवर्तक समजल्या जातात.

गोरक्षनाथ भ्रमंती करत असताना त्यांच्यापाठी त्यांचे विचार लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम विमलादेवी करत असत. गोरक्षनाथांची अवधूत गीता, गोरक्षगीता, गोरक्षपद्धतीची पदे त्या लोकांना गाऊन दाखवत.

गोरक्षनाथांनी शाबरी विद्येला दिलेलं अनन्यसाधारण महत्त्व आणि शाबरी कवच ह्यांचे महत्त्व त्या सतत कथन करीत असत.

त्रिदेवांचा अंश असलेल्या भगवान दत्तात्रेयांनी आपल्या मातेला अजपा साधना सांगितली. हीच साधना गोरक्षनाथांनी गौरवली आणि विमलादेवींना सांगितले की, न भूतो न भविष्य अशी ही सहजसोपी साधना प्रत्येक साधकाने आचरावी. तीच साधना विमलादेवींनी आचरणात ठेवून लोकसेवा केली.

प्रखर वैराग्य आणि सदाचार अशा स्वतःच्या आचरणाने तत्कालीन समाजातील अनाचारी वृत्तींना विमलादेवींनी पायबंद घातला आणि मठाचीही जबाबदारी चोखपणे सांभाळली.

योगी ह्या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप – योगिनी म्हणजेच साधनेतील प्रवीण स्त्री! विमलादेवींनी आपले प्रावीण्य उपदेशातून सिद्ध केले. सतत 'अलख' म्हणून संवादाची सुरुवात करताना आपल्या उपदेशात त्या म्हणत की, 'जिवाची हत्या कधीच करू नये. मांस खाऊन कधीही आनंद मिळत नाही. त्यापेक्षा कितीतरी मोठा आनंद योगसाधनेत मिळतो. साधकाने कमी खायला हवे आणि कमी बोलायला हवे', ह्या मतांच्या विमलादेवी होत्या. किंबहुना, 'ज्याने जिभेवर नियंत्रण मिळवले, त्याने खूप काही मिळवले', असे त्या ध्यानधारणेच्या अध्यायात सांगतात.

शंकराचार्यांनी जसे मोक्षासाठी ज्ञानमार्गाला महत्त्व दिले, तसे गोरक्षनाथांनी ध्येयपूर्तीसाठी योगमार्गाला महत्त्व दिले. हा योगमार्ग विमलादेवींनी खुलवून सांगण्याचा प्रयत्न केला. गोरक्षनाथांचा नामोच्चार करूनच विमलादेवी भिक्षा मागत असत. त्यांनी स्वतःच्या शांत आणि अद्भुत साहित्यापेक्षा गोरक्षनाथांचेच साहित्य लोकांसमोर उलगडून दाखवले. 'शक्ती शिवापासून भिन्न नसून ती तदर्तंगतच आहे आणि शक्तियुक्त शिव हे अंतिम सत्य आहे', हा गोरक्षनाथांचा संदेश त्यांनी तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे काम केले.

स्त्रीउद्धाराची तळमळ असलेल्या विमलादेवींचा पंथ म्हणून आजही आपण 'आईपंथा'कडे मोठ्या आदराने पाहतो. अशा अभूतपूर्व शक्ती असलेल्या नाथपंथी योगिनी विमलादेवींना महाराष्ट्र कधीच विसरू शकत नाही.

❀❀❀



# १७. संत वेणाबाई

समर्थ संप्रदाय म्हटले आणि त्यातील स्त्रीसंत कवयित्रींचा विचार केला, तर सर्वांत पहिले नाव येते ते म्हणजे रामदासस्वामींच्या महत्त्वाच्या शिष्या संत वेणाबाईंचे! आपल्या ५०वर्षांच्या आयुष्यात संत वेणाबाईंनी आध्यात्मिक अधिकार प्राप्त करून ग्रंथ, श्लोक, अभंग, स्फूट लेखन असे भरपूर साहित्य निर्माण केले आहे.

कोल्हापूरमध्ये जन्म झालेल्या वेणाबाईंचा स्वभाव, वृत्ती लहानपणापासूनच शांत आणि विरक्त होती. बालविधवा असलेल्या वेणाबाईंची 'दासविश्रामधामा'त नोंद आहे की, एकनाथी भागवताचे पठण करत असताना समोर रामदासस्वामी आले आणि त्यांनी वेणाबाईंना विचारले, 'तुम्ही जे काही वाचताय, ते तुम्हाला कळतंय काय?' वेणाबाई 'नाही' म्हणाल्या. तेव्हा वेणाबाईंनी एक एक करत २५ प्रश्न समर्थांना विचारले, त्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे समर्थांनी लिहून दिली. त्या क्षणापासूनच वेणाबाईंनी समर्थांना आपले गुरू केले आणि 'जय जय रघुवीर समर्थ' हे शब्द जणू सतत त्यांच्या कानात घुमायला लागले. जणू ह्या वचनाचा त्यांना त्याक्षणी साक्षात्कार झाला.

पुढे समर्थांचे शिष्यत्व मिरवताना त्यांना खूप त्रास झाला. अगदी विषाचीसुद्धा परीक्षा त्यांना द्यावी लागली; परंतु शुद्ध भक्ती आणि शुद्ध आचरण त्यांना गुरुचरणी घेऊन आले. त्यामुळे एखाद्या मठाचे महंतपद वेणाबाईंनी स्वीकारावे, असा समर्थांनी आग्रह धरला व ते महंतपद स्वीकारून वेणाबाईंना समर्थांनी कीर्तन करण्याची अनुज्ञा दिली. भक्तिबळ दांडगे असल्यामुळे वारंवार देवाचे साक्षात्कार वेणाबाईंना होत असत. त्याच्या जोरावरच सदेह वैकुंठाला जायची इच्छा त्यांनी समर्थांकडे व्यक्त केली. समर्थांनी ओळखले की, बहुतेक वेणाबाईंना अंतकाळ जवळ आला आहे,

तरी ते हसत म्हणाले, 'इतकी जायची घाई करू नकोस. आज कीर्तन करा, तुम्हीच लिहिलेल्या सीतास्वयंवरावर!' गुरुआज्ञा म्हणून वेणाबाईंनी कीर्तन सुरू केले. कीर्तन ऐकायला श्रोत्यांची गर्दी झाली. तेव्हा समर्थांनी इतर शिष्यांना अंत्यविधीचे सामान आणायला सांगितले. शिष्यांनी सामान आणले. तिरडी बांधली. कोणाला काहीच कळेना, कोण गेलंय? आणि आत कीर्तन संपल्यावर वेणाबाईंनी समर्थ चरणांवर देह अर्पण केला. समर्थांनी स्वतः त्यांचे कलेवर उचलून चितेवर ठेवून त्यांचे अंत्यसंस्कार केले.

अध्यात्म, वैराग्य, त्याग, निष्ठा, लेखन, गायन या सर्व गोष्टींनी वेणाबाई युक्त होत्या. 'दासविश्रामधामा'त असे म्हटले आहे की, वेणाबाईंच्या मृत्यूसमयी जे गुरुबंधू, साधुसंत उपस्थित होते, त्यांना श्रीरामांनी वेणाबाईंच्या रूपात दर्शन दिले. यातून वेणाबाईंची थोरवी कळते.

**रामनामेवीणा मज कंठेना।।धृ.।।**
**कोणी वंदिती कोणी निंदती।**
**वाट मी त्यांची पाहिता ।।१।।**
**वेणीचे निजधन रामचि जीवन।**
**होणार ते का सुखे होईना ।।२।।**

ताल, लय, ठेका ह्या पदाचे विशेष त्यांच्या अभंगात आहे. किती सहज गुरूवरील आपली श्रद्धा त्यांनी शब्दांत प्रकट केली आहे. वेणाबाईंनी रामायणातील कित्येक प्रसंगांवर छोटी, अर्थपूर्ण; पण भक्तियुक्त प्रसंगकाव्ये लिहिली आहेत. सीता स्वयंवरामध्ये सहा समास असून उत्तरार्ध १०११ ओवी संख्या आहे. आठ मंगलाष्टके आहेत, एका संत कवयित्रीने 'सीता स्वयंवर' हे आख्यान लिहून विशेष यशस्विता मिळवल्याची समर्थ संप्रदायात नोंद आहे. 'आमुच्या वाटे जाऊ नका' हा लहान अभंग लिहून त्यांनी आपल्या स्वभावातील खरेपणा दाखवला आहे.

❁❁❁

# १८. संत बयाबाई

बयाबाई ह्या समर्थ रामदासांच्या संप्रदायातल्या संतकवयित्री आणि संत वेणाबाईंच्या शिष्या! वेणाबाईंनी त्यांना अनुग्रह दिला होता.

गिरिधर स्वामी हे बयाबाईंचे शिष्य होते. गिरिधर स्वामींनी 'समर्थ प्रतापा'त ११व्या समासात 'बाइयाबाई' असा त्यांचा उल्लेख केला आहे. अर्थात् त्यांचा त्यांच्या गुरू बयाबाईंचाच हा उल्लेख आहे. वेणाबाईंनी (वेणास्वामींच्या) संस्थानाचे अधिकार मठपती म्हणून बयाबाईंकडे सोपवले होते. बयाबाई लहान असताना त्यांच्या ताटात त्यांच्याबरोबर राम जेवला होता. तसेच 'पुस्तक वाचत असताना त्या वाट चुकल्या, तर रामाने बोट धरून त्यांना काट्याकुट्यातून वाट काढून दिली' असे वर्णन गिरिधर स्वामींनी केले आहे. त्यांना उर्दू भाषेचे चांगले ज्ञान होते. आपल्या ८०-८५ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी बऱ्याच रचना केल्या आणि त्या रचनेत स्वत:चे नाव त्या घालत असत. बयाबाईंनी श्रीकृष्णावरसुद्धा गीत, अभंग लिहिले आहेत. आपल्या अभंगात त्या म्हणतात,

**काय सांगू बाई। तरी कपटी मोठा कान्हा।।**
**जात होते यमुनातीरी। अडवुनिया धरितो निरी।।**
**घुंगटपट काढुनिया । हळूच लागे काना।।**
**गोकुळांत धूम केली । वृत्ती चोरूनिया नेली।।**
**दास बया धन्य म्हणे । गुरूराज राणा।।**

उर्दू भाषेच्या ज्ञानामुळे त्यांनी काही अभंग हिंदीतही लिहिले. त्या रचना लक्षवेधी आहेत.

**क्या कहू रे गुरुनाथ की बात में।**
**मस्तमया है दिल मेरा रंग मे।।**

जन्ममरणातून सुटका करणाऱ्या सद्गुरूंच्या उपकारांची फेड कधीच करता येत नाही, अशा प्रकारे सद्गुरूंच्या चरणाशी बयाबाई लीन झाल्या आहेत. गुरूने मला स्वानंदाच्या झोक्यात झोपवले आहे आणि देव डोळ्यांसमोर उभा आहे, असा त्यांना अनुभव वारंवार येई. त्यांनी लिहिलेली गवळण म्हणजे स्वत:शीच साधलेला संवाद आहे. श्रीकृष्णाने आपली वृत्ती चोरून नेली, असे त्या गवळणीमध्ये म्हणतात 'घुंगट'

ह्या शब्दाने काही प्रश्नांवरही त्यांनी प्रकाश टाकला आहे. कृष्णाची धिटाई बघा. हात धरतो आणि घुंगट बाजूला करून कानात काही सांगतो, इथे त्या 'कृष्ण कानमंत्रोपदेश देतो' असे सुचवत आहेत.

**बिंदुरुप जग पाहता। बिंदू सिंधू अखंड हा भरला आहे ।**
**नाहिपणाने नाही आहे भरोनिया उरला।।**

थोडी कूट अभंगाकडे जाणारी भाषा आहे. बयाबाईंनी खूप आरत्या रचल्या, काव्यरचना केल्या. उर्दू भाषेचे त्यांना उत्तम ज्ञान होते, म्हणून त्यांनी मध्ये मध्ये हिंदी, उर्दू शब्द टाकले. काव्ये रचली. बयाबाईंनी रचलेल्या, आरत्यांची भाषा अर्वाचीन आहे. हिंदी शब्द मध्येच आरतीत येतो.

**सावळी सुरत नयनात बसली।।**

बयाबाईंच्या विरहिणी वाचताना त्यांनी अत्यंत चपखल भाव त्यात ओतले आहेत असे जाणवते. ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्याही विराण्यात परपुरुष येतो. उदा.

**चंदनाची चोळी माझे सर्व अंग पोळी।**
**कान्हे वनमाळी वेगी भेटवावा इथे।।**

जसा विठ्ठल आणला आहे, तसा बयाबाईंनी गुरूला विख्यात आणले आहे.

**मी ममता हे वसन टाकितां। जनांत झाले जथन हो।।**
**चाहो शून्यांच्या वर मी गेले। तेथेच झाले मगन हो।।**
**लागून गेलं लगन हो।।**

जथन, लगन, मगन हे शब्द चपखल, अर्थपूर्णरीत्या त्यांनी विरहिणीत बसवले.

'प्राचीन मराठी गीत मंजूषा' या ग्रंथात श्री. ना. ग. जोशी यांनी बयाबाईंची पदे उल्लेखली आहेत.

**लिखा पढा कछू संग नहि आवे। अंतकाल में सब हि जावे।।**
**जोरु लडके महल मजालस। यहा रहती फेर आपहि जाना।।**

यातील 'कछु' ह्या शब्दात त्यांनी तत्त्वज्ञान सांगितले आहे की, काहीही मरताना बरोबर येत नाही. केवळ चांगले कर्म तुमच्या बरोबर येते, म्हणून चांगले कर्म केले पाहिजे.

❁❁❁

# १९. संत रुक्मिणीबाई केंकरे

रुक्मिणीबाई केंकरे म्हणजेच सोंसूबाई या संत कवयित्री होत्या. त्यांचा जन्म सावर्डे येथे झाला. माहेरच्या कुलकर्णी असलेल्या सोंसूबाई यांचा यशवंत केंकरे यांच्याशी विवाह झाला होता; परंतु अल्पकाळातच त्यांच्या पतीचे निधन झाले. त्यामुळे त्या पुन्हा आपल्या माहेरी सावर्डे येथे राहायला आल्या. त्या वेळच्या रीतीरिवाजाप्रमाणे आलवण वगैरे त्यांच्या नशिबी आले; परंतु आपल्या दुःखाला दोष न देता त्या परमेश्वराची इच्छा समजून त्या आपला सगळा वेळ पूजाअर्चा करण्यात घालवू लागल्या. घरात संतसाहित्य, संत वाङ्मय यांवर सतत चर्चा होत असल्यामुळे हळूहळू सोंसूबाईंना साहित्याचे जणू वेड लागले. त्यानंतर त्यांनी अभंगरचना करायला घेतल्या. साधारण १०००च्या वर त्यांनी अभंगरचना केल्या. समर्थ रामदासस्वामी यांनी सावर्डे, सावंतवाडी येथे मठस्थापना केली. याच काळात रुक्मिणीबाई अभंगरचना करीत होत्या. आजही हे अभंग ऐकताना मन हरवून जाते. केवळ साहित्याने ह्या स्त्रीसंतांचे भावविश्व कसे भारून टाकले असेल, याची कल्पना येते.

आपले दुःख व्यक्त करताना त्या म्हणत,

**देवा मज आता नको फार छळू। नको हळू हळू चालू बापा।।**
**नाशिवंत काया दोन दिवसांची। देवा ही आमुची क्षणभंगूर।।**

सोंसूबाईंवर समर्थांचा बराच प्रभाव होता (शक्तींचा). त्यांच्या अभंगांत समर्थांच्या वैचारिक शक्तीचा भास होतो. इतकी अफाट वैचारिक शक्ती रुक्मिणीबाईंची होती!

एका विधवेचे दुःख त्यांनी आपल्या पुढील अभंगात मांडले आहे. मी विधवा असले, तरी मला दर महिन्याला पाळी येते. त्यात माझा दोष नाही. जसा सोयराबाईंनी विटाळ हा विषय  घेऊन जनजागृती करण्याचा प्रयत्न केला की, विटाळ वाईट नाही. तसा रुक्मिणीबाईंचा भाव आहे. विटाळात देवाला का शिवायचं नाही, हाच प्रश्न त्यांना पडलेला आहे. विटाळ देवानं दिला, तर तो वाईट कसा हा प्रश्न त्या उपस्थित करतात.

**मी जरी जहाले चंडाळीण। तरी मज प्रतिपाली।**

**देवा जगजेठी। पायी मारीन मिठी।**
**ऐसे करी।**

गिरिधरस्वामींनी त्यांच्या अभंगांची नोंद केली आहे. गिरिधरस्वामींनी रामदासी संप्रदायातील अनेक स्त्रीसंतांच्या नावांची नोंद घेतली. उदा. अंताबाई, बयाबाई, नबबाई, चिमणाबाई अशा अनेक स्त्रीसंत आहेत, त्यांत रुक्मिणीबाईंचा उल्लेख आहे. त्यांच्या अभंगात जणू स्त्रियांचा आत्मसन्मान व अस्मिताजागृतीचे जाणीवपूर्वक प्रयत्न आहेत.

या स्त्रियांनी भक्तिमार्गाचा अवलंब करत जणू मोक्षप्राप्तीसाठी तपश्चर्या केली आणि त्यांनी साहित्याच्या मार्गाने आपल्या भावना मोकळ्या केल्या.

परमार्थाचा मार्ग कसा सोपा आहे, हे सांगताना त्या म्हणतात, 'करा शंभूचे कीर्तन' संपत्तीची आशा सोडा, सज्जनांचा सहवास धरा, बघा परमार्थाचा मार्ग अत्यंत सोपा वाटेल. भक्तिमार्गात देव मिळतो का, ते मला माहीत नाही; पण भक्तिमार्गाने मनास प्रचंड शांती मिळते. हे एकच ईश्वराकडे जायचे साधन आहे, यावर त्यांचे ठाम मत आहे.

**नको येऊ माझ्या मुखी परनिंदा।**
**नको रंगोचित पंचविषयांत।**
**नको देऊ मज दुष्ट बुद्धी।।**

अशी त्या सतत देवाकडे प्रार्थना करत असत. मी भक्ती करते किंवा जप करते, म्हणून मला संत म्हणू नका; तर मला संत वारंवार तारतात, जागवतात, म्हणजे जागे करतात, काय वाईट काय चांगले ते सांगतात, त्या वेळी मला वाटतं, जणू मी निशिब्द का ?

**मी संतांचे संतांचे ।**
**होवो माझे बोल साचे ।**
**तेथे मन हे निवाले ।।**

माझे ह्या संतांशी अतूट नाते आहे. तेच माझी काळजी घेतात, म्हणूनच मला सज्जनांच्यात राहायला आवडते, असे त्या आपल्या अभंगात म्हणतात.

❁❁❁

# २०. संत मुडलणी

कर्नाटक प्रांतात काही मराठी स्त्रीसंत कवयित्रींचे 'दक्षिण भारतातील मराठी वाङ्मय इतिहास' या आवृत्तीत आढळतात. स्त्रीसंत परंपरेत मुडलणी परंपरांचा निर्देश आहे, विवेकसिंधू ह्या आद्य मराठी ग्रंथाशी ह्या मुडलणी परंपरेचा संबंध आहे, या घराण्यातील संतस्त्रियांना 'स्वामी' म्हटले जाते. संत मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई यांच्या कवितेतून निर्माण झालेली उत्कट भक्ती, श्रद्धा, संप्रदायनिष्ठा आपल्याला मुडलणी संप्रदायातील राधाबाई, पार्वतीबाई, लक्ष्मीबाई, गंगाबाई यांच्या अभंगांत आढळते.

दरवर्षी पंढरीची वारी करणाऱ्या राधाबाई यांची पदे महाराष्ट्र सारस्वतात आजही आहेत. काही अभंग 'प्राचीन गीतमंजूषा' या ग्रंथात आढळतात.

**दांडगा हा पती माझा कैसा सये गं।**
**मागे पुढे अखंड उभा राहे ।।**

तसेच प्राचीन गीतमंजूषेमध्ये त्यांनी एका अभंगात देव जर भक्त झाला, आणि भक्तीचा आनंद चालू लागला; तर तो आनंद कसा असेल, यांचे उत्कट वर्णन केले,

**मुक्तीचा तोडर भक्तिपायी रुळे।**
**भक्ताचे सोहळे देव भोगी।।**
**देवा भक्ता दोघा वुरी काही नाही।**
**देव भक्तापरी लगतसे।।**
**जेथे भक्त आहे तेथे देव माये।**
**विरुनिया जाये मोकलली।।**

अशा प्रकारे देव-भक्ताचे नाते आणि त्यातील गोडी वर्णिली आहे. पंढरीची वारी, वारीतल्या दिंड्या, पालख्या पाहून भक्ताचे विठ्ठलाशी असलेले नाते राधाबाई आपल्या अभंगात सांगतात. राधाबाईंना त्यांचे पती उद्दयबोध यांनीच गुरुमंत्र दिला. देवाहून भक्त केवळ भक्तीमुळे कसा श्रेष्ठ होतो, याचे वर्णन त्यांच्या अभंगात आहे.

'देवभक्त येक' असे वर्णन राधाबाईंनी रंगबोधमध्ये केले आहे. महाराष्ट्राच्या

बाहेर राहूनही मराठीपण जपणाऱ्या संत कवयित्रींच्या काव्याचे वेगळेपण यातून लक्षात येते. संत पार्वतीबाई यांच्या काव्याचा विचार केला, तर त्यांच्याही काव्यात महाराष्ट्राच्या लोकपरंपरेचा घाट आणि थाट दिसतो. कर्नाटक प्रांतात राहूनही त्यांचे भाषेवरील, विठ्ठलावरील प्रेम आश्चर्यजनक आहे. पार्वतीबाईंनी पतीला परमेश्वर मानण्याची जी आपली परंपरा आहे, त्या परंपरेचे रूप कसे असावे, यावर अभंग लिहिले आहेत.

**ज्यासी स्वरुप साक्षात्कार।**
**जे विश्रांतीचे माहेर।।**
**भक्तिज्ञान वैराग्य थोर।**
**तेचि परब्रह्म साचार।।**

ह्या पदात त्यांनी सत्संगाचे महत्त्व सांगितले आहे. कुरवंडी, लिंबलोण ह्यांसारखे शब्द अभंगांत वापरून त्यांनी आपल्या स्त्रीमनाचा ठाव घेतला आहे. प्रपंच करून परमार्थ साधणाऱ्या स्त्रियांचे दर्शन त्यांच्या अभंगात आढळते. सर्वत्र गुरू आहे, पण शिष्याला तो दिसला पाहिजे. तो गुरू दिसला की, पांडुरंग दिसलाच समजा, अशा साध्यासोप्या भाषेतून आपली भक्ती त्यांनी प्रकट केली आहे.

दैवत्व जाऊन एकत्वाचीही प्रचिती त्या अभिव्यक्त करताना दिसतात.

मुडलगी परंपरेतील रंगबोधांच्या पत्नीने एका पितांबरावर कशिद्याने गीता उतरवली होती.

❀❀❀



# २१. संत सखू

महाराष्ट्रातील वारकरी पंथातील पंढरीची निस्सीम भक्त असलेली स्त्रीसंत म्हणजे, 'संत सखू'! विठ्ठलाच्या कट्टर भक्त असलेल्या सखूबाईंचे बालपण विठ्ठलभक्तीत गेले; परंतु त्याच्या विरुद्ध सासर मिळाल्याने विठ्ठल आपल्याला दुरावेल, अशी सतत भीती संत सखूबाईंना वाटायची. विठ्ठलभक्तीला पारखे असणारे तिचे सासर आणि सासरची मंडळी सखूबाईंचा मानासिक छळ करत. आज सखूबाईंचे तीन-चारच अभंग शिल्लक आहेत. एका अभंगात त्यांनी खूप दुःख व्यक्त केले आहे. एकदा त्या विठ्ठलाच्या मूर्तीला आपले दुःख सांगत असताना विठ्ठल साक्षात त्यांच्यासमोर बसून सगळे दुःख ऐकत होता. हे पाहून सासरच्या मंडळींना भीती वाटली आणि त्यांनी ती देवघरातील मूर्ती बाहेर फेकून दिली. पुन्हा पाहतो तर ती विठ्ठलमूर्ती तिथेच! अनेक वेळा ती फेकली, तरी ती पुन्हा येऊन जागेवरच(देव्हाऱ्यात) उभी राहत असे. शेवटी सखू जादूटोणा करते, अशी काहीशी सासरकडच्यांची समजूत झाली. म्हणून मांत्रिक, भगत मंडळींना सासरकडच्यांनी बोलावले. जेणेकरून सखूबाई विठ्ठलभक्ती बंद करतील, असे त्यांना वाटले; परंतु तेव्हाही पांडुरंगाने सखूबाईंना चमत्काराने वाचवले. सखूला क्षणाक्षणाला तारण होणे, हा जणू विठ्ठलाचा छंद झाला होता. जेवढे पिसे सखूला विठ्ठलाचे लागले होते, त्याहून अधिक विठ्ठलाला सखूचे पिसे लागले होते. म्हणूनच सखूसाठी तो खांबाला दोरीने अडकून राहिला आणि सखूने वारीबरोबर जाऊन विठ्ठल दर्शन घेतले. विठ्ठलाने सखूसाठी स्त्रीरूप घेतले आणि सखूच्या घरात तो आठ दिवस राबला. सखूने आयुष्यभर विठ्ठलाची सेवा केली. स्तोत्रे

म्हटली आणि त्याच्या चरणावर आपला जीवही वाहिला. आपल्या अभंगातून सखू म्हणते,

**सुंदर माझ्या घरात। आत्मा हा नांदत।।**
**चंद्रसूर्य दारात। गोविंद गोविंद।।**
**येशवदेच्या मांडीवरी। वैकुंठीचा राणा।।**
**चंद्रभागेवरी आला। पुंडलिकांचा भाव पाहूनी उभा तो राहिला।।**

भक्तीच्या, अध्यात्माच्या क्षेत्रात आपले अनुभव व्यक्त करून आपल्यातील वेगळेपण स्त्रीसंतांनी जाणवून दिले आहे.

महिला संतांनी दिलेले सर्वांत मोठे योगदान म्हणजे त्यांच्या अभंगरचनांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे.

**आनंदाची दिपवाळी। घरी बोलवा वनमाळी।**
**घालिते मी रांगोळी। गोविंद गोविंद।।**
**सावळा तो वनमाळी। भक्तीसी भुलला।**
**पुंडलिकाचा बाजार। दृष्टीने पाहिला।।**
**विठ्ठल माझा सखा। ओव्या मी गाईन।**
**देऊळासी जाईन। हरिला पाहीन।।**

इतक्या साध्या, सोप्या, रसाळ भाषेत त्यांनी विठ्ठलाचे भाव आपल्या अभंगांत वर्णन केले आहेत. संतांबरोबर समाजाला सहजसोप्या भाषेत विठ्ठलाच्या भक्तीचे महत्त्व स्त्रीसंतांनी सांगितले आहे. त्यांच्या जीवनातील अनुभूती त्यांच्या रचनांमधून येतात. दररोजच्या व्यवहारातील प्रसंगांना अनुसरून केलेल्या या ओव्यांची रचना प्रत्येकाला आपलीशी वाटणारी आहे. स्त्रीसंतांनी संसार साधून परमेश्वराचे अनुसंधान कसे ठेवायचे, हे समाजाला शिकवले. त्यांची जीवनपद्धती लोकांवर संस्कार घडवते. भक्ती करण्यासाठी चोवीस तास देवासमोर बसून राहिले पाहिजे, असे काही नाही. किंबहुना देवळात न जाताही देवाच्या मनात कसे नामस्मरणाने स्थान मिळवायचे, हे स्त्रीसंतांनी दाखवून दिले आहे.

❀❀❀

# २२. संत नाईबबाई

नाईबबाई या महानुभाव पंथातील स्त्रीसंत होत्या. संत महादेवांच्या वार्धक्यातील काळात नाईबबाई ह्या नौगाव येथे महाधिकारी होत्या. नाईबबाईंच्या अभंगांत श्रीकृष्णाची वेधशक्ती, रुपसौंदर्य, भक्ताची आर्तता, वियोग, कातरता यांचा आविष्कार झाला आहे.

**ऐसे पुण्य न देणे आणि।**
**जेणे तोचि कृपा करी आपण।।**
**तरी दर्शन लाहीजैल।**
**जऱ्ही जाने जीवा थोर आरण।।**
**जे रूप अव्यक्त अनंत।**
**प्रेमहिना मज प्राप्त केवि होय ।।**

अशा प्रकारच्या पदरचना नाईबबाई गाऊन दाखवत असत. अत्यंत सहज, उत्स्फूर्त रचना आहेत सगळ्या! आपल्या अभंगात तत्त्वज्ञान सांगताना त्या नेहमी म्हणत, 'शास्त्र, पुराण, वेद याने कृष्णाची प्राप्ती होणार नाही. त्यासाठी भक्तीचे वेड लागले पाहिजे. प्रेमपिसे लागले पाहिजे. आपली कृष्णाशी भेट होत नाही, म्हणजे आपण पापी आहोत. प्रेमविहीन आहोत, अशी प्रांजळ कबुली संत नाईबबाई वारंवार देत आहेत. त्यांनी 'अप्राप्तीपरपदे' लिहिली आहेत. म्हणजे मैत्रिणीशी चाललेला संवाद आहे. आपल्या मैत्रिणीला त्या सांगतात की, 'कृष्णाच्या भेटीची ओढ कशी लागली आहे. कृष्णाच्या वियोगात त्यांचे अंतःकरण दाटले आहे. त्यांना कशातच आनंद वाटत नाही. कशातच रस वाटत नाही. कृष्णाशिवाय माझे प्राण वाचूच शकत नाहीत. जरी कृष्णाचे स्वप्नात रोज दर्शन होत असले, तरी त्याला लौकिक रीतीभाव तू समजू नकोस', असे नाईबबाई मैत्रिणीस म्हणतात. कृष्णाची भेट होणं कठीण आहे. असे अनेक प्रश्न नाईबबाईंच्या मनात येतात. ते प्रश्न सांगून मैत्रिणीकडे त्या मन मोकळे करत आहेत. महानुभाव पंथांत महदबांकडे आद्य कवयित्रीचा बहुमान जातो. त्यांनी लिहिलेल्या धवळ्यांमुळे, तसेच नाईबबाईंची 'अप्राप्तीपर पदे' व त्यातून प्रकटलेला

कृष्ण हा भावगीताचाच प्रकार आहे. त्यात गेयता आहे. स्वतः नाईबबाईंनी सगळी पदे गायली होती. याचा अर्थ गीतात्म, गेय जाणिवांचा त्यांच्या अभंगांना स्पर्श झाला.

तात्पर्य, सर्व संत कवयित्रींनी विलक्षण आत्मविश्वासाने परमेश्वराची आराधना केली आहे आणि आपल्या आध्यात्मिक अधिकारांचे अनुभव काव्यातून सांगितले आहेत. सत्कवीला आवश्यक असलेली भावनेची उत्कटता, भावनेतील सहजता काव्यात गुंफून त्यांची वाणी मनोरम व प्रेमपूर्ण फुलली आहे.

❁❁❁

# २३. संत आवकास्वामी

संत आवकास्वामी म्हणजेच समर्थांच्या थोर शिष्य संत चिमणाबाई! अतिशय शांत, धीट आणि मातृत्व भावनेने सगळ्यांना जिंकणारं व्यक्तिमत्त्व!

चिमणाबाई लहान असतानाच त्यांची आई वारली; परंतु वडिलांनी अतिशय लाडात वाढवून त्यांचे लग्न करून दिले. लग्न झाल्यावर त्या पहिल्यांदा माहेरी आल्या आणि  सासरी तापाच्या निमित्ताने त्यांच्या पतीचा मृत्यू झाला. वयाच्या बाराव्या वर्षी वैधव्य प्राप्त झाले. त्या पुन्हा कायमच्या माहेरी आल्या.

एकदा चिमणाबाईंच्या वडिलांची कऱ्हाड गावी समर्थांची भेट झाली. खूप आग्रहाने चिमणाबाईंच्या वडिलांनी समर्थांना आपल्या घरी आणले.

घरात शिरल्यावर समर्थांनी पाहिले तर घरात बालविधवा! त्यांचे केशवपन, नेसलेले आलवण पाहून समर्थ अस्वस्थ झाले आणि कठोर शब्दात त्यांनी समाजावर टीका केली. पती निधनानंतर मुलींची अशी विटंबना करणे, ही रानटी प्रथा आहे. असली कृत्ये समाजाने आता थांबवली पाहिजेत.

अशा स्थितीत समर्थांनी चिमणाबाईंना परमार्थाचा मार्ग दाखवला. त्या वेळी चिमणाबाईंच्या वडिलांनी समर्थांनाच अनुग्रह देण्याची विनंती केली. चिमणाबाईसुद्धा समर्थांच्या पायावर पडून आशीर्वाद मागू लागल्या.

समर्थांनी लगेच अनुग्रह दिला आणि चिमणाबाईंना म्हणाले, 'आजपासून तुम्ही रामदासी संप्रदायाच्या शिष्या आहात. आजपासून तुमचं नाव आवका असेल, ह्याच नावाने रामदासी संप्रदाय तुम्हाला ओळखेल'. त्या दिवशी चिमणाबाई ह्या खऱ्या अर्थाने 'आवकास्वामी' झाल्या आणि चाफळला समर्थांच्या सेवेत रुजू झाल्या.

त्यानंतर आश्रमाची साफसफाई, स्वयंपाकपाणी, इतर शिष्यांची देखभाल, समर्थांच्या पूजेची तयारी, ध्यानाची व्यवस्था, बैठक व्यवस्था ह्या सगळ्या गोष्टी त्या जातीने लक्ष देऊन जबाबदारीने करू लागल्या. त्या कुठेही सेवेत कमी पडत नसत. सेवेत त्या इतक्या तत्पर असत की, त्यासाठी त्या आपल्या वडिलांनाही क्वचित भेटत असत.

वडिलांच्या निधनानंतर समर्थ आदेशानुसार राहतं घर, शेती, थोडंफार घरगुती सामान सारं काही दान करून एका वस्त्रानिशी त्या पुन्हा समर्थ सेवेत रूजू झाल्या. मागे कसलेही पाश नाहीत. कसलाही मोह नाही. पूर्ण चित्ताने हाती काम, अंतरी राम हे सूत्र त्यांनी अवलंबले.

संपूर्ण मठाची त्या जणू माता झाल्या. समर्थांनी त्यांना मठपती केले. खरंतर

मठपती म्हणजे सुळावरची पोळी! परंतु, चाफळच्या मठाची जबाबदारी स्वीकारून त्यांनी मठमहंती म्हणजे काय, हा आदर्श लोकांसमोर ठेवला.

समर्थांनी कैक परीक्षा घेतल्या चिमणाबाईंच्या; परंतु प्रत्येक वेळी त्या आदर्शवादी ठरल्या.

समयसूचकता, शिस्त, संयम, सहनशीलता, समर्पण, सौदार्हता सगळे 'स'चे टप्पे पार करत त्यांनी मठमहंती कशी असावी, ह्याचा आदर्श लोकांपुढे ठेवला.

सामर्थ्यांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनाबद्दल सांगताना त्या म्हणायच्या की, ''स्त्रिया समाजाला चांगली शिस्त लावू शकतात. त्यासाठी स्त्री साक्षर असणे गरजेचे आहे.'' त्या काळी स्त्रियांसाठी साक्षरतेचे पाऊल उचलणे, ही खूप मोठी गोष्ट होती. चुकीच्या परंपरा, अंधश्रद्धा ह्या गोष्टींना समर्थांनी कधीच थारा दिला नाही. तेच समर्थांचे काम चिमणाबाईंनीसुद्धा पुढे नेले.

आवकास्वामी रामायण, एकनाथी भागवत, पांडवप्रताप अशा ग्रंथाचं निरूपण करून ह्या ग्रंथांच्या सहवासात आपला वेळ घालवत.

**पुरुषास स्त्रीचा विश्वास।**
**स्त्रीस पुरुषाचा संतोष।**
**परस्परे तारितसे।।**

हेच त्यांचे ब्रीदवाक्य होते. माउली होऊन त्या ८६ वर्षे समर्पित जीवन जगल्या. मोगलांनी केलेल्या तोडफोडीच्या वेळी गडावरील रामपंचायतन घेऊन त्या बऱ्याच काळ भूमिगत राहिल्या. त्या वेळी त्यांचे खूप हाल झाले. अन्न सोडा, पाणीसुद्धा त्यांना दोन दोन दिवस मिळाले नाही. सद्गुरूंवरील श्रद्धेमुळे त्या केवळ तग धरू शकल्या.

समर्थ इतिहासात पहिल्यांदा महिला महंतांने एकाकी दिलेला हा लढा आहे. म्हणून त्यांचे खूप मोठे महत्त्व समर्थ संप्रदायात आहे.

❀❀❀

# २४. संत अंबिकाबाई

दास डोंगरी राहतो, यात्रा देवाची पाहतो, असे म्हणणाऱ्या समर्थांनी १११ मठ स्थापन केले. कैक शिष्यांना अनुग्रह दिला. त्यांनी अनुग्रह देताना स्त्री-पुरुष असा भेद कधीही मानला नाही. उलट, स्त्रियांना शिष्य म्हणून उपदेश देऊन त्यांना मठपतीही बनवले आहे. समर्थांच्या समर्थप्रताप ग्रंथात किमान पन्नास स्त्रियांची नावं शिष्य म्हणून आहेत. समर्थ संप्रदायाने महानुभाव पंथाप्रमाणे परमार्थ क्षेत्रात स्त्रियांना अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. इथे महिलांना प्रवचन-कीर्तनाचेही अधिकार होते. स्त्रियांमधील आत्मसन्मान जागृत करणे, हे समर्थ संप्रदायाचे जणू प्रमुख कार्य होते.

अतिदु:ख झालं की, स्त्रिया आत्महत्या करून किंवा आत्मक्लेश करून जीवनाकडे नकारात्मक दृष्टीने पहात. ह्या नकारात्मकतेवर परमार्थ योग्य उपाय म्हणूनच स्त्रियांना पुरुषांप्रमाणे सगळे अधिकार समर्थांनी दिले होते. लुटालूट, स्त्रियांची विटंबना, देवधर्माचा विध्वंस, मोगलांचे जुलूम, वारंवार दुष्काळ ह्या गोष्टींनी लोक हैराण झाले होते. अशा परिस्थितीत त्यांना अध्यात्म रूचणार नाही, हेसुद्धा समर्थ जाणून होते.

**उदंड चाकरी चाकरी ।**
**परि मिळेना भाकरी ।।**
**लोक नीलंड नीलंड ।**
**नेती काढुनि पोरी ।।**

ह्या गोष्टींनी समर्थांचे अंत:करण भरून येई. अशा समर्थांच्या रचनांनी लोकांना सगळेच समदु:खी असल्याची खात्री झाली; परंतु भोंदूगिरी, भगतगीरी, अंधविश्वास इतका वाढत चालला होता की, ह्या गोष्टींना स्त्रिया बळी पडत होत्या. त्यांना दिशा देणे खूप गरजेचे होते. अखंड सावधान राहून प्रसंगाला सामोरे जाता यावे, यासाठी स्त्रियांनासुद्धा मठपती करून आध्यात्मिक गोडी त्यांनी समाजात वाढवली.

आपल्या दासबोधात नवविधाभक्ती, गुरूशिष्यलक्षण, मुमुक्षलक्षण, मूर्खलक्षण वगैरे वगैरे पारमार्थिक विषयाच्या दृष्टीने लिखाण करून आधी स्त्री पुरुषांच्यात सकारात्मकता जागृत केली.

अशाच एक सामर्थ्याच्या एक मठपती म्हणजे संत अंबिकाबाई ज्यांना आपण अंबाबाई म्हणूनसुद्धा ओळखतो.

मूळच्या विजापुरच्या; परंतु कोल्हापुरात मठ स्थापन करून त्या कोल्हापूरातच राहिल्या. राशीवडे येथे त्यांचा मठ आहे. जुन्या ग्रंथात त्यांच्या काही पदांचा, श्लोकांचा उल्लेख आहे.

**मी सद्गुरूघरची ।**
**सौरी शोभत्यें बरी ।।**
**बाई मज गोल्हाटी गे रहाणे ।**
**तेथुनि श्रीहरीमज पहाणे ।।**
**त्रिकुट खिखरी येऊनि ।**
**जाणे बोलले बरी ।।**

समर्थांचा वेळोवेळी दृष्टांत रूपात सहवास त्यांना लाभला. मी सद्गुरूंची सौरी शोभेन. ह्या ‘सौरी’ शब्दावरूनच आपल्याला कळतं की, त्यांनी संसाराचा त्याग केला होता. त्या निःसंग झाल्या होत्या. समर्थांमुळे एक वेगळे धैर्य त्यांच्यात आले होते. असे दत्तात्रेय स्वामींचे वंशज भीमाजी ऊर्फ भीमस्वामी यांनी आपल्या भक्तिलीलामृत ग्रंथात उल्लेख केला आहे.

आपल्या मठपती काळात उत्तम कीर्तन-प्रवचन करून अंबाबाईंनी मठात अनेक योजना राबवल्या. निराधारांच्या आधार तर त्या झाल्याच; परंतु आध्यात्मिक दृष्टिकोनातूनसुध्दा मठाला त्यांनी वेगळी दिशा दिली.

❀❀❀

# २५. संत जैतुनबी

वारकरी संप्रदायाची मुळं महाराष्ट्रात इतकी खोलवर रुजली आहेत की, येणाऱ्या प्रत्येक नव्या पिढीला वारीचं वेड आपोआप लागतं, हे नवल आहे.

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. ह्या महाराष्ट्राने प्रत्येक धर्माचा, संप्रदायाचा, भाषेचा नेहमी आदरच केला आहे. त्यामुळेच महाराष्ट्रावर सगळ्या संप्रदायांनी भरभरून प्रेम केले.

अशा महाराष्ट्रात बारामतीजवळील माळेगाव येथे मुस्लीम घराण्यात जन्मलेल्या संत जैतुनबी यांना वारकरी संप्रदायाची ओढ लागली आणि वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी त्या वारकरी संप्रदायात सामील झाल्या.

**बहुत सुकृताची जोडी ।**
**म्हणून देव आवडी ।।**

असे ज्ञानेश्वर सहज म्हणून जातात, कारण 'देव आवडायलासुद्धा पुण्याई असावी लागते', असे ज्ञानेश्वरांचे मत होते. अशीच भरपूर पुण्याई घेऊन जन्मलेल्या जैतुनबी यांना पाच-सहा वर्षांच्या असताना बाळकृष्णाची मूर्ती सापडली आणि त्यांना पांडुरंगाचा ध्यास लागला.

विठ्ठलाचा ध्यास लागला की, विठ्ठल भक्तांसाठी भक्तीचा मार्ग सोपा करतो, याचं साक्षात उदाहरण म्हणजे जैतुनबी!

व्यवसायाने गवंडी असणारे मकबूलभाई सय्यद हे कट्टर मुस्लीम जैतुनबी यांचे वडील होते. मकबूलभाई यांची भेट वारकरी संप्रदायाच्या गुण्याबुवांशी झाली आणि या भेटीचे मैत्रीत रुपांतर झाले. गुण्याबुवाही गवंडी असल्याने दोघे मिळून काम करू लागले. हे गुण्याबुवा वारकरी संप्रदायात कीर्तन-प्रवचनेही करत. ज्यांना आजही महाराष्ट्र 'हनुमानदास महाराज' म्हणून ओळखतो. बाळकृष्णाची मूर्ती उराशी धरून सतत विठ्ठल, विठ्ठल म्हणणारी दहा वर्षांची जैतुनबी हनुमानदासांचे प्रत्येक कीर्तन-प्रवचन ऐकायची आणि त्यात तल्लीन होऊन जायची.

पांडुरंगाच्या ओढीनं वयाच्या दहाव्या वर्षी जैतुनबी वारकरी संप्रदायात सामील

झाल्या. त्यांनी हनुमानदास यांच्याकडून दीक्षाही घेतली. त्यावेळी त्यांच्या घरच्यांनी आणि मुल्ला-मौलवींनी प्रचंड विरोध केला; परंतु आपलं सुख केवळ पांडुरंग चरणाशी आहे, असे मानणाऱ्या जैतुनबी यांनी समाजाचा रोष पत्करला, पण वारकरी संप्रदाय सोडला नाही. मुळात त्यांनी कधीही दोन धर्मांत भेदभाव केला नाही. त्यांनी मुस्लीम धर्माचेही आचार पाळले. पैगंबरासही मानले. नमाजही पडले. 'भेदाभेद भ्रम अमंगळ' ही उक्ती त्यांनी कृतीत आणली आणि पुढे आपलं संपूर्ण जीवन भागवत पताका खांद्यावर घेऊन वारकरी संप्रदायाच्या प्रचारात घालवलं.

पंढरपूर पालखी सोहळ्यात त्या सहभागी झाल्या. वारकऱ्यांनी खूप प्रेमाने जैतुनबी यांचे वारीत स्वागत केले. ह्या हृदयीचे भाव त्या हृदयाला कळले, म्हणूनच जैतुनबी काही दिवसांतच उत्कृष्ट कीर्तनकार आणि प्रवचनकार झाल्या. ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथी भागवत सगळा आध्यात्मिक अभ्यास तोंडपाठ असल्याने सायकलवरून खेड्यापाड्यांत जाऊन त्यांनी ज्ञानेश्वरांच्या आठवणींची उजळणी केली.

जैतुनबी यांच्या कीर्तनाला अफाट गर्दी जमायची. आपल्या कीर्तन-प्रवचनात मुख्य विषय त्या 'अंधश्रद्धा आणि स्त्री शिक्षण' ठेवायच्या.

स्त्री शिकली, तरच घर शिकेल, हा विश्वास त्या जनमनात जागवायच्या. हळूहळू त्यांच्या नावाने दिंडी ओळखली जाऊ लागली. पांढरेशुभ्र वस्त्र आणि कमरेला शेला बांधून आपल्या खणखणीत आवाजात त्या जनाबाई आणि मुक्ताबाईंचे विचार, अभंग लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम करीत होत्या.

महाराष्ट्रात त्यांना कमालीचा आदर होता. सासवडपासून वारीसाठी त्या प्रस्थान ठेवत असत. सोपानदेवांबद्दल विशेष स्नेह असणाऱ्या जैतुनबी सोपानाचे अभंग म्हणताना अधिक सुखावायच्या. आपल्या आयुष्यात एकदाही वारी न चुकवता ठायी ठायी प्रवचन करत विठ्ठलाचे गुणगान गाणाऱ्या जैतुनबी वयाच्या बाहत्तराव्या वर्षी वारीतील कीर्तन संपवून, पांडुरंगाला नमस्कार करून स्वखुशीने पंचतत्त्वात विलीन झाल्या.

संपूर्ण वारकरी संप्रदाय जैतुनबींच्या जाण्याने हळहळला.

आजही आळंदी आणि पंढरपूर येथे जैतुनबी यांचे मठ आहेत. जिथे माणुसकी हा एकच धर्म पाळला जातो.

❀❀❀

# २६. संत आईसाहेब पळसे

कात्रजमधील मांडवन गावी देशमुख घरात जन्मलेल्या संत आईसाहेब विरक्त वृत्तीच्या असल्यामुळे घरातील स्वतःच्या लग्नाची गडबड बघून एका रात्री त्या घर सोडून निघून गेल्या. नऊ वर्षांच्या आईसाहेबांनी घर सोडल्यानंतर वारकऱ्यांबरोबर थेट पंढरीची वाट धरली. पंढरीत एका संतांचं कीर्तन चालू होतं. आईसाहेब ते कीर्तन मन लावून ऐकत होत्या. तेव्हा त्यांनी पाहिले की, स्वतः विठ्ठल टाळ वाजवीत नाचत आहे. तेव्हा त्या जणू समाधीत गेल्या. भानावर येताच त्यांनी पाहिले तर कीर्तन संपले होते. तिथे कोणीच नव्हते. त्या तशाच मंदिरात गेल्या आणि त्यांनी ठरवले की, जोपर्यंत विठ्ठल दर्शन देत नाही, तोपर्यंत पंढरी सोडायची नाही. अत्यंत कठीण परिस्थितीत त्या देवळात राहून विठ्ठल भक्ती करीत होत्या. या लहानशा मुलीची आबाळ पाहून जणू विठ्ठल त्यांच्या स्वप्नात आला आणि म्हणाला, ‘तू पळसे गावी जा. तेथे तुझे गुरू तुझी वाट पाहत आहेत आणि जाताना माझी मूर्ती घेऊन जा. तुझी इच्छा होईल, तेथे माझी मूर्ती ठेव.’ नाशिकजवळ असलेल्या पळसे गावी आईसाहेब आल्या. सद्गुरूची भेट झाली आणि मूर्ती उचलायला गेल्या, तर मूर्ती प्रचंड जड झाली. तिथेच त्यांनी मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली. देऊळ बांधले. आई पळसे गावी गेल्या.

गुरूंकडून आत्मज्ञान घेऊन संपूर्ण आयुष्य भक्तिमार्गात वेचलं. भजन– कीर्तन करून भक्तीचा जागर केला. कालवश भजनात गुंग असतानाच गुरू आज्ञेनुसार त्यांनी आपला देह विसर्जन केला.

❀❀❀

# महिला संत : लेख व रसग्रहण - १

# महिला संत : लेख व रसग्रहण - २

# महिला संत : लेख व रसग्रहण - ३

# महिला संत : लेख व रसग्रहण - ४

# ꧁ भारतातील स्त्री संत ꧂

भारतातील संतांचा अभ्यास करताना एक गोष्ट कटाक्षाने जाणवते. ती म्हणजे, सर्व स्त्री- पुरुष संतांनी समान भक्तीचा पाया घातला आहे. सर्व संतांनी माणूस विश्वाच्या केंद्रस्थानी ठेवून सारं विश्व त्याचेच आहे, हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणूनच महाराष्ट्रातील स्त्री संतांसोबत भारतातील काही निवडक स्त्री संतांचाही उल्लेख करणे क्रमप्राप्त आहे;कारण त्यांनी दिलेल्या विचारधारेतून समाजाला भक्तीची खरी व्याख्या कळली आहे. चूल-मूल, संसार सांभाळून परमेश्वराचा वेध घेणाऱ्या ह्या संत स्त्रिया खरोखरीच भक्तीचे प्रचंड मोठे स्वरूप आहेत.

एक श्रेष्ठ विचारधारा ह्या स्त्री संतांनी भारताला दिली आहे. त्यांच्या पारमार्थिक विचारांचा आणि ब्रम्हनिरूपणाचा धागा थेट वैदिक काळापासून परिपुष्ट होत आला आहे.

वेद, उपनिषदे, गीता या ग्रंथांविषयीचे प्रेम बहुतेक सर्व प्राचीन संतांनी आपल्या अभंग साहित्यात दाखविले आहे. स्वतः कष्ट केल्याशिवाय देव साह्य करीत नाही, ही भावना समाजात स्त्री संतांनी पसरवली.

आपल्या भारतात अनेक धर्मांत आणि अनेक पंथांत पुरुषांइतक्याच अधिकारी ठरलेल्या स्त्रिया अगदी वेदकाळापासून आढळतात. लौकिकाचे बंध झुगारून, स्त्रीत्वाच्यापलीकडे जात ज्यांनी चैतन्यतत्त्वांचा आनंद घेतला आहे आणि प्रेम, पातिव्रत्य, निष्ठा, भक्ती, अवहेलना यांचे धागे ज्यांनी अलौकिकाशी जोडले, अशा स्त्रियांना कैक वेळा संघर्षाशी तोंड द्यावे लागले आहे.

भटकणाऱ्या मनाला भक्तीचा अंकुश लावून आत्मज्ञानाच्या वाटेवर पुरुषांइतक्याच अधिकारी ठरलेल्या ह्या संत स्त्रियांनी परमार्थाच्या मार्गावरील गुरुपदही भूषविले आहे. प्रपंच्याचा त्याग करून परमेश्वरप्राप्तीसाठी प्रवृत्त झालेल्या आणि समाज प्रबोधनात हातभार लावलेल्या संत स्त्रियांची ही धावती ओळख आहे.

❀❀❀

# भारतातील काही स्त्री संत

## संत कर्माबाई

**मायबाप बंधुबहिणी । तू बा सखा चक्रपाणी ।।**

या जनाबाई विचारांशी जणू प्रवृत्त असलेल्या संत कर्माबाई जगन्नाथाला सर्वस्व मानीत असत. जगन्नाथ हा आपल्या शरीराचा एक भाग असून त्याला सोवळ्यओवळ्याचा काहीच फरक पडत नाही. केवळ भक्ती आणि विश्वास ह्या दोनच गोष्टी जगन्नाथास प्रिय, अशी श्रद्धा मनात ठेवून जगन्नाथापासून एक कोस खेड्यात राहणाऱ्या गरीब संत कर्माबाई

थंडीपावसातसुद्धा तोंडबिंड न धुता, पारोश्याच काकड आरतीला जगन्नाथासाठी ताजी खिचडी करून न्यायच्या. नैवेद्य दाखवून तासनतास त्याच्या समोर बसून रहायच्या. जगन्नाथही मोठ्या आवडीने प्रकट होऊन खिचडी खात असे. तेव्हा एक साधू त्यांना म्हणाला, 'हे पाप आहे. देवाला नैवेद्य करायच्या आधी आपण शुद्ध हवे.' 'आपण अखंड शुद्ध आहोत,' असा भाव कर्माबाईंनी प्रकट करताच साधू आणि पुजाऱ्याने त्यांना शुचिर्भूत होऊन प्रातकालाचे विधी आटोपून देवळात यावे, असा सल्ला दिला. सकाळी अंघोळपांघोळ, चुलीची पूजा, सडा - रांगोळी अशा अनेक गोष्टीं उरकताना काकड आरतीस जायला उशीर होऊ लागला. देवासमोर प्रसादाची ही रास असतानाही तो खिचडीची वाट पाही. शेवटी देवानं प्रकट होऊन पुजाऱ्यांना सांगितले, 'मला सोवळ्यातील शीरापुरी नाही, तर ती खिचडी हवी. सोवळ्याओवळ्याने देव वश होत नाही, तर भक्तीने होतो.' आजही जगन्नाथाला कर्माबाईंचे प्रेम म्हणून ओवळ्यातली खिचडी काकड आरतीला नैवेद्य म्हणून दाखवली जाते.

✧✧✧

## संत गणेशदेराणी

वोंडशे येथे राहणाऱ्या संत गणेशदेराणी राजपाट सोडून केवळ संतसेवा करीत होत्या. साधुसंतांची सेवा हीच ईश्वरसेवा, हा विश्वास ठेवून साधुसंतांबरोबर जततप

करत होत्या. राजा मधुकर शहा कधीही पत्नीच्या भक्ती आड येत नसे. एकदा एक भोंदू साधू खूप दिवस साधुसंतांच्या गटात राहून राजथाट उपभोगत होता. एके रात्री राजाचे धन चोरून तो पळून जात असता संत गणेशदेराणींनी त्यांना अडवले. तेव्हा त्याने जोरात राणीच्या दिशेने चाकू फेकला. तो राणीच्या पायाला लागला, परंतु जखमेकडे लक्ष न देता इतकंच नाही, तर सगळं धन आपण घेऊन जावे, असा आग्रह राणीने धरला; कारण भक्तीमध्ये धन लागतच नाही, केवळ मनात भाव लागतो. 'खोटे साधुसंत होऊन लोकांना लुटू नका. संतांना धनाचा मोह कधीच नसतो.' असे सांगून त्यांनी त्यांचे सगळे स्त्रीधन समोर ठेवले. भोंदू खजिल झाला. साक्षात परमेश्वर अवतरून त्यांनी गणेशदेराणीच्या जखमेवर मलमपट्टी केली. संत गणेशदेराणीने आपले संपूर्ण जीवन केवळ परमेश्वराच्या नामस्मरणात घालवले.

✧✧✧

## ❁ संत कर्मोतिबाई ❁

वडिलांनी मुलीला आशीर्वाद दिलेला आपण अनेक ठिकाणी पाहिला आहे; परंतु जेव्हा मुलगी संतपदाला जाऊन वडिलांना आशीर्वादाबरोबर दीक्षा देते, तेव्हा खऱ्या भक्तीचा साक्षात्कार होतो. लहानपणापासूनच विरक्त असलेल्या आणि वृंदावनात राहणाऱ्या संत कर्मोतिबाईंना कृष्णाचे प्रचंड वेड. बालपणीच विवाह झालेल्या व स्वतःला गोपी समजणाऱ्या संत कर्मोतिबाई वयात आल्यावर पती जेव्हा त्यांना नेण्यास आला, तेव्हा त्या रात्री घर सोडून निघून गेल्या आणि वृंदावनातील रस्त्यावर तपश्चर्येसाठी जागा शोधू लागल्या. इतक्यात एक मेलेला, काहीसा सडलेला, जनावरांनी पोखरून टाकलेला उंट त्यांना रस्त्यात दिसला. शरीराची चण बारीक असल्यामुळे त्या उंटाच्या पोटात जाऊन तपश्चर्येला बसल्या. प्रपंच दुर्गंधीपुढे त्यांना प्रेताची दुर्गंधीही जाणवली नाही. पुढे काही दिवसांनी वृंदावनातील ब्रम्हकुंडावर बसून त्यांनी तपश्चर्या केली आणि एक दिवस अचानक पतीसकट घरची सगळी मंडळी शोध घेत ब्रम्हकुंडावर पोहचली. घराण्याचं नाक कापलंस, असा त्यांच्यावर दोषारोप केला. तेव्हा संत कर्मोति म्हणाल्या, 'हरिभक्ती हेच नरदेहाचे नाक आहे. बाकी सगळा मोह आहे. हे भक्तीचे नाक तुमच्याजवळ नव्हतेच कधी. मग दुःख कशाचे?' आणि त्या पुन्हा हरिभक्तीत लीन झाल्या. तेव्हा वडिलांनी त्यांच्यातील संतत्व ओळखून त्यांना

नमस्कार केला. आजही वृंदावनात गेल्यावर ब्रम्हकुंडावर संत कर्मोतिबाईंची कुटी यात्रेकरूंना दाखवण्यात येते. संत कर्मोतिबाईंचे चरित्र आजही वृंदावनात आनंदाने गायले जाते.

✧✧✧

## ❁ संत गोमाई ❁

'छोड दिया वैकुंठ', हरि भावभगत का भूखा, 'ह्या संत कबीरांच्या शब्दांचा प्रत्यय पंढरीच्या वाटेवर चालताना प्रत्येक भक्ताला येतो. अर्थात, वृद्ध संत गोमाईसुद्धा त्याला अपवाद नव्हत्या. मनामध्ये केवळ पांडुरंग भेटीची आस धरून मजल दरमजल करत पंढरपुरी चालत निघालेल्या वृद्ध संत गोमाईंची तहान-भूकसुद्धा हरपून गेली होती. आपल्या हीन जातीची भीती मनी बाळगून विठ्ठलाची मूर्ती आपल्याला दुरून जरी दिसली, तरी वारीचे सार्थक झाले, ह्या भावनेने आषाढी वारी करत असताना अचानक चंद्रभागा पाण्याने फुगलेली दिसली. चहूकडे वादळी पावसाने थैमान घातले. हातात पैसा नसला, तरी मनात प्रचंड भक्ती होती. चंद्रभागेच्या तीरी अंधारात बसून पाण्याचा जल्लोष त्या पाहत होत्या. ह्यावर्षी बहुतेक एकादशीला पांडुरंगाचा कळसही दिसणार नाही, ही भावना मनात दुःख देत होती. तेवढ्यात समोरून नावेत बसून पांडुरंग आला व तिला राऊळात घेऊन गेला आणि म्हणाला, 'तुम्ही जसे व्याकुळ असता, तसा मीसुद्धा व्याकुळ असतो तुमच्या भेटीसाठी.' आपलं संपूर्ण जीवन पांडुरंगाच्या सेवेसाठी वेचणाऱ्या संत गोमाई पांडुरंगाच्या लाडक्या भक्त होत्या.

✧✧✧

## ❁ जनी ❁

बाभुळगावातील संत जनी ही नामदेवांच्या जनाबाईंचा अवतार समजली जायची, असे दासगणूमहाराज सांगत. जनाबाईंना विठ्ठलाचे वेड होते आणि बाभुळगावमधल्या जनीला दत्तात्रयांचे वेड होते. इतके की, लोक ह्या जनीला वेडीच समजत होते.

परंतु जनीमध्ये इतकी आध्यात्मिक आणि ब्रम्हविद्येची ताकद होती की, ती गुरे चारायला नेल्यावर, इतर गुराखी मुलांना योगबलाने तूपपोळी खाऊ घालायची. लहान

मुलं तर खूश होऊन तिच्याबरोबर गुरं चारायला जायची.

गोले गावास मठ उभारून तिथे दत्तात्रेयस्वामींची स्थापना करून परमार्थ मार्ग म्हणजे काय, हे लोकांना समजावण्याचा प्रयत्न ती करायची. त्यांच्या अंगात प्रचंड यौगिक शक्ती होती; परंतु स्वतःसाठी त्या शक्तीचा त्यांनी कधीही उपयोग केला नाही.

✧✧✧

## ❁ संत राजकन्या आणि संत इची : भाग १ ❁

श्रद्धेने पूजा केली, तर दगडातही देव सापडू शकतो, हेच तत्त्व संत साहित्यात दिसते. त्यात लहान, निरागस मुलांच्यात देवाचाच अंश असल्यामुळे त्यांच्यावर देवाची कृपाही असतेच. ह्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे संत इची आणि संत राजकन्या.

संत इची ह्या जमीनदाराच्या कन्या! राजकन्या आणि इची या खास आध्यात्मिक मैत्रिणी आणि त्यांच्या गप्पासुद्धा नेहमी देवाधर्मावर! दोघीही परिस्थितीने साधारण!

हिंदीभाषिक राजकन्येच्या घरी वडिलांचे सद्गुरू आले. त्यांच्या वडिलांनी सद्गुरूंची यथासांग आगतस्वागत, पूजाअर्चा केली. तेव्हा दोघी मैत्रिणी गुरुपूजेत हरवून गेल्या होत्या.

पूजा संपल्यावर दोघींनी सद्गुरूंकडे देव मागितला. तेव्हा शाळीग्राम म्हणून सद्गुरूंनी चक्क दोघींच्या हातावर एक एक छोटा दगड ठेवला आणि म्हणाले, ‘यातील एकाचे नाव सिल्ल व दुसऱ्याचे नाव पिल्ल आहे.’ शाळीग्राम म्हणजे शंकर; परंतु त्याचे सिल्लपिल्ल असे नाव समजून दोघी संत मैत्रिणी त्याची मनोभावे पूजा करायच्या.

एकदा इचीच्या भावाने घरातील वस्तू खाली अंगणात टाकल्या. त्यात सिल्लपिल्ल शाळीग्रामसुद्धा दगड समजून फेकला. तो छोटासा दगड कुठेही दिसेना. त्यात हे सामान त्या दगडावर. परंतु, संत इचींनी सिल्लपिल्लचा धावा केला. अन्नपाणी वर्ज्य केले. तीन दिवसांनी संपूर्ण फेकलेले सामान हवेत तरंगत वर आले. साक्षात् शंकरांनी त्यातून दगड काढून संत इची ह्यांच्या हातात दिला. संत इचींच्या तपश्चर्येमुळे सगळ्यांना देवाचे दर्शन झाले. पुढे संपूर्ण आयुष्य सिल्लपिल्लच्या पूजेत संत इचींनी घालवले.

✧✧✧

## ❁ संत राजकन्या आणि संत इची : भाग २ ❁

संत राजकन्येचा मात्र बालविवाह झाला. लग्नानंतर राजकन्या सिल्लपिल्लला सासरी घेऊन गेली आणि तिथे त्यांची मनोभावे पूजा करू लागली; परंतु सासरकडच्यांना ही आकार नसलेल्या दगडाची पूजा पटेना. दगडासमोर काय तासनतास बसून रहायचे, म्हणून संत राजकन्येचा सिल्लपिल्ल दगड आणि पूजेची भांडी नदीत फेकण्यात आली. संत राजकन्या नदीकाठी बसून पूजा करायची. तिने अन्न वर्ज्य केले. सासरकडच्यांनी मारले, तरी ती नदीच्या इथून हलेना. शेवटी नदीतून तो सिल्लपिल्ल दगड आणि पूजेची भांडी घेऊन साक्षात देव वर आले. शंकराला पाहताच सगळे भांबावले, पण संत राजकन्येने पटकन त्याच्या हातातला सिल्लपिल्ल दगड घेतला आणि हृदयी लावला आणि देवाचे आभार मानले. पुढे संसारात तिचे मनच रमेना. सगळ्याचा त्याग करून तिने संपूर्ण आयुष्य सिल्लपिल्ल दगडाची पूजा आणि भजनात घालवले.

✧✧✧

## ❁ संत वारांगना ❁

दत्तगुरुंनी एकूण चोवीस गुरू केले. त्यांत पिंगला वेश्येलाही त्यांनी गुरू केले आहे; कारण त्यांच्या मते, मनुष्य मुळात वाईट नसतो. परिस्थिती वाईट असते आणि ज्या क्षणी तुम्हाला केलेल्या कर्मांचा पश्चात्ताप होऊन केवळ परमेश्वर सर्वेसर्वा वाटतो, तो क्षण तुम्हाला मोक्षाकडे घेऊन जातो.

अशीच कर्नाटक प्रांतात रंगपट्टण गावी एक वेश्या होती. अफाट श्रीमंती; परंतु संपत्ती सत्कारणी लागत नाही, ह्याचे तिला दुःख होते. श्रीरंगाचे एकदा तरी दर्शन व्हावे, हीच इच्छा होती. समोर श्रीरंगाचे मंदिर, पण मंदिरात जाण्यास मनाई होती. तिचे पैसेही कुणी घ्यायचे नाही. रात्रंदिवस श्रीरंगाचा ध्यास, पण आपल्या नामस्मरणाला किंमत नाही, हीच मनी भावना असे. एकदा खूप मोठा संतमहंतांचा तांडा तिच्या बागेत विश्रांतीला थांबला. अर्थात, त्यांना ही बाग एका वेश्येची आहे, हे माहीत नव्हते.

ही गोष्ट त्या वेश्येला कळली. तिला खूप आनंद झाला. तिने महंतांसाठी फळ, फराळ सज्ज केला; परंतु ते आपल्या हातचे कसे खातील, ह्या विचाराने ती दुःखी

झाली. तिने एका ताटात सोन्याच्या मोहरा आणि द्रव्य भरून ते ताट मुख्य महंतांपुढे केले. महंत म्हणाले, 'आम्ही साधू काय करू ह्या सोन्याचे. त्यापेक्षा हे द्रव्य श्रीरंगाला वहा, त्याचा उपयोग गोरगरिबांना होईल.' 'पण मी हीन आहे' , असे तिने म्हणताच महंत स्वतः तिला देवळात घेऊन गेले. देवाच्या मुकुटावर फुले वहायला सांगितली. तेव्हा चक्क श्रीरंगाने मान वेश्येच्या पुढे केली. तिने फुले वाहिली. आपली भक्ती देवाला पोहचत होती, ह्याचा तिला साक्षात्कार झाला. पुढे आपली सर्व संपत्ती श्रीरंगाच्या दारात सोडून तिने केवळ नामस्मरणात आपले मन ओतले.

✧✧✧

## ❁ आंदाळ ❁

भारतात भक्तीची परंपरा सुरू केलेल्या 'अलवार' संतांच्या माळेतील ह्या स्त्री संत!

आंदाळ ह्या शब्दाचा अर्थच मुळी देवावर सत्ता गाजवणारी. तामिळ भूमीवरील ही स्त्री संत श्रीरंगाची प्रिया म्हणून गौरविली जाते. वयाच्या नवव्या वर्षी अनेक अभंग लिहून श्रीरंगाच्या देवमूर्तीत विलीन झालेली कुमारी संत भक्तीचा चमत्कार आहे.

✧✧✧

## ❁ लल्लेश्वरी ❁

लल्लेश्वरी ही काश्मीरमधील आद्य कवयित्री मानली जाते. तिला मागील सहा – सात जन्म ज्ञात होते.

**ढीली हैं डोरी गठडी ।**
**भार उठाऊ मैं कैसे ।।**

असे म्हणत जीवनाचा सिद्धांत लल्लेश्वरींनी सांगितला. त्या नेहमी म्हणत की, 'तुम्ही कितीही देवाचं केलं, तरी देव तुम्हाला मृत्यू दिल्याशिवाय राहणार नाही. मृत्यूशिवाय संसार नाही. जर मृत्यू आहे, तर चांगले कर्म सोबत असणे गरजेचे आहे. म्हणून सतत चांगलेच वागले पाहिजे. ईश्वराशी नातं, हेच खरं नातं, बाकी सब झुठ हैं. मन में केवल ईश्वर चाहिए.'

मोक्षप्राप्तीचे अनेक मार्ग आपल्या अभंगांत त्यांनी लिहिले आहेत.

भारतातील एकमेव स्त्री संत, ज्यांच्या अभंगामुळे सर रिचर्ड टेंपल हे भारतीय तत्त्वज्ञानाकडे वळले आणि 'द वर्ल्ड ऑफ लल्ला' हा ग्रंथ त्यांनी लिहिला.

✧✧✧

## ❁ अक्कामहादेवी ❁

वीरशैव धर्माशी संबंधित एक प्रसिद्ध महिला संत. शिवाची परमभक्त!

आपल्या ४३० श्लोकांतून त्यांनी संपूर्ण परमार्थ उलगडा.

**'माझ्या शरीरावर केवळ माझा हक्क आहे,'**

हे ठाम मत पतीसमोर ठेवून दिगंबर अवस्थेत राजपाट सोडणारी पहिली स्त्री संत! ज्यांनी दक्षिणेतल्या विद्रोही साहित्यातील **'वचन साहित्य'** ही परंपरा सुरू केली. आयुष्यभर त्या दिगंबर अवस्थेतच वावरल्या. आपल्या लांबसडक केसांनी आपलं शरीर झाकून चेन्नमल्लिकार्जुन(शिव) यांची भक्ती केली.

संत मीराबाईंप्रमाणे त्या शंकरालाच (देवालाच) आपला पती मानत होत्या.

चेन्नई बासावा, किन्नरी बम्मैय्या, सिद्धार्थ, आलमप्रभू अशा वीरशैव धर्माच्या इतर संतांनी उच्च स्थान दिले.

✧✧✧

## ❁ संत मीराबाई ❁

भारताची भूमी ही निर्मळ भावनेची आणि श्रद्धेची भूमी आहे. या निर्मळ भावनेतूनच भक्तिप्रवाह निर्माण झाला. याचे अजून एक उदाहरण म्हणजे, संत मीराबाई!

मेवाडच्या संत मीराबाई साक्षात श्रीकृष्णास आपला पती मानत. त्या श्रीकृष्णाच्या महान भक्त होत्या. राजपाट वगैरे कशातही रस नसलेली मीरा, केवळ संत-महंत ह्यांच्यासोबत बसून भजन-कीर्तन करायची. मधुराभक्तीचे उत्तम उदाहरण म्हणजे, मीराबाई! आपल्या अंगावरील सर्व दागदागिने कृष्णमूर्तीला वाहून आपल्या

सुखाचे कृष्ण केवळ प्रमाण आहे, असे दाखवणाऱ्या मीराबाई विषही सहज प्यायल्या. असे म्हणतात की, जेव्हा शेवटी शेवटी वृंदावनात मीराबाई आल्या, तेव्हा त्यांचा पदर पकडून कृष्ण त्यांच्या बरोबर चालताना अनेक लोकांनी पाहिले आणि तेव्हा सगळे खऱ्या अर्थाने मीराबाईंना शरण गेले.

✧✧✧

## ❁ सिस्टर अल्फोन्सो ❁

भारतातील तीन स्त्रियांची संत म्हणून गणना ख्रिस्ती धर्मात होते. त्यातील एक स्त्री संत म्हणजे, सिस्टर अल्फोन्सो!

केरळा येथील सिस्टर अल्फोन्सो ह्या आई नसल्याने आपल्या मावशीकडे वाढल्या; परंतु त्या वेळी प्रचंड त्रास त्यांना सहन करावा लागला, पण संतपरंपरा ही भक्तीशी जोडलेली असते, म्हणूनच भक्त ह्या कौटुंबिक त्रासाकडे लक्ष न देता देवाशी अनुसंधान साधतो. तेच सिस्टर अल्फोन्सोंनी केले. त्या प्रार्थनेतून सतत देवाशी संवाद साधयच्या. देवापासून आपल्या कोणी वेगळे करू नये, म्हणून त्यांनी आपले पाय आगीत पोळून अपंगत्व स्वीकारले आणि आपले आयुष्य प्रार्थनेच्या माध्यमातून ख्रिस्ती बांधवांसाठी वेचले. आत्मज्ञान देण्यासाठीच त्या धर्मभगिनी झाल्या.

✧✧✧

## ❁ संत युफ्रेसिया ❁

मूळ रोझा नाव असलेल्या संत युफ्रेसियांचा जन्म कोचिन येथे अत्यंत धार्मिक घरात झाला.

विनम्रतेचा वारसा लाभलेल्या युफ्रेसिया यांना वयाच्या नवव्या वर्षी देवदूत आपल्याला साद घालतोय, ही जाणीव झाली आणि प्रभूच्या पायाशी जीवन घालवायचे त्यांनी ठरवले. अनेक चमत्कारिक प्रसंग त्यांच्या आयुष्यात घडले. त्या कागदावर आपले प्रश्न लिहून देवापुढे ठेवीत. देवाला साकडं घालीत. त्यांच्या भक्तीपुढे देव नतमस्तक होऊन चक्क त्यांच्या प्रश्नांना उत्तरे द्यायचा.

✧✧✧

## ❁ राबिया ❁

इस्लामी धर्मात निवृत्तीने राहून परमेश्वराचा साक्षात्कार करू इच्छिणारे अनेक सूफी संत निर्माण झाले. त्यांतील अत्यंत प्रेमळ आणि विद्वान स्त्री संत म्हणजे, राबिया!

राबिया ह्या कृष्णभक्त होत्या. पैगंबरांच्या वचनांचा आध्यात्मिक अर्थ लावून वेदांताच्या तत्त्वज्ञानाशी त्यांची बरोबरी करत ह्या अभारतीय सूफींनी आपल्या तत्त्वज्ञानाची बैठक दृढ केली. कृष्ण म्हणजे मोक्ष आणि कृष्ण म्हणजे सुख, असे मानणाऱ्या राबियांनी प्रत्येक गोष्ट ही आपल्या आत असते, ती आतच शोधावी, असे तत्त्वज्ञान सांगून आत्मपरीक्षण करणे, हीसुद्धा माणसाची अन्न – वस्त्र – निवारा इतकीच महत्त्वाची गरज आहे, ह्या मतावर काव्ये लिहिली. मनशुद्धीसाठी केवळ भक्ती हाच एकमेव मार्ग आहे आणि तोच मार्ग संत राबिया यांनी निवडला. देवासाठी काही सुंदर करायचे असेल, तर मानवसेवा नक्की करा, हा संदेश त्यांनी समाजाला दिला.

✧✧✧

## ❁ संत निरुमा ❁

संस्कार हे मनुष्याच्या मनातील श्रद्धा, भावना, स्वभावाशी निगडित असतात, अशाच चांगल्या संस्काराचे बाळकडू मिळालेल्या गेल्या शतकातील गुजराती स्त्री संत म्हणजे, संत निरुमा! गुजरातमधील ज्ञानी संत दादा भगवान ह्यांना आपले गुरू करून, त्यांच्याकडून भक्तीची दीक्षा घेऊन, ज्ञान हे केंद्रस्थानी ठेवून संत निरुमांनी आपल्या वैद्यकीय अभ्यासाचा त्याग केला. स्त्रीरोगतज्ज्ञ असणाऱ्या संत निरुमांनी आपल्या गुरूंचे ज्ञान हेच सर्व दुःखांवर गुणकारी, रामबाण औषध आहे, हे समाजाला सांगण्यात धन्यता मानली. संत दादा भगवान यांचे मौलिक विचार आणि मौलिक ज्ञान तळागाळापर्यंत लीलया पोहोचवण्यासाठी त्यांनी वैद्यकीय क्षेत्राकडे पाठ फिरवली. आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी केवळ समाजकल्याणाचा विचार केला. आजही गुजरातमधील संत दादा भगवान यांच्या प्रत्येक अनुयायांच्या हृदयात आध्यात्मिक जागृती करणाऱ्या संत म्हणून निरुमांचे स्थान विराट आहे. सकारात्मकता ही आधी विचारात असावी लागते, तरच आपोआप आपला सकारात्मक दृष्टिकोन होतो, हा सुखाचा मंत्र त्यांनी समाजाला दिला.

✧✧✧

## ❁ संत कलावती आई ❁

निसर्ग हा माणसाचा खरा महान गुरू आहे. त्याची सेवा करणे, हाच खरा मानव धर्म आहे, अशी शिकवण आपल्या प्रवचन- कीर्तनांतून देत अखंड जनसेवा करणाऱ्या संत म्हणजे, संत कलावतीआई!

परमेश्वर सर्वांचांच मायबाप असून आम्हा सर्व लेकरांना त्याचे सारखेच प्रेम मिळायला हवे, असे आपल्या प्रासादिक, गोड वाणीतून खेडोपाडी जाऊन लोकांच्या मनात नामस्मरणाचे बीज पेरणाऱ्या संत कलावतीआई सिद्धारूढ स्वामींच्या शिष्या होत्या. निरभिमानपणाने व अत्यंत आपुलकीने केलेली आश्रमाची सेवा पाहून रूक्माबाईंना स्वतः सिद्धारुढ स्वामींनी कलावतीआई हे नाव दिले होते. जे नाव आजही स्त्री संतांच्या मांदियाळीत आदराने घेतले जाते.

टाळ कुटणे हे रिकामटेकड्यांचे काम आहे, असे समजणाऱ्यांचा गैरसमज दूर करताना कलावतीआई म्हणायच्या, 'भजन हे संसाराच्या उद्वेगाने तापलेल्या हृदयाला शांत करणारे सोपे, सुगम सर्वोत्कृष्ट साधन आहे.' भजन- कीर्तनांद्वारेच कलावतीआईंनी विश्वप्रेमाचा प्रसार करीत आपला देह झिजवला.

## संत जानकीआई

**तुज संगे गे आम्ही राहू ।**
**सुख दुःख सारे पाहू ।।**

असे स्वतः जेव्हा साक्षात कडाप्याची देवी आपल्या प्रिय भक्ताला म्हणते. अर्थातच, कुमारिका असलेल्या जानकीआईंना म्हणते, तेव्हा तिथेच जानकीआईंचे संतत्व सिद्ध होते. गुजरातमधील गणदेवी हे छोटेसे गाव जानकीआईंच्या पदस्पर्शाने तीर्थक्षेत्र बनले. अशा जानकीआईंनी गुजरातमधील प्लेगच्या साथीत घरोघरी जाऊन रुग्णांची सेवा केली. ज्याला सर्वत्र ईश्वर दिसतो, तो कधी प्रेमात अंतर देत नाही, त्याला मनुष्य, पशुपक्षी सगळे सारखेच असतात. प्रेम आणि धीर हेच औषध सगळ्या समस्यांवर असून, जर प्रत्येक गोष्ट प्रेमाने हाताळली, तर जगातील अर्धी दुःखे नाहीशी होतील, असा विश्वास जनमनात पेरत वेळोवेळी लोकांना भक्तीचा मार्ग दाखवत, देवाच्या सान्निध्यात तासनतास रमणाऱ्या जानकीआईंची शिकवण आजही गुजरातमधील गणदेवीत गिरवली जाते.

✧✧✧

## ❁ संत सहजोबाई ❁

दिल्लीतील परीक्षितपूर येथे जन्मलेल्या संत सहजोबाई ह्या संत चरणदास यांच्या शिष्या!

दोन बिंदूंमध्ये सरळ रेघ मारणे खूप कठीण आहे, पण वाकडी रेघ सहज मारता येते. जन्म – मृत्यू हे दोन बिंदू आहेत. खूपवेळा ह्या दोन बिंदूतून प्रवास करताना आपण सरळ वागण्याच्या प्रयत्नात कधी वाकडे होत जातो, हे आपलेच आपल्याला कळत नाही. मग सरळ कसे व्हायचे, हे जीवनाचे तत्त्वज्ञान सहजोबाईंनी आपल्या **'सहज प्रकाश'** ह्या ग्रंथात सांगितले आहे.

सहजोबाई या योगसाधिका, कवी, विदुषी व भार्गव वंशातील गौरवशाली स्त्री संत होत्या.

**हरीने जन्म दियो जग माही ।**
**गुरू ने आवागमन छुटाही ।।**

असे म्हणत 'देव मी पाहिला नाही, पण गुरूला मी साक्षात पाहिले आहे. त्यामुळे देवापेक्षा माझी गुरूंवर श्रद्धा जास्त आहे, असे त्या आपले मत मांडतात. गुरुमहिमा आपल्या मधुर वाणीतून गावोगावी जाऊन गाणाऱ्या संत सहजोबाईंनी भक्तीचा वेगळा अध्याय दिल्लीवासियांना सांगितला.

अजपा गायत्रीचे अंग आणि जन्म – मरण अवस्था हे विषय त्यांच्या अभंगांत जास्त आढळतात.

✧✧✧

## ❁ संत दयाबाई ❁

राजस्थान येथील संत दयाबाईंची अभंगांची भाषा मेवाडी आहे. अभंगांबरोबर तीन ग्रंथदेखील त्यांनी लिहिले. त्यांतील **'विनय मालिका'** आणि **'दयाबोध'** हे ग्रंथ जरी तत्त्वज्ञानाने भरलेले असले, तरी त्यातील भाषा अत्यंत कोमल आणि हृदयस्पर्शी आहे.

दयाबाईंचे दोहे कबिराच्यां दोह्यांप्रमाणेच बारीकसारीक गोष्टींचे महत्त्व सांगणारे आहेत.

आपल्या सहजसोप्या भाषेत त्या लिहितात की, चार पुरुषार्थ म्हणजे – धर्म, मोक्ष, अर्थ, काम जरी वाङ्मयात असले; तरी स्त्रियांसाठी काहीच नाही असे नाही. स्त्री ही आदिशक्ती आहे. तिचे महत्त्व वाङ्मय जाणून आहे. ते महत्त्व सिद्ध करण्यासाठी सगळ्यांशी स्नेहाने व ममत्वाने वागले, कारण की, स्त्री ही ममते प्रतीक आहे.

दयाबाई अभंगांत खूपवेळा स्वतःला चातकाची आणि भगवंताला ढगाची उपमा देताना दिसतात. **'साधको अंग'** ह्या दोह्यामुळे दयाबाईंच्या सत्संगाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले.

अशा ह्या राजस्थानी स्त्री संत चरणदासांच्या शिष्य होत्या.

✧✧✧

## ❁ संत रत्नावली ❁

पत्नी ही पतीची गुलाम नसून त्याची सहचारिणी असते, अशी स्वतंत्र विचारसरणी घेऊन संत रत्नावली यांनी आंबेरच्या राजकुमाराशी लग्न केले; परंतु

आंबेरनृप श्री. मानसिहं आणि रत्नावलीचे पती माधवसिंह ह्यांना रत्नावलीची ही विचारसरणी आणि कृष्णभक्ती पटणारी नव्हती.

मेरे तो गिरिधर गोपाल, दुसरो ना कोय।

असे म्हणत मीराबाईंच्या अभंगांचा वारसा आपल्या मधुर वाणीने समृद्ध करणाऱ्या संत रत्नावली

दिवसरात्र कृष्णाच्या भक्तीत तल्लीन असायच्या. हळूहळू भक्तीची ही ओढ त्यांना सर्वसामान्य लोकांच्यात घेऊन गेली. गोरगरिबांना मदत करणे, अन्नधान्य मोफत वाटणे, रंजल्यागांजलेल्यांची सेवा करण्यात रत्नावली हरवून जायच्या. गावातील प्रत्येक देवळात कृष्णाची महती सांगून लोकांना भक्तीचा लळा लावणाऱ्या संत रत्नावलींना शेवटी माधवसिंहांनी रागाने बैरागन म्हणत राजकोठडीत बंदिस्त केले. तरीही रत्नावली यांचे कृष्णावरील प्रेम यत्किंचितही कमी झाले नाही. तिथेही त्या पायोजी मैने राम रतन धन पायो... म्हणत कृष्णलीला सांगत बसायच्या! अशाने राजवाड्याचे रूपांतर अनाथाश्रमात होईल, ह्या भीतीने त्यांच्यावर दहा दिवसांचा भुकेलेला वाघ सोडण्यात आला ;परंतु रत्नावली 'तुम जो तोडो पिया, मैं नाही तोंडू ।

तेरी प्रित छोडू कृष्णा, कौन संग जोडू.... ह्या भजनात इतक्या रंगून गेल्या होत्या की, वाघ त्यांना कृष्ण वाटला. त्यांना खूप आनंद झाला. वाघही संत रत्नावली ह्यांच्या पायांशी नतमस्तक झाला. दोघांची गळाभेट झाली. हा चमत्कार पाहून संत रत्नावली यांच्या कृष्णभक्तीत पुढे कधीच कुणी बाधा आणली नाही.

✧✧✧

## ❁ संत लोयण ❁

प्रोफेसर रामवीर सिंह यांनी संतांची व्याख्या करताना म्हटले आहे की, 'संत म्हणजे साक्षात चालतेबोलते परमेश्वर! समाजाला निर्भिडपणे उत्तर द्यायची हिंमत केवळ संतांमध्ये असते.'

ह्याचे उत्तम उदाहरण म्हणजे गुजरातच्या संत लोयण!

आपल्या सौंदर्याला शाप समजणाऱ्या आणि दिवसरात्र परमेश्वराचे चिंतन करणाऱ्या संत लोयण यांनी आपले सगळे अभंग दुष्ट राजा लाखा ह्यांच्यावर लिहून माणूस चुकीचा वागला, तर परमेश्वर त्याला कधीच माफ करत नाही, याची कैक उदाहरणे सांगितली आहेत.

तुम्ही जर नामस्मरणाच्या छायेत असाल, तर कोणतेही वाईट कर्म, वाईट शस्त्र, वाईट नजर, वाईट विचार तुम्हाला शिवणार नाहीत. कृष्णाला आपलं सर्वस्व मानणाऱ्या, अप्रतिम सौंदर्य लाभलेल्या संत लोयण सदा नामस्मरणाच्या आच्छादनात असल्यामुळे इतरांना, दुष्ट राजाला मात्र हाडांचा सांगाडा असणारे भूत वाटायच्या! आपल्या अमोघ वाणीने परमेश्वराचे महत्त्व सांगणाऱ्या संत लोयण यांनी आपल्या प्रचंड भक्तीने परमेश्वराला जणू गुलाम करून घेतले होते, असे प्रोफेसर सिंह आपल्या ग्रंथात सांगतात.

✧✧✧

## ❁ संत मिनाक्षीअम्मा ❁

संत मिनाक्षीअम्मा ह्या तिम्मगुडीच्या राहणाऱ्या असल्या आणि अमराठी असल्या, तरी त्यांनी मराठी वाङ्मयात मोलाची भर आहे. त्यांनी कृष्णावर लिहिलेले

अभंग इतके मधुर आहेत की, त्यांना **'मंत्रवादीण'** म्हणून ओळखले जाते.

त्यांनी लिहिलेल्या **'हळदे उटण'** काव्याची तुलना एकनाथांच्या हळदुलीशी करतात. आई मुलाचे प्रेम, कृष्णाचे रूसलेले भाव हे सारे काही नाट्यपूर्ण प्रसंग अम्मांनी आपल्या भावनाट्य काव्याने रंगवून ते गेय पद्धतीने सादर करून कृष्णाला आपल्या प्रेमात पाडले. संत मिनाक्षीअम्मा ह्या माधवस्वामींची नातसून असल्या, तरी भक्तिक्षेत्रात त्यांची स्वतंत्र खूप मोठी ओळख आहे.

✧✧✧

## ❁ भगिनी निवेदिता ❁

परदेशात जन्मलेल्या आणि प्रत्येक कलेवर मनापासून प्रेम करणाऱ्या तीसवर्षीय मार्गारिट नोबेल ह्या हिंदुस्थानातील स्वामी विवेकानंदांच्या भाषणांनी प्रभावित होऊन हिंदुस्थानात आल्या आणि त्यांनी विवेकानंदांचे शिष्यत्व पत्करले. दीक्षा दिल्यावर स्वामीजींनी त्यांचं नाव 'निवेदिता' ठेवले. पुढे स्वतःच्या सवयी, अहंकार, स्वभाव बाजूला सारून त्यांनी हिंदू संस्कृतीचा अभ्यास केला आणि हिंदू संस्कृतीच्या विविध पैलूंवर त्यांनी ग्रंथ लिहिले. निवेदितांनी आपल्या गुरूंची आज्ञा शेवटच्या श्वासापर्यंत पाळली आणि आपले संपूर्ण आयुष्य गोरगरीब स्त्रियांच्या सेवेसाठी छोट्या झोपडीत राहून वेचले. बंगाली आणि हिंदी दोन्ही भाषा शिकून त्यांनी स्वतःची शाळा काढली. भारताच्या सामर्थ्यसंपन्न होण्याच्या वाटचालीकडे सतत आत्मीयतेने पाहिले. लिखाणाची आणि प्रवचनाची संधी त्या कधी सोडायच्या नाही, कारण या दोन माध्यमांनी आपण आपल्या गुरूंचे विचार लोकांच्या मनापर्यंत पोहचवू शकतो, याची त्यांना खात्री होती. शाळेतील मुलांच्या हिताचा विचार आणि गुरूचा वारसा हेच माझ्या मोक्षाचे कारण असेल, असे म्हणणाऱ्या निवेदितांची दार्जिलिंग येथे प्राणज्योत मालवली.

✧✧✧

## ❁ माता शारदादेवी ❁

पैसा मानवाला देवापासून दूर नेतो, असा ठाम विश्वास असणाऱ्या संत शारदादेवी ह्या रामकृष्ण परमहंस यांच्या पत्नी होत्या. स्वामीजींच्या सहवासात राहून

सर्व विकारांपासून अलिप्त झालेले त्यांचे मन पूर्णतः आध्यात्मिक विचारांनी भरून गेले होते. चांदोबा जसा सर्व मुलांचा मामा, तसा देवही सर्वांचा मायबाप आहे आणि आपल्या देवाचं दर्शन भक्ती केल्यावर सहज मिळतं, असं परमहंसांनी सांगितल्यावर शारदादेवींनी स्वामींच्या प्रत्येक विचारांना साथ दिली. त्या स्वामीजींना एखाद्या लहान मुलाप्रमाणे जपत. स्वामीजी स्वतः त्यांना आपली आईच समजत. 'शांती हवी असेल, तर कोणाचेही दोष पाहू नयेत. आधी स्वतःचे दोष पहावेत. जगाला आपलंसं करायचं असेल, तर आधी आपण प्रेमानं वागले पाहिजे. हे सारं जग आपलंच आहे. या जगात कुणीही परका नाही.' अखिल मानवजातीला दिलेला हा संत शारदादेवींचा अखेरचा संदेश होता.

✧✧✧

# अभंग रसग्रहण-१

# अभंग रसग्रहण-२

# अभंग रसग्रहण-३

# अवघा रंग एक झाला

# चित्ररथाचा वारीतील नियोजीत प्रवास



# चित्ररथ





# चित्ररथाचे वारीतील प्रवासासाठी प्रस्थान











# चित्ररथाचा वारीतील १७ दिवसांचा प्रवास व सादरीकरण















# अमृतस्पर्श

**'भयाचियें पोटीं, दुःखाचिया रासी'**

म्हणजे भीतीमुळेही खूप दुःखाच्या राशी आपोआप तयार होतात. अर्थातच, तुकाराममहाराजांच्या ह्या सुभाषिताचा प्रत्यय एक वर्षांपूर्वीच आपण सर्वांनी घेतला.

करोनानामक भयाने संपूर्ण जगावर दुःखाचं सावट धरलं होतं. सगळे जग ठप्प झाले होते. देवही देवळात बंद होते. पंढरीच्या वारीलाही बंधन आल्यामुळे दोन वर्षांत वारकऱ्यांची आणि विठ्ठलाची भेट झाली नव्हती; परंतु ह्या वर्षी मात्र विठ्ठलाच्या कृपेने पुन्हा एकदा वारीला भव्यदिव्य भक्तीचे रूप आले होते. आनंदाची गोष्ट म्हणजे, ह्यावर्षी वारीत संतसाहित्याची सेवा करण्याची सुवर्णसंधी मला महाराष्ट्र शासनाने दिली. विशेष म्हणजे, सांस्कृतिक कार्य विभागाचे श्रेष्ठ अधिकारी मा. श्री. विभिषण चवरेसाहेब यांनी माझ्या स्त्री संत साहित्याच्या अभ्यासावर विश्वास ठेऊन मला स्त्री संत साहित्यावर आधारित छोट्या नाट्यछटा लिहायला सांगितल्या. पांडुरंगाची सेवा करण्याची संधी मिळाल्याच्या आनंदात मी अकरा स्त्री संतांवर नाट्यछटा मा. चवरेसाहेबांना लिहून दिल्या. त्या नाट्यछटांचे सादरीकरण पृथ्वी थिएटरच्या कलाकारांनी संपूर्ण वारीत ठिकठिकाणी केले. काही ठिकाणी मी स्वतः अभिनय करून आपल्या स्त्री संतांचे कार्य लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. एकंदरीत, शासनाच्या आणि मा. चवरेसाहेबांच्या ह्या सुंदर संकल्पनेला वारकऱ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला.

संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत सोयराबाई, संत प्रेमाबाई, संत निर्मळा ह्या सगळ्या एकाच भक्तिवृक्षाची फळे आहेत. त्यामुळे त्यांच्या अभंगांतूनही एकसारखेच प्रसन्न, हितकारक, सकारात्मक विचार रसमय फळासारखे निर्माण झाले आहेत. त्याच्याभोवती श्रध्देचे मोठे वलय आहे.

ज्याच्या हातात क्षमा हे शस्त्र आहे, त्याला दुर्जन काहीही करू शकत नाही, हीच मार्गदर्शक नीतीतत्त्वे आहेत. तीच मी नाट्यछटेतून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. चमत्काराशिवाय देवाची ओळख लोकांना पटत नाही ; परंतु आपल्या रोजच्या लौकिक जीवनाभूतीतून ह्या स्त्रीसंतांनी दाखवून दिले की, ईश्वरतत्त्वाची त्यांच्या अनुभवांवर दृढ पकड आहे. त्यांनी आपल्या स्वानुभवातून, परमेश्वर स्पर्शातून अलौकिक काव्यानुभूती गुंफली. जनाबाई, विठाबाई, काशीबाई विठ्ठलाबरोबरचे अनुभव लिहून ठेवीत. त्या अनुभवांचा, काव्याचा उपयोग मी नाट्यछटेसाठी केला आहे.

दिव्याने जसा दिवा लागावा, तशी भक्तीने भक्ती तेजाळून पुण्यकाचा आनंद देणारे ज्ञानेश्वर आणि नामदेव श्रध्देच्या दिवाळीचा दीपोत्सव आहेत. ज्ञानेश्वर म्हणजे

सगुण मुक्ती; तर नामदेव म्हणजे सगुण भक्ती! ज्ञानेश्वरांनी गीताधर्म जगवला, तर नामदेवांनी भागवत धर्म उजळला. अशा ज्ञानदेव, नामदेवांना त्याचप्रमाणे समर्थ रामदास, चक्रधरस्वामी, मच्छिंद्रनाथ, दत्तगुरु, तुकाराम महाराज... अशा श्रेष्ठ गुरुकृपेमुळे केवळ झालेला परमेश्वराचा साक्षात्कारसुद्धा ह्या नाट्यछटेत आहे.

स्त्री संतांच्या रोजच्या जीवनात ज्या प्रसंगांना अमृतस्पर्श झाला आहे. तसेच ज्या अभंगांला अमृतस्पर्श झाला, तो अभंग, तो प्रसंग नाट्यछटेत दाखवण्याचा प्रयत्न मी केला आहे.

# नाट्यसंहिता

## १.

(शंख वाजतो... रंगमंचाच्या मध्यभागी काही वारकरी गाणे गात येतात... )

वारकरी : पुंडलिक वर दे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय...

प्राची गडकरी : माउली माउली... 'माउली' या शब्दातच काय जादू आहे बुवा... वारी करणारा वारकरी, मग तो गरीब असो श्रीमंत असो, कुठल्याही जातिधर्माचा असो, स्त्री असो पुरुष असो हा वारकरी समोरच्याला मायेने हीच साद घालतो... माउली...

वारकरी : अहो माउली, मग आपल्या विठुरायाच्या नशिबी अशा अनेक माउली आल्या असतील न्हवं?

प्राची गडकरी : आल्या ना! मुक्ताई, महदंबा, जनाबाई, प्रेमाबाई, सोयराबाई...

वारकरी : बाई बाई बाई... एवढ्या माउली... खरंच आपला विठू नशिबवान हाय...

प्राची गडकरी : हो मग... पण मला सांग, तुला या सगळ्या स्त्री संतांविषयी काय माहिती आहे?

वारकरी : माहिती? अहो माउली, आता वारीतल्या सगळ्यांनाच सगळं ठाव असतं व्हय... चार गोष्टी नव्या कळल्या, तर आमीबी चार लोकांना सांगू...

प्राची गडकरी : बरं सांगते... बोला विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल.

सगळे : विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल (२)

( मुक्ताई आणि ज्ञानेश्वर रंगमंचावर दिसतात)

मुक्ताई : (एखादा अभंग गाते)

वारकरी : बाप माझा पांडुरंग, रुक्मिणी माझी आई... डोळे भरूनी पाहू दे मला ज्ञानाची मुक्ताई... अहो माउली, मुक्ताईबद्दल कोणाला काय ठाऊक नसणार असं होणार हाय होय?

वारकरी १ : अहो जिनं चांगदेवाला आपला शिष्य बनवला, अशी आमची मुक्ताई ठाव हाय आम्हाला.

प्राची गडकरी : चांगदेवाने गुरू मानलं आपल्या मुक्ताईला, पण का मानलं कसं मानलं, कशासाठी मानलं हे तर समजून घ्या माउली.

(वारकरी गातो आणि सीन सुरू होतो)

वारकरी : बाप माझा पांडुरंग, रुक्मिणी माझी आई... डोळे भरूनी पाहू दे मला, माझी मुक्ताई...

चांगदेव : साक्षात भेटीत किती आनंद आहे, हे आज मला कळलं ज्ञानदेवा... तुम्हाला माझा गुरू करायची इच्छा आहे माझी... पण त्याआधी काही प्रश्न विचारले तर चालतील का ज्ञानदेवा ?

ज्ञानेश्वर : शंका असेल, तर ती मनात ठेवू नका चांगदेव... विचारा... आणि गुरू करायचाच असेल, तर मला नको, आमच्या मुक्ताईला करा.

चांगदेव : या चिमुकलीला काय जाण असणार ?

ज्ञानदेव : तुम्ही विचारून तर पहा.

चांगदेव : मला देव कधी दिसला नाही... मग कोण्या माणसात मी देव कसा पाहू ?

मुक्ताई : चांगया, तू कधी विहीर खणली आहेस का ?

चांगदेव : माझ्या आश्रमात १६ विहिरी आहेत... पण विहिरीचा आणि मी विचारलेल्या प्रश्नाचा काय संबंध ?

मुक्ताई : कळेल... विहिरीला पाणी कसं लागतं मग ?

चांगदेव : सोप्पं आहे. विहीर खणताना आपण आधी माती काढतो, मग दगडधोंडे, मग अशी आणखी आवरणे खणत खणत पाण्याचे झरे लागायला सुरूवात होते... आणि त्यानंतर विहीर पाण्याने भरते.

मुक्ताई : चांगया, ते पाण्याचे झरे तू तयार केले नाहीस, ते आधीपासून तिथेच होते. तू फक्त त्यावरची आवरणं बाजूला सारलीस... अगदी तसंच आहे बघ, प्रत्येक आत्म्यात देव आहे... फक्त त्या आत्म्यातील देवावर लोभ, मोह, मत्सर, अहंकार, क्रोध अशी आवरणं आहेत... ही आवरणं बाजूला सारली की दिसेल देव... म्हणून तर आपण कोणी समोर आलं की, हात जोडतो त्याच्यासमोर... पण तो नमस्कार त्याला नसतो, तर त्या आत्म्यात वसलेल्या देवासाठी असतो...

चांगदेव : मुक्ताई, आज मला देव तुमच्यामुळे दिसला... आजपासून तुम्हीच माझी गुरुमाउली !

**धन्य धन्य मुक्ताई ।**
**तुमचे चरणी माझी डोई ।।**
**माझा केला अंगीकार ।**
**दाखविला परात्पर ।।**

प्राची गडकरी : शुद्ध ज्याचा भाव झाला। देव नाही दूर त्याला।। असं आपली सांगायची आणि याचमुळे मुक्ताई त्या लहानग्या वयातसुद्धा चांगदेवांची सुद्धा गुरू झाली.

सगळे : देह देवाचे मंदिर, त्यात आत्मा परमेश्वर, हो देह देवाचे..

## २.

वारकरी : म्हणजे परतेकात देव असतो असं म्हणा की...

प्राची गडकरी : हो, तुमच्या-आमच्यात साऱ्यात देव आहे.

वारकरी : म्हणजे आम्हीबी पंढरीचे वारकरी होऊ शकतो?

प्राची गडकरी : हो तर, पांडुरंगाच्या ठायी सगळे सारखेच.

वारकरी : मग तो कुठल्याही जातीचा, कुठल्याही धर्माचा असला तरी?

प्राची गडकरी : हो हो अगदीच... वारीत हा भेदाभेद नसतोच... पांडुरंगाचं नाव घेणाऱ्याला फक्त एकच धर्म असतो... भक्तीचा... आणि नाम संकीर्तन करण्याचा, भगवंताच्या जवळ जाण्याचा अधिकार सगळ्यांना सारखाच आहे. म्हणूनच तुकाराम महाराज म्हणतात ना,

**ब्राम्हण क्षत्रिय वैश्य शूद्र। चांडाळांही अधिकार।**
**बाळे नारी नर। आदि करोनि वेश्याही।।**

वारकरी : वेश्याही?

प्राची गडकरी : हो वेश्याही.

गाणं : नेसले गं बाई...

(संत कान्होपात्रा कृष्णाचं भजन गात आहेत.)

कान्हा : गोविंद गोविंद हरे मुरारी..

हंसा : अजून जप चालू आहे का तुझा..

कान्हा : हो मावशी... कृष्ण लीलेचे दोन अध्याय बाकी आहेत फक्त... ते संपले की येते मी..

(तेवढ्यात बाहेरून वारकऱ्यांचा गजर ऐकू येतो.)

वारकरी : जय जय पांडुरंग हरी। जय जय पांडुरंग हरी।।

कान्हा : मावशी... कोण आहेत गं ही लोकं... इतक्या उन्हातान्हात कुठे चालली आहेत?... ह्यांच्या टाळ-मृदंगाच्या आवाजात मी पूजा कशी करणार?

हंसा : अगं त्यात काय... तुझ्याच देवाची आळवणी करत आहेत ते... तू

इथे कृष्णाच्या लीला वाचते आहेस आणि ते पांडुरंगाचा गजर करता आहेत. अगं वारकरी आहेत ते... पंढरीला चालले आहेत.

(पुन्हा वारकऱ्यांचा गजर सुरू होतो.. कान्हादेखील त्यात सामील होते.)

गाणं : या विठूचा गजर हरी मामा चा झेंडा रोविला

(सगळे वारकरी एकमेकांच्या पाया पडू लागतात.)

वारकरी : दंडवत माउली, दंडवत.

(कान्हाच्याही पाया पडतात... तेव्हा ती त्यांना अडवते.)

कान्हा : अहो, तुम्ही माझ्या कुठे पाया पडता आहात... आमच्यासारख्या स्त्रियांचा स्पर्श जरी झाला, तरी... लोक गंगेत स्नान करतात... आणि इथे तुम्ही चक्क माझ्या पाया पडताय.

वारकरी : आपण सारेच वारकरी... आई आपल्या मुलांत फरक करते का?... तसंच पांडुरंगदेखील आपल्या साऱ्या भक्तांवर सारखंच प्रेम करतो... मग तो देवच हा भेद मानत नाही... तर मग भेदाभेद मांडणारे आपण कोण?

(वारकरी पुन्हा गजर करत निघून जातात.)

वारकरी : विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल.

कान्हा : विठ्ठलाचे वारकरी जर इतके प्रेमळ असतील, तर विठ्ठल किती प्रेमळ असेल गं? कसा दिसत असेल गं?

हंसा : विठ्ठल म्हणजे आरसा आहे आरसा... जो त्याच्याकडे पाहतो, त्याला तो त्याच्यासारखा दिसतो... तू पाहिलंस, तर तुला तुझ्यासारखा दिसेल.

(गाणं : बघ उघडुनी दार)

प्राची गडकरी : तर असं आहे हे सगळं... म्हणजे आपण मनापासून भक्ती केली... तर देव आपल्या हाकेला धावून येतोच...

वारकरी : म्हणजे, भक्तीत इतकी ताकद असते होय? की देव सोता येतोय भक्तासाठी धावून?

प्राची गडकरी : हो, पण काहींची भक्ती इतकी श्रेष्ठ असते, इतकी निरागस असते की, तेदेखील देवांसाठी धावून जातात...

वारकरी : म्हणजे माउली?... ते नेमकं कोणाबद्दल बोलताय तुम्ही?

प्राची गडकरी : प्रेमाबाई... संत प्रेमाबाई...

(गाणं : अलीकडं ये मला...)

प्रेमा : बाळ... अरे, आवर लवकर... आपल्याला कीर्तनाला जायचं आहे ना... एवढी भाकर खा... मग आपण लगेचच कीर्तनाला जाऊ.

बाळ : हो आई, आज मलाही कीर्तन ऐकायचं आहे.

(तेवढ्यात चिपळ्या वाजतात.)

प्रेमा : हे टाळ-चिपळ्यांचे आवाज... ह्यावेळी? म्हणजे गावात कोणी संतमंडळी आली आहेत का?

बाळ : हो आई... काही साधुजन गावात येणार होते, तेच असावेत बहुधा.

साधू : भिक्षा वाढ माई...

बाळ : आई, अगं, जेवण तर संपलं... ही शेवटची भाकर मी खाल्ली ना.

प्रेमा : हो, पण दारात आलेले हे साधुसंत म्हणजे देवाचेच रूप आहेत... त्यांना मी रिकाम्यापोटी कशी पाठवेन... करते काहीतरी.

बाळ : आणि मग कीर्तन?

प्रेमा : आज मी नाही येत कीर्तनाला.. पण तू जा आणि मला आल्यावर सगळं सांग माझ्या कृष्णाबद्दल.

(स्वयंपाक करते, वाढते, साधू जेवतात, जातात)

(गाणं : जे का रंजले गांजले...)

प्रेमा : तू आलास?... सांग ना काय झालं आज? कोणता चमत्कार केला माझ्या कृष्णाने?

बाळ : चमत्कार?... चमत्कार नाही... खोड्या केल्या खोड्या... आपल्या गोपमित्रांना सोबत घेऊन कृष्णाने बऱ्याच खोड्या केल्या... कोणाची मडकी फोडली, कोणाचं लोणी चोरलं.. मग यशोदामाईने शिक्षा म्हणून कृष्णाला उखळाला बांधून ठेवलंय.

प्रेमा : काय? माझ्या कृष्णाला उखळाला बांधलय? असं कसं?... मग तर मला जायलाच हवं. त्याला सोडवायला हवं.

प्राची : कृष्णाला सोडवायला निघालेली धावून गेली... आणि भगवंतांनी जागीच तिची ह्या भवसागरातून सुटका केली... तिला मुक्ती मिळाली.

स्कीट ३ – पान १

स्कीट ३ – पान २

# पंढरपूर येथील 'नाचू कीर्तनाचे रंगी' संत नामदेव महाराज जयंती कार्यक्रमातील सादरीकरणाची काही क्षणचित्रे

















# पंढरपूर येथील ‘अवघा रंग एक झाला’ कार्यक्रमातील काही क्षणचित्रे











# पंढरपूर येथील ‘अवघा रंग एक झाला’ कार्यक्रमातील काही क्षणचित्रे













# पंढरपूर येथील ‘अवघा रंग एक झाला’ कार्यक्रमातील काही क्षणचित्रे





# वारीतील वारकऱ्यांची काही क्षणचित्रे









## ❁ सांगता ❁

उपनिषदात स्त्रीला आकाश विशेषणाने मंडित केले आहे; कारण स्त्रीमधील ममता पाहून तिचे मन आकाशासारखे विशाल दिसते. स्त्रीच्या निर्मितीचे अआध्यात्मिक रूप 'आदिशक्ती' आणि 'विश्वजननी' अशा शब्दांनी गौरविले आहे. ब्रम्हदेव हा जसा

सृष्टीपिता आहे, तशी वाग्देवी ही साहित्यजननी आहे. 'चातुर्यार्थ कला कामिनी' असे म्हणून ज्ञानेश्वरांनी कलासाहित्याची निर्मिती करणाऱ्या सरस्वतीला नमन केले आहे.

आपल्या भक्तीने अध्यात्माचे सर्वोच्च टोक पार करून परमेश्वराला प्राप्त करणाऱ्या अनेक संत स्त्रिया ह्या भूतलावर होऊन गेल्या. स्त्री म्हणजे त्याग, समर्पण, सहनशीलता, समर्पिता, सोशिकता, भक्ती अशा अनेक गुणांचा समुच्चय, हे तिने वारंवार सिद्ध केले आहे.

भारतातील तसेच महाराष्ट्रातील स्त्री संतांची संख्या तशी अफाट आहे आणि प्रत्येक संत स्त्रियांची शिकवण ही भक्तीचा नवा मार्ग सांगणारी आहे, हे विशेष!

भागवतात कांतासक्ती हा भक्तीचा एक उच्च प्रकार सांगितला आहे. यामध्ये केवळ गोपिकांच्या भक्तीचे वर्णन आहे. मन शुद्धीसाठी भक्तीचा मार्ग स्वीकारल्यामुळे या सात्त्विक प्रवाहाने भारताचे सांस्कृतिक जीवन समृद्ध केले आहे. म्हणूनच गोपी ह्या भक्तीच्या खऱ्या आदर्श मानल्या जातात. 'स्त्री मुक्तीचा खरा साक्षात्कार गोपिकांच्या मनोवृत्तीत जाणवतो,' असे प्रसिद्ध संत साहित्य अभ्यासक डॉ. तारा भवाळकर म्हणतात.

आपल्याकडे नाथ, महानुभाव, वारकरी, रंगबोध, रामदासी, आनंद, दत्तोपासना, चैतन्य अशा अनेक पंथ आणि संप्रदायात स्त्री संतांचे भरीव कार्य उल्लेखनीय आहे.

ईश्वरप्राप्तीचा आणि वैराग्याचा एक मार्ग म्हणून अनेक स्त्री संतांनी भक्तीचा मार्ग स्वीकारला.

महानुभाव पंथात आबाईसा, महदाइसा, नागाइसा, हिराइसा, उमाइसा, नाईकबाइसा... अशा अनेक संत स्त्रिया दिसतात.

# वारीतील वारकऱ्यांची काही क्षणचित्रे








माधवस्वामी परंपरेतील मिनाक्षीअम्मा, मैना, येसाई, जेनूबाई, आऊबाई, साखराई, बंगालच्या चंद्रावती, राधाबाई यांनीसुद्धा केवळ नामस्मरणाने आपले संतत्व सिद्ध केले आहे. कलियुगात भक्तीचा मार्ग नामस्मरण आणि संकीर्तन यांनी समृद्ध झाला, असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

संस्कृत कवयित्री विज्जिकाने धान्य, दळण कांडताना देवाचे सुंदर वर्णन करून भक्तीचा सुलभ मार्ग दाखवला आहे.

संत कंकावती, संत ताई, संत गिरीबाई, संत काशी, संत गोमाई या सगळ्या संत स्त्रियांचा उल्लेख संत देवदासांनी आपल्या संत मालिकेत केला आहे. मोरोपंतांनीसुद्धा ही स्त्री संत नामावली आपल्या शब्दांनी गायली आहे.

टाळ – चिपळ्या घेऊन देवासमोर बसायची गरज नाही, तर केवळ शरीराच्या कणाकणांत परमेश्वर भरायचा, अशी भक्तांची वेगळी रीत संत विठाबाईंनी सांगितली.

मुलाधार चक्रापासून प्राण सहस्त्रारचक्रापर्यंत नेणे, हेच मनुष्याचे ध्येय हवे. यासाठी उचित नामस्मरण हा साधनमार्ग सर्व स्त्री संतांनी उपदेशिलेला आहे.

नारदांनी भक्तीचा अर्थ सांगताना म्हटले आहे की सर्व कामे भगवंताला अर्पण करणे म्हणजे भक्ती! भगवंताचा विसर होताच व्याकूळ होणे म्हणजेच भक्ती!

माणसाची आणि देवाची गाठभेट भक्तीद्वारे घडवून देणारी मध्यस्थ व्यक्ती म्हणजे संत! तसा संतसंग दुर्लभ, अगम्य, अमोघ असे नारद म्हणतात.

भागवतात संतांची तेवीस लक्षणे सांगितली आहेत. ही तेवीस लक्षणे म्हणजे मानवतेच्या तेवीस पायऱ्या आहेत. ह्या तेवीस मधील एक जरी पायरी आपण चढू शकलो तरी आपले जीवन समृद्ध होऊ शकते असे नारद म्हणतात.

अशा मानवतेच्या सगळ्या पायऱ्या पार करून ह्या स्त्री संतांनी आपल्याला मानवतेचा पाठ दिला आहे. माणुसकी हा एकच धर्म आहे. आणि मानवता ही एकच जात आहे. आपण सर्व ह्या मानवतेच्या नाळेने एकमेकांशी बांधलो गेलो आहोत. त्यामुळे केवळ स्नेह, दया आणि आपुलकी ही आपली भावना हवी. संतांच्या ह्याच विचारांनी आपला देश समृद्ध आहे.

✧✧✧